# पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्य, ग्रंथालयीन सेवा व संगणकीकरणाची स्थिती विषयीचा अभ्यास

ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयामधील विद्यानिष्णात (एम.फिल.)
अभ्यासक्रमाच्या अंशतःपूर्तीसाठी सादर केलेला शोध प्रबंध


संशोधक

**श्री. जगताप विकास गोवर्धन**

**पी.आर. एन्. – १०४१३०००७५६**

**मार्गदर्शक**

**प्रा.डॉ. नंदकुमार दहिभाते**

**अभ्यासकेंद्र**

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ,

मुकूंदनगर, गुलटेकडी, पुणे – ४११०३७


मे–२०१७

# ऋणनिर्देश

माझी शिक्षणाची आवड, शिकण्याची तळमळ ओळखून ''टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे'' या विद्यापीठाने मला ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयातील 'एम.फिल' या शिक्षणक्रमांतर्गत संशोधन करण्याची संधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी विद्यापीठाचा ऋणी आहे.

संशोधन प्रकल्प पूर्ण करण्यामध्ये मला मोलाचे मार्गदर्शन करणारे व ज्यांनी मला विषय निवडीपासून, संदर्भ ग्रंथविषयीचे ज्ञान, आशय समजून घेण्याचे ज्ञान तसेच वेळोवेळी अडचणी समजून घेऊन, अतिशय मनःपूर्वक व तळमळीने मार्गदर्शन करणारे माझे आदरणीय गुरू व मार्गदर्शक डॉ. नंदकुमार दहिभाते (सर) यांचे मी मनापासून आभार मानतो.

टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे मुख्य ग्रंथपाल डॉ. सौ. खंदारे मॅडम व ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विभागाचे सर्व प्राध्यापक, ग्रंथालय कर्मचारी यांनी केलेले सहकार्य आणि मार्गदर्शन लाभल्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

एम.फिल. पदवी अभ्यासक्रमासाठी मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन करणारे प्रा. डॉ. भाऊसाहेब पानगे, प्रा.डॉ. सुनिता बर्वे, प्रा.डॉ.राजेंद्र कुंभार, प्रा.डॉ. अपर्णा राजेंद्र, श्री. अवधुत कुलकर्णी यांचा मी अत्यंत आभारी आहे.

ज्या ज्या महाविद्यालयाच्या ग्रंथपालांनी प्रश्नावल्या भरून दिल्या व संशोधन प्रकल्पासाठी मला मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. माझे सहकारी श्रीमती ठेंबेकर आर.पी. तसेच मला माझ्या प्रकल्पासाठी मदत करणारा माझा वडिल भाऊ श्री. शिवराज जगताप, माझी पत्नी सौ. अर्चना जगताप यांचा मी आभारी आहे.

माझे वडिल कै. गोवर्धन जगताप यांच्या विचारांच्या प्रेरणेने आणि माझी आई श्रीमती हिराबाई जगताप हिच्या आशिर्वादामुळेच मी हे करू शकलो त्याबद्दल त्यांचे ऋण व्यक्त करतो.

संशोधन प्रकल्पाचे उत्कृष्टरित्या अंतरंग समृद्ध व अचूकपणे टायपिंग करणारे श्री. दिपक दिवटे यांचाही मी आभारी आहे.

**संशोधक**

**जगताप विकास गोवर्धन**

# संशोधक प्रमाणपत्र

मी, **श्री. जगताप विकास गोवर्धन (कायम नोंदणी क्र.–१०४१३०००७५६)** ''पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह, सेवा व संगणकीकरणाची स्थितीविषयीचा अभ्यास'' या विषयावर संशोधन प्रकल्प अहवाल मार्गदर्शक व डॉ. नंदकुमार दहीभाते यांच्या मार्गदर्शनाखाली स्वतःपूर्ण केलेला असून सर्व माहिती मूळ संदर्भातून संकलित केली व त्या माहितीचा संदर्भ योग्य त्या ठिकाणी नमूद केला आहे.

हा संशोधन प्रकल्प अथवा त्याचा काही भाग कोणत्याही पदवी परीक्षेस सादर करण्यात आलेला नाही.

**संशोधक**

**जगताप विकास गोवर्धन**

**(पी.आर.एन–१०४१३०००७५६)**

ठिकाण :

दिनांक :

# मार्गदर्शक प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, **श्री. जगताप विकास गोवर्धन (कायम नोंदणी क्र.– १०४१३०००७५६)** यांनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे येथून सन २०१६–२०१७ या शैक्षणिक वर्षात ग्रंथालय आणि माहितीशास्त्र या विषयातील एम.फिल. पदवी अभ्यासक्रमाच्या अंशतः पूर्ततेसाठी ''पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह, सेवा व संगणकीकरणाची स्थितीविषयीचा अभ्यास'' या विषयावर संशोधन प्रकल्प अहवाल माझ्या मार्गदर्शनाखाली पूर्ण केलेला असून त्यांनी नमूद केलेली व संशोधनात्मक विधाने ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर आहे

**मार्गदर्शक**

**डॉ. नंदकुमार दहिभाते**

ठिकाण :

दिनांक :

# अनुक्रमणिका


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| **प्रकरण १ ले** | संशोधनाचे प्रस्तावनात्मक विवेचन | १–१० |
| १.१ | प्रास्तविक | १–२ |
| १.२ | विषय निवडी मागील भूमिका | २–३ |
| १.३ | संशोधन समस्या विधान | ३ |
| १.४ | संशोधनाची आवश्यकता | ३–४ |
| १.५ | संशोधनाची उद्‌दिष्टये | ४ |
| १.६ | संशोधनाची गृहीतके | ५ |
| १.७ | संशोधनाची व्याप्ती व मर्यादा | ५–६ |
| १.८ | काही संज्ञा | ६–९ |
| १.९ | संशोधनाची पद्धती | ९ |
| १.९.१ | संशोधन तंत्रे व माहिती संकलनाची साधने | ९ |
| १.९.२ | माहिती विश्लेषण पद्धती व सादरीकरण | ९ |
| **प्रकरण – २ रे** | पूर्व संशोधनाचा आढावा | ११–२४ |
| **प्रकरण – ३ रे** | आयुर्वेद स्वरूप व शिक्षण प्रणाली | २५–४५ |
| ३.१ | आयुर्वेद स्वरूप | २५ |
| ३.१.१ | आयुर्वेद व्याख्या | २५–२६ |
| ३.२ | इतिहास | २६ |
| ३.३ | आयुर्वेदाचे प्रयोजन | २६–२७ |
| ३.३.१ | त्रिस्कंध आयुर्वेद हेतू | २७ |
| ३.४ | आयुर्वेदाचे अखंडत्व | २७ |
| ३.४.१ | प्राचीनत्व | २७–२८ |
| ३.४.२ | मूलसिद्धत्त्व | २८ |
| ३.४.३ | भावस्वभावनित्यत्व | २८–२९ |
| ३.५ | आयुर्वेदाचे वैद्यकीय उपचारपद्‌धती म्हणून महत्व | २९ |
| ३.६ | आयुर्वेदाची व्याप्ती | २९ |
| ३.६.१ | शल्यतंत्र | २९–३० |

| | | |
|---|---|---|
| ३.६.२ | शालक्यतंत्र | ३० |
| ३.६.३ | कौमारभृत्यतंत्र | ३० |
| ३.६.४ | कायाचिकित्सा | ३० |
| ३.६.५ | अगदतंत्र | ३० |
| ३.६.६ | गृहचिकित्सा | ३० |
| ३.६.७ | रसायनतंत्र | ३०–३१ |
| ३.६.८ | वाजीकरणतंत्र | ३१ |
| ३.७ | आयुर्वेदाचे महत्त्व | ३१–३२ |
| ३.८ | भारत : आयुर्वेदाची सद्यःस्थिती | ३२–३४ |
| ३.९ | भारतीय उपखंडातील आयुर्वेदाची सद्यःस्थिती | ३४ |
| ३.१० | भारताबाहेरील औषधांची सद्यःस्थिती | ३४–३५ |
| ३.११ | आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास | ३५–३८ |
| ३.१२ | आयुर्वेदातील पदव्युत्तर अभ्यासक्रम | ३९ |
| ३.१३ | पदव्युत्तर शिक्षणाचा इतिहास | ३९–४० |
| ३.१४ | आयुर्वेद शिक्षण संबंधी केंद्रीय समित्या | ४० |
| ३.१४.१ | भोर कमिटी | ४० |
| ३.१४.२ | चोपडा कमिटी | ४१ |
| ३.१४.३ | दवे कमिटी | ४२ |
| ३.१४.४ | उड्प कमिटी | ४२–४३ |
| ३.१४.५ | व्यास कमिटी | ४३ |
| ३.१५ | भारतातील आयुर्वेद महाविद्यालयांची प्रवेशप्रक्रिया | ४३–४४ |
| **प्रकरण ४ थे** | वाचनसाहित्य संग्रह, सेवा व संगणकीकरण | ४६–७७ |
| ४.१ | प्रास्तविक | ४६ |
| ४.२ | वाचनसाहित्य संग्रहाचा विकास | ४६–४७ |
| ४.३ | वाचनसाहित्य संग्रहाचा अर्थ आणि हेतू | ४७ |
| ४.३.१ | वाचनसाहित्य संग्रह विकास | ४७–४८ |
| ४.४ | वाचनसाहित्य संग्रह विकासाच्या व्याख्या | ४८ |
| ४.५ | वाचनसाहित्य संग्रह विकासाचे हेतू | ४८ |

| | | |
|---|---|---|
| ४.६ | वाचनसाहित्य संग्रह विकसित करताना विचारात घ्यावयाच्या प्राथमिक बाबी | ४९ |
| ४.७ | वाचनसाहित्य संग्रह विकास धोरण | ४९–५० |
| ४.८ | वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचे फायदे | ५०–५१ |
| ४.९ | वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचे घटक | ५१–५२ |
| ४.१० | वाचनसाहित्य संग्रह विकासाची कार्ये | ५२ |
| ४.११ | वाचनसाहित्य संग्रह विकासातील टप्पे | ५२–५३ |
| ४.१२ | वाचनसाहित्य रद्दबातल करणेबाबतचे धोरण | ५३–५४ |
| ४.१३ | वाचनसाहित्याचे संघटनातील समस्या | ५४–५५ |
| ४.१४ | वाचनसाहित्य संग्रह विकास आणि उपार्जन प्रक्रिया | ५५–५६ |
| ४.१५ | अंदाजपत्रक आणि निधी वितरण | ५६–५७ |
| ४.१६ | ग्रंथालय समितीची वाचनसाहित्य संग्रह विकासातील भूमिका | ५७–५८ |
| ४.१७ | ग्रंथालयाचे संगणकीकरण | ५९ |
| ४.१७.१ | संगणकीकरणाची आवश्यकता | ६०–६१ |
| ४.१८ | संगणकीकरणाव्दारे ग्रंथालयातील केली जाणारी कामे | ६१–६३ |
| ४.१९ | ग्रंथालय संगणकीकरणाचे फायदे | ६३ |
| ४.२० | ग्रंथालय संगणकीकरणासाठीच्या आज्ञावली | ६४ |
| ४.२१ | संगणकीकरणासाठी संगणक आज्ञावलीची निवड करताना विचारात घ्यावयाच्या बाबी | ६४–६५ |
| ४.२२ | ग्रंथालय संगणकीकरणासाठी मुलभूत गरजा | ६५ |
| ४.२३ | ग्रंथालय संगणकीकरणाच्या पायऱ्या | ६५ |
| ४.२४ | महाविद्यालयीन ग्रंथालयीन सेवा | ६५ |
| ४.२४.१ | ग्रंथदेवघेव सेवा | ६५ |

| | | |
|---|---|---|
| ४.२४.२ | संदर्भ सेवा | ६६ |
| ४.२४.३ | प्रचलित जागरूकता सेवा | ६६ |
| ४.२४.४ | निवडक माहितीचे प्रसारण सेवा | ६६ |
| ४.२४.५ | प्रतिलिपी सेवा | ६६ |
| ४.२४.६ | भाषांतर सेवा | ६७ |
| ४.२४.७ | सीडी रॉम सेवा | ६७ |
| ४.२४.८ | ऑनलाईन सेवा | ६७ |
| ४.२५ | महाविद्यालयीन ग्रंथालय सेवा | ६७ |
| ४.२५.१ | अत्यंत महत्त्वाच्या सेवा | ६८ |
| ४.२५.२ | इष्ट सेवा | ६८–६९ |
| ४.२५.३ | ग्रंथालय सेवांचे प्रमाणके | ६९ |
| ४.२६ | अत्यावश्यक सेवा | ७० |
| ४.२६.१ | वाचनसाहित्य संग्रह | ७० |
| ४.२६.२ | वित्ताबाबत | ७०–७१ |
| ४.२७ | ग्रंथालयातील प्रमाणके | ७१–७३ |
| ४.२७.१ | वाचनसाहित्य संग्रह | ७३ |
| ४.२७.२ | जागा | ७३ |
| ४.२७.३ | व्यवस्थापन / प्रशासन | ७४ |
| **प्रकरण ५ वे** | माहितीचे विश्लेषण | ७८–१४२ |
| **प्रकरण ६ वे** | निष्कर्ष व शिफारशी | १४३–१४५ |
| **परिशिष्ट – १** | ग्रंथपालाची प्रश्नावली | १४६–१५५ |
| **परिशिष्ट – २** | पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यांचा नकाशा | १५६ |
| **परिशिष्ट – ३** | पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेदिक महाविद्यालय व त्यांची स्थापना वर्षे यांची यादी | १५७–१५८ |
| **परिशिष्ट–४** | संक्षिप्त रुपे | १५९ |
| **परिशिष्ट – ४** | संदर्भसूची | १६०–१६४ |

# अनुक्रमणिका

## वृत्तालेख


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जिल्हानिहाय आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या | ७८ |
| २ | जिल्हानिहाय प्रतिसादाक महाविद्यालयाचे ग्रंथालय संख्या | ७९ |
| ३ | कालखंडनिहाय स्थापन झालेली महाविद्यालये | ८३ |
| ४ | महाविद्यालये प्रमाणस्थिती | ८९ |
| ५ | आर्युवेद महाविद्यालयाचे ग्रंथापालाची शैक्षणिक पात्रता | ९६ |
| ६ | आयुर्वेद महाविद्यालयातील सहाय्यक ग्रंथपालाची शैक्षणिक पात्रता | ९६ |
| ७ | आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयात वापरली जाणारी वर्गीकरण पद्धती | १२१ |
| ८ | आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयात वापरली जाणारी तालिकीकरण पद्धती | १२३ |
| ९ | आयुर्वेद महाविद्यालयातील ग्रंथ परिगणनाचा कालावधी | १२७ |
| १० | आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयात इंटरनेट सेवा पुरविणारी एजन्सी | १३३ |

# अनुक्रमणिका

## जोडस्तंभालेख


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | जिल्हानिहाय महाविदयालयांना पुरविण्यात आलेल्या प्रश्नावलींची संख्या व प्रतिसादक संख्या | ८१ |
| २ | अनुदानित व विनाअनुदानित आयुर्वेद महाविदयालयांची संख्या | ८५ |
| ३ | आयुर्वेद महाविदयालयांचे ग्रंथालयात इंटरनेटचा केला जाणारा वापर | १३९ |
| ४ | आयुर्वेद महाविदयालयांचे ग्रंथालयाच्या संगणककरणाचा ग्रंथालयावरील परिणाम | १४२ |

## विभाजित स्तंभालेख


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
| --- | --- | --- |
| १ | जिल्हानिहाय महाविदयालयांना पुरविण्यात आलेल्या प्रश्नावलींची संख्या व प्रतिसादक संख्या | ८० |
| २ | पश्चिम महाराष्ट्रातील अनुदानित व विनाअनुदानित आयुर्वेद महाविदयालयांची संख्या | ८६ |

# साधा स्तंभालेख


| अनु. क्र. | शीर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | ग्रंथालय सेवा | १०० |
| २. | आधुनिकीकरणावर आधारित ग्रंथालय सेवा | १०२ |
| ३. | तालिकीकरण पद्धती | १२२ |
| ४. | वाचनसाहित्य सुस्थितीत ठेवण्यासाठीची उपाययोजना | १२४ |
| ५. | वाचनसाहित्य रद्दबातल धोरणासंबंधी माहिती | १२५ |
| ६. | पश्चिम महाराष्ट्रातील आर्युवेदीक महाविद्यालयांचे संगणकीकरण प्रक्रिया सद्यस्थिती | १२६ |
| ७. | पश्चिम महाराष्ट्रातील आर्युवेदीक महाविद्यालयांचे डिजिटायजेशन सद्यस्थिती | १२९ |
| ८. | पश्चिम महाराष्ट्रातील आर्युवेदीक महाविद्यालयांचे ग्रंथालय वाचकांना टर्मिनल्स पुरवठा | १३१ |
| ९. | पश्चिम महाराष्ट्रातील आर्युवेदीक महाविद्यालयांचे ग्रंथालय वाचकांना ओपॅक सुविधा | १३२ |

# प्रकरण १ ले
# संशोधनाचे प्रस्तावनात्मक विवेचन

## १.१) प्रास्ताविक

ग्रंथालय व माहिती केंद्रातून ICT चा वापर वाढत आहे व आधुनिक ग्रंथालय निर्मिती मध्ये तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. पारंपारिक व्यवस्थापनामध्ये देखील बरीच स्थित्यंतरे घडत आहेत. शैक्षणिक व विशेष ग्रंथालयाच्या प्रगतीचा वेग वाढत आहे. ICT चा वापर, ई–प्रकाशनाची उपलब्धता, इंटरनेटचा वापर या मुळे ग्रंथालयाचा चेहरा बदलत आहे. वाचकांना अत्याधुनिक व अचूक माहिती पुरवठा ग्रंथालयाने करणे अपेक्षित आहे याचे कारण वाचक हे संपूर्णपणे तंत्रज्ञानाचा वापर करण्यास सक्षम झाले आहेत. ग्रंथपालांना सध्याच्या परिस्थितीमध्ये माहितीचा स्फोट, वाढत्या किंमती, वाढत्या वाचक गरजा, विषयाची सूक्ष्मता, तंत्रज्ञानाचा वाढता वापर व मर्यादित निधी यामुळे माहिती संग्रह विकास व सेवा यावर जास्त भर द्यावा लागत आहे. वाचकांच्या गरजा लक्षात घेऊन त्याप्रमाणे गुणवत्ताधारक प्रकाशने ग्रंथालयात आणणे काळाची गरज आहे. एकाच ग्रंथालयात एका विषयावर सर्व साहित्य उपलब्ध असेलच असे नाही यासाठी सर्वेक्षण करून माहिती सहकार वाढविणे गरजेचे आहे. प्रत्येक ग्रंथालयातील स्थितीचे सर्वेक्षण करून त्यातील कार्यपद्धतीत तंत्रज्ञानाचा वापर करून कसा बदल करता येईल याकडे लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. शैक्षणिक ग्रंथालयांना अद्ययावत ठेवण्याची सध्या गरज आहे.

ग्रंथालयांची कार्यक्षमता ही वाचनसाहित्य संग्रह, त्यांच्याव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवांचा दर्जा व त्यांच्या संगणकीकरणाची स्थिती यावरून लक्षात येते. वाचक हा ग्रंथालयाच्या केंद्रस्थानी असून ग्रंथालये ही त्यांना सेवा देणारी संस्था असल्याने ते वाचकांच्या गरजांना अधिक महत्व देतात. वाचनसाहित्यसंग्रह हा संख्यात्मक न राहता तो गुणात्मक राहणे अत्यंत महत्त्वपूर्ण असते तसेच सेवांची संख्या जास्तीत–जास्त असावी आणि त्या प्रभावीपणे देणे आवश्यक असते. अचूक वाचनसाहित्य अचूक वाचकांप्रत व कमीतकमी वेळेत देण्याकरिता ग्रंथालयांचे संगणकीकरण ही काळाची गरज बनलेली आहे. ग्रंथालयांना त्यांच्या सेवा अधिक प्रमाणात व प्रभावीपणे देण्याकरीता ग्रंथालयाचे संगणकीकरण आवश्यक आहे. तसेच ग्रंथालयातील दैनंदिन करावी लागणारी नित्याची कामे अत्यंत कमी वेळेत करण्यासाठी देखील ग्रंथालयाचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे.

संशोधकाने या विषयाचे महत्व ओळखून 'पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्य, ग्रंथालयीन सेवा व संगणकीकरणाची स्थिती विषयीचा अभ्यास' या विषयाची संशोधनकरीता निवड केलेली आहे. सदरच्या संशोधनामध्ये संशोधकाने या महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह, ग्रंथालयीन सेवा व संगणकीकरणाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास केलेला आहे. सध्या पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या वाचनसाहित्याचा अभ्यास केलेला आहे. आयुर्वेद ही आता वैद्यकशास्त्राची एक शाखा बनलेली असून तिचा वापर व प्रसार आंतरराष्ट्रीय स्तरावर होवू लागलेला आहे. आयुर्वेद ही रोग बरा करण्याची प्राचीन,धार्मिक,शास्त्रीय आधार असलेली उपचार पध्दती आहे.

पश्चिम महाराष्ट्रात इतर विभागांच्या तुलनेत सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालये आहेत. या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा वाचनसाहित्यसंग्रह, सेवा व संगणकीकरण यांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास केलेला आहे.

महाविद्यालयीन शिक्षणामध्ये ग्रंथालयांची भूमिका महत्वपूर्ण असते. त्यातच वैद्यकशास्त्राचे शिक्षण देणाऱ्या महाविद्यालयांमधील ग्रंथालयांचे स्थान महत्त्वाचे आहे. संशोधनाच्या दृष्टीने उच्च शिक्षणामध्ये विचारमंथन सुरु असते. या विचारमंथनाला योग्य दिशा दाखवण्यासाठी महाविद्यालयीन ग्रंथालयांचा विकास होणे गरजेचे आहे. वाचनसाहित्य संग्रह किती आहे तसेच या महाविद्यालयाचे ग्रंथालयीन कार्यक्षमता वाढवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या संगणकीकरणाची सद्यःस्थिती काय आहे आणि ग्रंथालयामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास सदरच्या संशोधनात संशोधकाने केलेला आहे.

## १.२) विषय निवडी मागील भूमिका :-

ग्रंथालये व माहितीशास्त्रातील स्थित्यंतरे पाहता ग्रंथालयाच्या सद्य परिस्थितीचा अनुमान घेऊन ती कशी अद्ययावत व आधुनिक करता येतील याकडे ग्रंथपालाने लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. ग्रंथालयाचे वाचनसाहित्यामध्ये झालेली प्रचंड वाढ, तंत्रज्ञानाचा वापर, इंटरनेटचा वापर, ई साहित्याचा वापर यामुळे ग्रंथालये त्यांच्या पारंपारिक कार्याला नवीन स्वरूपात तंत्रज्ञानाचा वापर करून सादर करत आहेत. शैक्षणिक ग्रंथालयात वाचकांच्या गरजा वाढत आहेत व त्यांना अचूक माहिती त्वरित उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.

वैद्यकीय शिक्षण प्रणालीस सर्व शिक्षणक्रमात सर्वाधिक महत्त्व आहे व हे शिक्षण मानव चिकित्सा निदान व सामाजिक स्वास्थ राखण्यास मदत करते. या क्षेत्रात

जास्तीतजास्त साहित्य उपलब्ध आहे तसेच त्यामध्ये नाविण्य निर्मितीचे प्रमाण जास्त आहे. वैद्यकीय शिक्षणात सर्व पॅथी पैकी आयुर्वेद विभागास ही तेवढेच महत्त्व आहे परंतु या विषयात संस्था कमी आहेत; तरी देखील त्या महत्त्वपूर्ण कार्य करत आहेत. ग्रंथालयाची आवश्यकता इतर शैक्षणिक ग्रंथालयाप्रमाणे आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयाकरीता पण आवश्यक आहे.

अॅलोपॅथी महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा अभ्यास विस्तृत प्रमाणात झाला आहे परंतु आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाचा अभ्यास हवा तसा झालेला नाही.

**१.३) संशोधन समस्या विधान** :

अभ्यासकाने ''पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयातील वाचनसाहित्य, ग्रंथालयीन सेवा व संगणकीकरणाची स्थिती विषयीचा अभ्यास.'' यावर अभ्यास करण्याचे ठरविले आहे.

**१.४) संशोधनाची आवश्यकता** :

''पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्य, ग्रंथालयीन सेवा व संगणकीकरणाची स्थिती याविषयीचा अभ्यास'' हा विषय संशोधकाने निवडलेला आहे हा विषय निवडण्यामागील संशोधकाची भूमिका म्हणजे या विषयाचे सामाजिक महत्त्व जाणने हा आहे. तर वैद्यकशास्त्राचा विद्यार्थी सातत्याने संशोधन करणारा असतो, त्यामूळे त्याच्या महाविद्यालयीन शिक्षणामधील त्याचा अभ्यास परिपूर्ण व अद्ययावत असणे आवश्यक असते. त्यानूसार त्याच्या वाचनाविषयीच्या गरजा असतात. आयुर्वेद ही वैद्यकशास्त्राचीच एक शाखा आहे. त्यामूळे आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयामधील वाचनसाहित्य संग्रह कसा आहे, त्याचे स्वरूप कसे आहे व ग्रंथालयीन वाचनसाहित्याची वस्तुस्थिती लक्षात घेणे आवश्यक आहे.

वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण ठरविण्यासाठी सदर संशोधनाची मदत होईल वाचनसाहित्यातील उणीवा व जमेच्या बाजू लक्षात आल्या त्यामुळे वाचनसाहित्य निरपेक्षपणे निवड करण्यासाठी व्यवहार्य मार्गदर्शन मिळण्यास मदत होईल. वाचनसाहित्य संग्रहाच्या विकासाच्या सर्वोत्कृष्ट पध्दती निवडण्यासाठी देखील मदत होईल, तसेच कोणते वाचनसाहित्य संग्रहित करावे आणि कोणते साहित्य ग्रंथालयातून रद्दबातल करावे याबद्दल सदरील संशोधन दिशादर्शक ठरेल.

देशातील कोणत्याही राज्यात भारतीय चिकित्साप्रणालीच्या आयुर्वेद, युनानी, सिध्द, डॉक्टरांना अॅलोपॅथी औषधे वापरण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. या दृष्टीने सर्व आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहामध्ये आधुनिक

वाचनसाहित्य उपलब्ध असणे क्रमप्राप्त झालेले आहे. त्यानूसार पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांकडे तसे वाचनसाहित्य उपलब्ध आहे किंवा नाही यांचा आढावा घेता आला.

भविष्यकाळासाठी या महाविद्यालयांचे ग्रंथालयांनी त्यांच्या वाचनसाहित्य संग्रह विकासाच्या दृष्टीने कोणत्या योजना आखणे आवश्यक आहे याचीही वस्तूनिष्ठ माहिती सदरच्या संशोधनातून प्राप्त झाली आहे.

आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांतून कोणकोणत्या सेवा दिल्या जातात. याची कल्पना आली तसेच त्यांच्या सद्यःस्थितीची माहिती मिळाली. या महाविद्यालयांच्या ग्रंथालयाव्दारे दिल्या जाणाऱ्या सेवा पूरेशा आहेत किंवा त्यांच्यामध्ये वाढ करणे आवश्यक आहे, याविषयीची माहिती मिळाली जेणेकरून जास्तीत जास्त सेवा, जास्तीत जास्त वाचकांना प्रभावीपणे देण्यामध्ये सदरील संशोधनाचा उपयोग होईल. सद्यःस्थितीतील सेवांचे गुण व दोष यांची कल्पना येईल.

ग्रंथालयांचे कार्य अचूकपणे, वेगाने, प्रभावीपणे होण्यासाठी ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे. ग्रंथालयीन सेवा परिपूर्णपणे व प्रभावीपणे देण्यासाठी ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे ही काळाची गरज बनलेली आहे. आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांनी माहिती संप्रेषणाचे कार्य करणे आवश्यक असते. त्यानूसार त्यांचे संगणकीकरण करणे आवश्यक असते. आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयाचे संगणकीकरणाची सद्यःस्थिती सदरच्या संशोधनाव्दारे अभ्यासली असल्याने संगणकीकरणाच्या प्रक्रियेतील घटकांचा अभ्यास केला आहे.

## १.५) संशोधनाची उद्दिष्टे :-

या अभ्यासामध्ये संशोधकाने संशोधनासाठी खालील उद्दिष्टे निश्चित केलेली आहे.

१) पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांचा आढावा घेवून त्यांच्या ग्रंथालयांच्या सद्यःस्थितीचा अभ्यास करणे

२) पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील संगणकी करणाच्या स्थितीचा आढावा घेणे.

३) पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाचे विश्लेषण करणे.

४) पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील सेवांचा अभ्यास करणे.

५) आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाच्या विकासासाठी व आधुनिकीकरणासाठी शिफारशी व बेस्ट प्रॅक्टिसेस सूचविणे.

**१.६) गृहितके :–** According to P.V. Young Hypothesis is a provisional central idea which becomes the basis for fruitful investigation is known as hypothesis.[1]

या अभ्यासामध्ये संशोधकाने संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित केलेली आहे.

१) पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयातील संगणकी–करणाची स्थिती साधारण चांगली आहे. परंतु अद्ययावत सेवांचा अभाव आहे.

२) पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये ई–रिसोर्सेचा हवा तसा वापर आढळून येत नाही.

**१.७) संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :–**

सदरच्या संशोधनामध्ये संशोधकाने पश्चिम महाराष्ट्रातील आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य यांचे अधिकृत संकेतस्थळावरील उपलब्ध यादीतील महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची सदरील अभ्यासासाठी निवड केलेली आहे.

महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्टया कोकण, पश्चिम महाराष्ट्र, खानदेश, विदर्भ मराठवाडा असे विभाग केलेले आहेत. या सर्वच विभागामध्ये आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, औद्योगिक क्षेत्रामध्ये पश्चिम महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. इतर विभागाच्या तुलनेत सर्वच बाबतीत पश्चिम महाराष्ट्र पुढारलेला आहे. सहकारी तत्वावरील साखर कारखानदारी मध्ये पश्चिम महाराष्ट्राचे स्थान महाराष्ट्रात प्रथम क्रमांकाचे आहे.

संपूर्ण महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये पश्चिम महाराष्ट्राची भूमिका महत्वपूर्ण राहिलेला आहे. पश्चिम महाराष्ट्र या विभागास भौगोलिक संरचना खूपच चांगली लाभलेली आहे. महाराष्ट्रातील पश्चिम महाराष्ट्राला चांगल्या प्रकारची लाभलेली मृदा, पाण्याच्या सोयी–सुविधा, साधने, सिंचनाचे छोटे–मोठे प्रकल्प, जलसंधारणाची झालेली कामे यांमुळे या विभागामध्ये आर्थिक सुबत्ता आलेली आहे. शैक्षणिक व औद्योगिक विकासामुळे पश्चिम महाराष्ट्राची ओळख संपूर्ण महाराष्ट्राला आहे.

भारताच्या पश्चिमेला स्थान असणाऱ्या महाराष्ट्राच्या पश्चिम दिशेला पश्चिम महाराष्ट्र आहे. पश्चिम महाराष्ट्र या विभागामध्ये सोलापूर, कोल्हापूर, सांगली, सातारा, पुणे व अहमदनगर या सहा जिल्ह्यांचा समावेश होतो. पश्चिम महाराष्ट्राला 'देश' म्हणतात.

पश्चिम महाराष्ट्राचे शिक्षण क्षेत्रातील योगदान महत्वपूर्ण असेच राहीलेले आहे. तसेच या विभागाची प्रगती नेत्रदीपक ठरलेली आहे. शिक्षणक्षेत्रातील प्रगतीकरीता उच्च शिक्षणाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणावर होणे आवश्यक असते. त्यानुषंगाने उच्च

शिक्षणाच्या प्रगतीकरीता महाविद्यालयांची ग्रंथालये ही माहिती संप्रेषणाची केंद्रे बनलेली आहेत. कोणत्याही महाविद्यालयाचे ग्रंथालय त्यांच्या पितृसंस्थेशी संबंधित सर्व शाखांच्या विद्यार्थ्यांना, संशोधकांना सर्व माहिती व माहितीचे स्त्रोत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करत असते, म्हणूनच या ग्रंथालयांचा शास्त्रीय विकास होणे क्रमप्राप्त आहे.

पश्चिम महाराष्ट्रातील एकूण २२ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी ०६ अनुदानित व १६ विनाअनुदानित महाविद्यालये यांचे पुरतेच हे संशोधन मर्यादित आहे. सदरील संशोधनामध्ये फक्त पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालया पुरतेच मर्यादित आहे. सदरील संशोधनामध्ये २०१५–२०१६ पर्यंत स्थापन झालेल्या आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा अभ्यास केलेला असून ते २०१६–१७ वर्षापूरतेच मर्यादित आहे. या संशोधनामध्ये अभिमत विद्यापीठांतील आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयाचा अभ्यास केलेला नाही.

### १.८) काही संज्ञा :

**१) पश्चिम महाराष्ट्र** :–पश्चिम महाराष्ट्र हा महाराष्ट्राच्या सहा प्रभागांपैकी एक प्रभाग आहे. या प्रभागामध्ये एकूण सहा जिल्हयांचा समावेश होतो. सोलापूर, सांगली, सातारा, पुणे, कोल्हापूर, अहमदनगर ह्या जिल्ह्यांचा समावेश होतो. पश्चिम महाराष्ट्रातील पुणे हा जिल्हा प्रमुख जिल्हा म्हणून ओळखला जातो. पश्चिम महाराष्ट्राच्या पश्चिमेला सह्याद्री पर्वत, उत्तरेला खानदेश, पूर्वेला मराठवाडा, दक्षिणेला कर्नाटक राज्य आहे. पूर्वेला हा भाग डोंगराळा आणि उताराचा आहे. गोदावरी व कृष्णा व त्यांच्या उपनद्या या प्रदेशातून वाहतात.[२]

**२) आयुर्वेद** :– "आयुर्वेद हे भारताचे वैशिष्टयपूर्ण असे वैद्यकशास्त्र असून ते पृथ्वीवरील सर्वात प्राचीनतम वैद्यकशास्त्र आहे तसेच आयुर्वेद म्हणजे आयुष्याचे ज्ञान देणारे शास्त्र आहे.''[३]

आयुर्वेद हा शब्द संस्कृत भाषेतून आलेला आहे. आयुः+र्वेद असा हा शब्द बनलेला आहे. आर्यु म्हणजे जीवन आणि र्वेद म्हणजे विज्ञान किंवा ज्ञान अर्थातच जीवणाचे ज्ञान म्हणजेच आयुर्वेद होय.[४]

**३. महाविद्यालय** :–

१. महाविद्यालय ही संस्था पदवी आणि पदव्युत्तर विदयार्थी तसेच व्यावसायिक समुदायाला विविध अध्यापनाच्या साधनाव्दारे आणि विद्याशाखांव्दारे महाविद्यालयातील

प्रवेशित विदयार्थ्यांचा व्यक्तिमत्त्व विकास करून त्यांना शिक्षण प्रदान करणारी संस्था आहे.

२. “माध्यमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर एका शाखेत प्रवेश घेण्यासाठी केलेले कला व विज्ञान शाखा हे विभाजन म्हणजेच महाविद्यालय होय.’’[५]

३. तज्ञ लोकांचा एकत्रित आलेला समाज किंवा विद्यापीठाशी संलग्नित असलेला किंवा अभ्यास किंवा सूचना देण्याच्या हेतूने एकत्रित आलेला समाज/लोकांचा समूह) म्हणजे महाविद्यालय[६]

“College means any institution, whether known as such or by any other name which provides for a course of study for obtaining any qualification from a university and which in accoudance with the rules and regulations of such university, is recognized as competent to provide for such university, is recognized as competent to provide for such courses of study and present students undergoing such course of study for the examination for the award of such qualifications[7]

**४. ग्रंथालय :–**

ग्रंथालय हे असे स्थळ आहे की जेथे वाचनासाठी, अभ्यासासाठी किंवा संदर्भासाठी तसेच वेगवेगळ्या उपयोजनासाठी कमी–जास्त वस्तूनिष्ठ स्वरूपात ग्रंथ ठेवलेले असतात.

A building, room or set of rooms, containing the collections of books for the use of public or of some particular portion of it, or of the members of some society or the like, a public institution or establishment, charged with care of collection of books and the duty of reading the books accessible to those who required to use them[8]

"Library - Collection Books, Public or private room or building where these are kept, similar collection of films, records, computer routines etc., or place where they are kept, series of book issued in similar buildings as set."[9]

**५. महाविद्यालयीन ग्रंथालय :–**

शैक्षणिक अधिकारकर्त्यांनी अर्थातच संस्थापकांनी विदयार्थी व शिक्षकांच्या त्यांच्या विषयांशी संबंधित माहितीच्या गरजा त्यांना पुस्तके, नियतकालिके, इतर ग्रंथेतर साहित्य इ. आणि अभ्यासक्रमाशी संबंधित सेवाव्दारे पूर्ण होण्यासाठी महाविद्यालयाचे आवारात स्थापित करण्यात आलेले ग्रंथालय म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालय होय.

परमार, पी. पी. यांच्या मते ''ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयाचा अविभाज्य घटक की जो विदयार्थी व शिक्षक यांच्या वाचनविषय/माहितीच्या गरजा भागवण्यासाठी संघटित व प्रशासकीय पद्धतीने तयार केलेला असतो.''[१०]

सेहगल आणि सेठी यांच्या मते ''महाविद्यालयाव्दारे स्थापित केलेले, नियंत्रण करून त्यांच्या विदयार्थी व शिक्षकांच्या वाचनाविषयीच्या माहितीविषयीच्या गरजा भागवण्यासाठी चालवले जाणारे ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयीन ग्रंथालय होय.''[११]

गौर यांच्या मतानूसार ''महाविद्यालयाकडून त्यांच्या विदयार्थी व कर्मचाऱ्यांना वापरण्यासाठी संघटीत केलेले आणि चालवले जाणारे ग्रंथालय म्हणजेच महाविद्यालयीन ग्रंथालय होय.''[१२]

**६. सेवा :–**

हॉर्नबी यांच्या मतानुसार ''लोकांच्या गरजांची पूर्तता करणारी कोणतीही प्रणाली किंवा व्यवस्था म्हणजेच सेवा होय.'' उदा . बस सेवा, दूरध्वनी सेवा, आरोग्य सेवा, ग्रंथालय सेवा इ.[१३]

**७. ग्रंथालय सेवा :–**

सेहगल आणि सेठी यांच्या मतानुसार ''ग्रंथाचा वापर होण्यासाठी तसेच वापर वृद्धींगत होण्यासाठी आणि माहितीचे प्रसारण होण्यासाठी ग्रंथालय पुरवित असलेल्या सुविधा म्हणजेच ग्रंथालय सेवा होय.''[१४]

गौर यांनी ग्रंथालय सेवांची व्याख्या खालील प्रमाणे केली आहे. ''ग्रंथाचा आणि ग्रंथातील तसेच नियतकालिकातील व इतर माहिती प्रसारणाचे साधनातील माहितीचे प्रसारण करणे म्हणजेच ग्रंथालय सेवा होय.''[१५]

**८. वाचनसाहित्यसंग्रह :–**

ग्रंथालयामध्ये उपलब्ध लिखित आणि अलिखित अशा स्वरूपातील वाचनसाहित्याचा समावेश होतो.

Collections are developed by librarians and library staff by buying or otherwise acquiring materials over a period, based on assessment of the collections, shaped over time by bibliographic experts.

**९. संगणकीकरण :–**

ग्रंथालयातील उपार्जन, देवघेव, तालिकीकरण, संदर्भ आणि नियतकालिकाचे नियंत्रण इ. पारंपारिक पद्धतीने केली जाणारी काम स्वयंचलित, अर्धस्वयंचलित डेटा प्रोसोसिंग यंत्राच्या (संगणकाच्या) वापराव्दारे करणे यालाच संगणकीकरण असे म्हणतात.[१६]

दैनंदिन, पुन्हा पुन्हा करावी लागणारी कामे, लिपीकवर्गीय कामे यंत्राचा वापर करून ग्रंथालयाव्दारे सेवा देवून ग्रंथालयाची कामे पार पाडणे. ग्रंथालय संगणकीकरण ही इन्फर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी करीता वापरली जाणारी सर्वसाधारण संकल्पना आहे, की जी हाताने कराव्या लागणाऱ्या कामाऐवजी ग्रंथालयात वापरात आलेली आहे.

### १.९) संशोधनाची पद्धती : –

एम. एच. गोपाल यांनी त्यांच्या इन्ट्रोडक्शन टू रिसर्च प्रेसिनट इन सोशल सायन्सेस या ग्रंथात केलेली संशोधनाची व्याख्या पुढील प्रमाणे आहे.

''संशोधन म्हणजे अत्यंत पद्धतशीरपणे घेतलेला सत्याचा किंवा अज्ञाताचा शोध म्हणजे संशोधन होय.''[१७]

चार्ल्स बुशा आणि स्टिफन हार्टर यांच्या मते ''संशोधन म्हणजे ज्ञानप्राप्तीसाठी घेतलेला शोध.''[१८]

संशोधनाचा विषय, कालावधी व स्वरूप यांवर संशोधन पद्धतीची निवड करणे आवश्यक असते. प्रस्तूत संशोधनामध्ये संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे.

### १.९.१) संशोधन तंत्रे व माहिती संकलनाची साधने :–

या संशोधन अभ्यासासाठी संशोधकाने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे व माहिती गोळा करण्यासाठी पाहणी, प्रश्नावली या तंत्राचा वापर केला आहे. या तंत्राच्या सहाय्याने केलेल्या माहितीचे विश्लेषण आणि त्या माहितीची केलेली तर्कशुद्ध चिकित्सा यांचा वापर करून माहितीचे संकलन केलेले आहे.

### १.९.२) माहिती विश्लेषण पद्धती व सादरीकरण :–

प्रस्तूत संशोधनामध्ये सांख्यिकी व गुणात्मक विश्लेषण तंत्राचा वापर केलेला आहे. वाचनसाहित्याचा आढावा घेण्यासाठी, सेवांचा तसेच संगणकीकरणाच्या स्थितीचा अभ्यास करण्यासाठी सांख्यिकी तसेच गुणात्मक तंत्राचा वापर करून माहितीचे विश्लेषण केलेले आहे. सदरच्या संशोधनामध्ये आवश्यक तेथे विभाजित स्तंभालेख, जोड स्तंभालेख, वृत्तालेख इ. आरेखीय सादरीकरणाच्याव्दारे माहितीचे विश्लेषण केले आहे.

## संदर्भसूची :-


1. Young, P.V. (1973). Scientfic social surveys and research. New Delhi : Prentice Hall. p. 207
2. Chopra, P. (Ed.). (1982). Religion and communities of India. New Delhi: Vision Books. p. 54-55
3. Ranade, S., & Paranjape, G.R. (1981). Ayurvedacha Itihas va parichay. Pune : Anmol Prakashan, p. 7
4. Palange, M.P., & Deshpande, R. (1992). Sharirkriya vidnan Bhag-1. Pune : Anand Prakashan, p.9
5. Good, C.V. (1959). Dictionary of Education, (Second Edation), New York: McGraw Hill Book Company Excl. p. 110
6. Oxford University Press. (1933). Oxford English Dictionary. London : Oxford University Press. p. 623
7. U.G.C.(1998). University Grants Commission Act - 1956 (Revised Dec. 1985) : Rules and Regulations. New Delhi:University Grant Commission p. 12
8. Oxford University Press. (1933). Oxford English Dictionary. London : Oxford University Press. p. 242
9. Allen, R. E. (1984), The Pocket Oxford Dictionary of current English. Oxford : Clarendor Press, p. 421
10. Parmar, P.P. & et. al. (Ed.) (1989). Encyclopeadic Dictionary of Library and Information Science (Vol-I.) New Delhi : Anmol Publications. p. 259
11. Sehagal, R., & Sethi, S. (1998). A to Z library profession Dictionary. New Delhi : Ess Ess Publications.
12. Gaur, P. (1980). Glossary of Library Science Technical Terms. Patna: Library Science Publication.
13. Hornby, A. (1971). The Advanced Learners Dictionary of Current English (2 ed). London : Oxford, ELBS & OUP Press.
14. Sehagal, R., & Sethi, S. (1998). A to Z library profession Dictionary. New Delhi : Ess Ess Publications.
15. Gaur, P. (1980). Glossary of Library Science Technical Terms. Patna: Library Science Publication.
16. Uddin, Hanif. (2009). Library Automation : A Study of the AIC, Bansodc and National Libraries of Bangladesh. p. 35-36
17. Patil, V. B. (2004) Sanshodhan Padhati. Pune : Prashant Publications.
18. Aagavane, R. (2004). Mahavidyalaya Granthalaya. Granth Parivar. No. 10 p. 11-17

## प्रकरण – २ रे

# पूर्वसंशोधनाचा आढावा

संशोधन करताना संशोधनासंबंधी साहित्याचा शोध घेणे आवश्यक असते. याचे प्रमुख कारण म्हणजे यापूर्वी संबंधित विषयामध्ये झालेले संशोधन, संबंधित विषयावर प्रकाशित नियतकालिकामधील संशोधनपर लेख, पुस्तके, संकेतस्थळे यांचा अभ्यास केल्याने संशोधनासाठी एक महत्वाची दिशा प्राप्त होते. तसेच संबंधित विषयाची परिपूर्ण माहिती आणि त्या विषयाची व्याप्ती, आवाका तसेच उणीवा समजण्यास मदत होते. संशोधनाचे संबंधित विषयाचा चिकित्सक आणि परिपूर्ण अभ्यास करण्यासाठी अभ्यासकास दिशा प्राप्त होते. पूर्वी संशोधकाने केलेले संशोधन वाचनसाहित्याच्या पूर्वाभ्यासामुळे संबंधित विषयावर विविध मत–मतांतरे जाणून घेण्यासाठी उपयोग होतो. संशोधनाच्या विषयाचे मूळ अर्थातच त्या विषयाचा गाभा समजण्यासाठी आणि त्याचा सार समजण्यासाठी साहित्याच्या पूर्वाभ्यासाचा उपयोग होतो.

पूर्वाभ्यासाचे महत्त्व सांगताना प्रा. रा.ना. घाटोळे म्हणतात, ''हि पहिली आवश्यक अट आहे कारण त्याशिवाय विषयाला लागणारे पूर्वज्ञान प्राप्त होत नाही. अशा प्रारंभिक ज्ञानाशिवाय किंवा सैद्धांतिक अभ्यासाशिवाय कार्य करणे म्हणजे अंधारात चाचपडणे होय.''[१]

सदर अभ्यासासाठी संशोधकानेही वाचनसाहित्यसंग्रह, सेवा व संगणकीकरण या विषयावर पूर्वी झालेल्या संशोधनाचा आढावा घेतलेला आहे.

**१) अमेकर, उमेश दत्ताराम (२०१३ – २०१४)** यांनी ''सरस्वती शिक्षण संस्था खारघर, नवी मुंबई अंतर्गत तंत्रनिकेतन अभियांत्रिकी व्यवस्थापन कॉलेजमध्ये ग्रंथालयात देण्यात येणाऱ्या सेवांचा व सुविधांचा अभ्यास.'' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात पदवी अभ्यासक्रमासाठी सादर केलेला प्रकल्पात, तंत्रनिकेतन अभियांत्रिकी महाविद्यालयात दिल्या जाणाऱ्या सेवांचा अभ्यास करून सेवा वृद्धींगत करण्यासाठी सूचना केलेल्या आहेत.

**२) कोठारे, सुदर्शन सुरेश (२०१३–२०१४)** यांनी ''बांद्रा ते अंधेरी या विभागातील निवडक शिक्षणशास्त्र पदवी महाविद्यालयातील ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधांचा अभ्यास.'' यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात पदवी अभ्यासक्रमासाठी सादर केलेल्या प्रकल्पात, शिक्षणशास्त्र पदवी महाविद्यालयाच्या ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवांचा तसेच त्यांच्या परिणामकारकतेचा अभ्यास केलेला आहे.

**३) किणिंगे, स्वाती विमलनाथ (२००८–२००९)** यांनी ''हातकंणगले तालुक्यातील महाविद्यालय ग्रंथालयांच्या ग्रंथालय सेवा व सुविधांचा अभ्यास'' या अभ्यासाद्वारे महाविद्यालयीन ग्रंथालयातील सेवा–सुविधांची परिणामकारकता जाणून घेऊन तसेच वाचकांच्या प्रतिक्रीया जाणून घेऊन योग्य त्या शिफारशी केल्या आहेत. अभ्यासकाने ग्रंथालयात सेवा–सुविधा देत असताना येणाऱ्या अडचणींचा देखील अभ्यास करून त्या विषयी सूचना केल्या आहेत.

**४) कांबळे, रूपाली गणपती (२०१३–२०१४)** यांनी ''कोल्हापूर येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय ग्रंथालयातील सेवा–सुविधांचा अभ्यास'' या प्रकल्पात कोल्हापूर येथील श्री शहाजी छत्रपती महाविद्यालयाचे ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन त्या ग्रंथालयासंबंधी वाचकांच्या प्रतिक्रीया जाणून घेऊन योग्य त्या शिफारशी केल्या आहेत. तसेच ग्रंथालयात सेवासुविधा देताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करून योग्य ती दिशा दर्शविली आहे.

**५) चव्हाण, माया रमेश (२००३)** यांनी लिहिलेल्या ''पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाच्या वाचकांना मिळणाऱ्या सेवांचा अभ्यास '' हा प्रबंध नाशिक यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठास सादर केलेला आहे. या प्रबंधामध्ये पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयातील वाचकांना देण्यात येणाऱ्या विविध सेवांचा चिकित्सक अभ्यास करून ग्रंथालयातून वाचकांना कोणकोणत्या सेवा उदाः– संदर्भसेवा, प्रतिलिपी सेवा, ग्रंथ देवघेव सेवा, नियतकालिक सेवा, संगणक सेवा, इंटरनेट सेवा, ई–बुक्स सेवा, सिडी रोम सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव इ. सेवा देण्यात येतात. वाचकांच्या गरजांचा विचार करून वाचनसाहित्य संग्रह विकास करणे व वाचकांना वेळेत सेवा पुरविणे ही महत्त्वाची बाब लक्षात येते.

**६) पाटील, प्रशांत श्रीपतराव (२००३–२००४)** यांनी ''राजाराम बापू इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग साखराळे ग्रंथालयः एक अभ्यास'', या अभ्यासात इंजिनिअरिंग महाविद्यालयाच्या ग्रंथालयाच्या वाटचालीचा आढावा घेतला आहे. वाचनसाहित्यसंग्रहाचा विकास व ग्रंथेतर वाचनसाहित्याचा आढावा घेऊन त्याच्याआधारे शिफारशी केलेल्या आहेत. ग्रंथालयातील ग्रंथेतर वाचनसाहित्य व वाचनसाहित्य संग्रह चांगला आहे. सर्व वाचक अभियांत्रिकी विभागातील असलेकारणाने अभ्यासक्रमाशी निगडीत क्रमिक पुस्तकांची मागणी वाचक जास्त करतात. वृत्तपत्रे व नियतकालिके पुरेशी आहेत. संगणकीकरणाच्या सुविधा ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहेत.

इंटरनेट सुविधा, मुक्तव्दार सुविधा जास्त प्रमाणात उपलब्ध व्हाव्यात असे निष्कर्ष व शिफारशी सदरच्या संशोधनात करण्यात आलेल्या आहेत.

**७) पाटील, स्नेहल (२००२–२००३)** यांनी ''कोल्हापूर शहरातील प्राचार्य डॉ. बाळकृष्ण ग्रंथालय, राजाराम महाविद्यालय कोल्हापूरः एक अभ्यास.'' या प्रकल्पाद्वारे शैक्षणिक ग्रंथालयाचे अवलोकन करून खालील टिपणी केल्या आहेत. महाविद्यालयाच्या ग्रंथालयाची स्वतंत्र व प्रशस्त इमारत आहे. या ग्रंथालयाचा ग्रंथसंग्रह अत्यंत समृद्ध आहे. यामध्ये पाली, अर्धमागधी, कन्नड, जर्मन, संस्कृत सारख्या भाषेतील दुर्मिळ ग्रंथ आहेत. या ग्रंथालयाच्या वाचकांबरोबरच अन्य महाविद्यालयातील वाचकही मोठ्या प्रमाणावर ग्रंथालयाचा उपयोग करतात. या ग्रंथालयाचे ग्रंथपाल पद सतत शासनाकडून तात्पुरत्या स्वरूपात भरले जाते. कोल्हापूर शहारातील सर्वात जुने महाविद्यालय असल्याने अतिशय दुर्मिळ व संदर्भग्रंथाने परिपूर्ण असणाऱ्या या ग्रंथालयामध्ये येणाऱ्या नियतकालिकांची संख्या २७ इतकी आहे.

**८) चव्हाण, सुहास भाऊसाहेब (२००३–२००४.)** यांनी ''दत्ताजीराव कदम आर्ट्स, सायन्स ॲण्ड कॉमर्स कॉलेज इचलकंरजीः एक अभ्यास'' याचा अभ्यास करताना ग्रंथालयाच्या वाचनसाहित्यसंग्रहाचा अभ्यास केलेला असून वाचकांना दिल्या जाणाऱ्या सेवांचा देखील अभ्यास केलेला आहे. वाचकांच्या गरजा शोधून उपलब्ध माहितीच्या आधारे शिफारशी केल्या आहेत. वाचनसाहित्य निवडीसाठी ग्रंथालय समितीची मदत व विदयार्थ्यांचा सल्ला विचारात घेतला जातो. विदयार्थ्यांना वाचनसाहित्य निवडण्यासाठी ग्रंथालयामध्ये मुक्तव्दार पद्धतीचा वापर केला जात नाही. दर्जेदार नियतकालिकांच्या अंकाच्या खंडांचे बायडींग केले जाते व ते वाचकांच्या मागणीनूसार उपलब्ध करून दिले जातात. आंतरग्रंथालयीन देवघेव योजनेमध्ये या ग्रंथालयाने सहभाग घेतलेला नाही. ग्रंथालयात विविध कामांची, सेवांची माहिती वाचकांना प्रशिक्षणाव्दारे दिली जाते असे निष्कर्ष सदरील संशोधन प्रकल्पातून काढलेले आहेत.

**९) नागरे, शिवाजी ज्ञानदेव–(२००४)** यांनी लिहीलेल्या पिंपरी चिंचवड शहरातील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयाचा विकास हा प्रबंध नाशिक यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठास सादर करण्यात आला सदरील प्रबंधामध्ये पुणे व पिंपरी चिंचवड मधील आयुर्वेद महाविद्यालयांच्या ग्रंथालयांचा सखोल व चिकित्सक अभ्यास करताना ग्रंथालयाची ओळख, ग्रंथालयाच्या विविध विभागाची उदाः इमारत, वाचनसाहित्यसंग्रह विभाग, नियतकालिक विभाग, संगणक विभाग, कर्मचारी, इंटरनेट,

आज्ञावली, विविध सेवा यांची सखोल माहिती देण्यात आली आहे. संशोधकाने केलेल्या सुचनामूळे ग्रंथालयास वाचनसाहित्य संग्रह करण्यास दिशा मिळते.

**१०) टेकाळे, दत्तात्रय रंगनाथ–(२०१३)** यांनी आपल्या एम्.फिल् प्रबंधामध्ये लिहिलेल्या सिंहगड टेक्निकल एज्युकेशन संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या ग्रंथालयाच्या वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचा अभ्यास हा प्रबंध पुणे, टिळक महाराष्ट्र विद्यापीठास सादर करण्यात आला आहे. या प्रबंधामध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची ओळख, वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचे महत्त्व, पारदर्शकता, वाचनसाहित्यसंग्रह विकास करताना वाचकांच्या गरजा विचारात घेण्यात याव्यात यासाठी संशोधन करण्याची गरज आहे. भविष्यामध्ये वाचनसाहित्य संग्रह विकासाची धोरणे, प्रकार, विकास योजना या विषयांवर संशोधकाने संशोधन होण्याची शिफारस केलेली आहे.

**११) गवारे, मंदा रामराव २००७–२००८ः** यांनी ''कृष्णा वैद्यकिय महाविद्यालय, कराड ग्रंथालय संगणकीकरणः एक अभ्यास'' केलेल्या प्रकल्पात कृष्णा मेडिकल कॉलेजमधील ग्रंथालय संगणकीकरणाचा अभ्यास करून संगणकीकरणाच्या प्रगतीचा देखील अभ्यास केलेला आहे.

**१२) देशपांडे, मीरा शामराव (२००७–०८)** यांनी ''हिराचंद नेमचंद वाचनालय या ग्रंथालयाचे संगणकीकरणःएक अभ्यास'' या प्रकल्पात हिराचंद नेमचंद वाचनालय यांच्या संगणकीकरणाचा आढावा घेतला आहे.

**१३) माडे, छाया विठ्ठलराव (२००७–०८)** यांनी मध्ये ''पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालय, अहमदनगर येथील ग्रंथालयाच्या संगणकीकरणाचा अभ्यास'' या विषयावर प्रकल्प सादर केलेला आहे.

**१४) राऊत, प्रतिभा (२००८)** यांनी सादर केलेल्या Collection Development & Services of Government college Libraries in Mumbai City & Suburban हा प्रबंध टिळक महाराष्ट्र विद्यापीठाने सादर केला. या प्रबंधामध्ये मुबंई शहर व परिसरातील शासकीय महाविद्यालयाच्या ग्रंथालयांचा वाचनसाहित्यसंग्रह विकास याचा सखोल अभ्यास करून ग्रंथालयात कोणकोणत्या सेवा दिल्या जातात याविषयी आपले मतप्रवाह व्यक्त करण्यात आले आहेत. वाचनसाहित्याच्या संग्रहाचा विकास करताना तसेच सेवा देत असताना अंदाजानूसार ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रह विकासाला गती मिळण्यास सदर प्रबंधाची मदत होते.

**१५) शिंदे, अतुल उत्तमराव (२००९–२०१०)** यांनी एस्.एन.डी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲण्ड रिसर्च सेंटर येवला ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात पदवी अभ्यासक्रमासाठी सादर केलेला संशोधन प्रकल्प आहे. या प्रकल्पात संशोधकाने ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा आढावा घेऊन ग्रंथालयीन सेवा व सुविधांचा अभ्यास केलेला आहे व त्या अनुषंगाणे शिफारशी केलेल्या आहेत. प्रस्तुत विषयात नमुद केलेल्या महाविदयालयातील वाचकांच्या गरजांचा अभ्यास केलेला आहे.

सदरच्या अभ्यासात संशोधकास पुढीलप्रमाणे निरीक्षणे नोंदविलेली आहेत. प्रस्तुत ग्रंथालयात वाचकांना चांगल्या दर्जाच्या सेवा व सुविधा दिल्या जातात. तसेच ग्रंथालयात सर्वच प्रकारच्या भौतिक सुविधा देण्यात आल्या आहेत. पण संशोधनासाठी आवश्यक असलेले वाचनसाहित्य संदर्भग्रंथ, ग्रंथेतर वाचनसाहित्य अपुरे आहे.

**१६) नौगण, अर्जुन विजय (२००९–२०१०)** यांनी ''मुळशी तालुक्यातील मारणे येथील आलार्ड औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा अभ्यास'' या प्रकल्पात संशोधकाने ग्रंथालयाच्या विविध वाचनसाहित्याचा आढावा घेतलेला असून ग्रंथालयाच्या सद्यःस्थितीचा अभ्यास केलेला आहे. आणि त्याअनुषंगाने त्यांनी खालीलप्रमाणे निरीक्षणे नोंदवून खालील प्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत. आंतरग्रंथालय देवघेव योजनेत महाविद्यालयाचा सहभाग नाही, सार सेवा, व सूची सेवा ग्रंथालयामार्फत दिली जात नाही. ग्रंथालयामध्ये मुक्तव्दार पद्धती असणे आवश्यक असून देवघेव विभागातील सेवकवर्ग वाढवण्याची गरज आहे.

**१७) मार्था (२०१२)** यांनी आपल्या लेखाद्वारे असोशिएशन ऑफ रिसर्च लायब्ररीज, रिपोर्ट ऑन कलेक्शन, खर्च आणि सेवा ...... कृती यावर प्रकाश टाकला असून त्यांनी १९८६ पासून खर्चाचे ग्राफिक्स स्वरूपात सादरीकरण केलेले आहे. लेखकाने एकूण वाचनसाहित्य संग्रहापैकी ई–वाचनसाहित्य संग्रहाकरीता केलेल्या खर्चाच्या तूलनात्मक सांख्यिकीय सादरीकरण केलेले आहे.

**१८) रोचा (२०११)** यांनी विविध ग्रंथालयांनी आणि त्यांच्या अधिकार मंडळांनी ई–जर्नलच्या संग्रहाचे व्यवस्थापन करण्यासाठी बनविलेल्या विविध धोरणात्मक मार्गदर्शनाचा अभ्यास सदरील संशोधनामध्ये केलेला आहे; तसेच त्यासंबंधीच्या कळ मुद्यांचादेखील अभ्यास केलेला आहे. ई–जर्नल्सची निवड, उपार्जन, संपादन व व्यवस्थापन याबाबीसंबंधीच्या अनेक महत्वाच्या मुद्यांचा अभ्यास सदरील संशोधनामध्ये केलेला आहे.

**१९) रिनाल्डो (२००७)** यांनी त्यांच्या The Use of Policies and selection criteria in the identification of special collections and rare book materials

in art research libraries कला संशोधन ग्रंथालयामधील विशेष वाचनसाहित्यसंग्रह ओळख व दुर्मिळ ग्रंथ यांच्या विकासामध्ये धोरणाचा व निवड पात्रतेचा उपयोग याचा अभ्यास केलेला आहे. युनायटेड स्टेटमधील काहीच प्रातिनिधीक स्वरूपातील कला ग्रंथालयांचा अभ्यास सदरील संशोधनात करण्यात आलेला आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालयांकडे बहुतांशी वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण नसल्याचे या सर्व्हेवरून लक्षात आलेले आहे.

**२०) मेक (१९८७)** यांनी मोठ्या उपनगरीय क्षेत्रामधील सारख्या आकाराच्या महाविद्यालयीन ग्रंथालयीन संदर्भसेवांचा अभ्यास केला. प्रत्येक महाविद्यालयांची ग्रंथालये व संदर्भविभागाचा प्रोफाईल विकसित केला आहे. सदरील अभ्यासामध्ये संशोधकाने संशोधन सेवा पुरविण्यासाठी ग्रंथपालांना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास केलेला आहे. ग्रंथालयीन संदर्भसेवा पुरविण्यासाठी दिल्या जाणाऱ्या वेळेचा देखील अभ्यास संशोधकाने सदरच्या संशोधनामध्ये केला आहे. त्यासाठी संशोधकाने ग्रंथपालांच्या मुलाखती घेतलेल्या आहेत.

**२१) गिलसन (२०११)** वाचकांच्या गरजांची पूर्तता करण्यासाठी आणि व्यक्तिगत पातळीवर संदर्भसेवा देण्यासाठी संदर्भसेवांचा आराखडा व त्यांची निर्मिती याविषयीचा अभ्यास सदरील संशोधनपर लेखात केलेला आहे. संदर्भसेवा देण्यासाठी ऑनलाईन व व्यक्तीगत पातळीवर केलेल्या प्रयत्नांचा अभ्यास सदरील संशोधनामध्ये केलेला आहे. ग्रंथालयीन सेवा त्यांच्या सेवांच्या दर्जाच्या उन्नतीसाठी वेळेत व खात्रीशीर सेवा देण्याची गरज प्रतिपादित केली आहे. यामध्ये व्यक्तिगत व ऑनलाईन – स्टाफिंगच्या मॉडेल्सवर चर्चा केलेली आहे.

**२२) प्रोफिटस् (२००८)** शैक्षणिक ग्रंथालयातील टेक्स्ट मेसेसिंगचा साधन म्हणून वापर करून दिल्या जाणाऱ्या संदर्भसेवांच्या संदर्भातील संशोधनपर लेख असून यामध्ये हार्डवेअर, सॉफ्टवेअर, कामाचे तास, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांवर खर्च, सेवा जीवण, वाचक यांचा अभ्यास सदरील लेखात केलेला आहे.

**२३) महेश आणि गुप्ता (२००८) :** ग्रंथालय व माहितीकेंद्रे यांच्याकडून प्रचलित जागरूकता सेवा ही एक महत्त्वाची ग्रंथालयीन सेवा वाचकांना पुरवली जाते. ग्रंथालय केंद्रीत सेवा बनण्यापेक्षा प्रकाशन केंद्रीत सेवा अशा प्रकारचे स्वरूप या सेवांना येत असल्याचे या लेखात नमूद केलेले आहे. विविध प्रकारच्या प्रचलित जागरूकता सेवा व त्यांच्यापुढील आव्हाने यांच्याबाबतीत विविध बाबींवर सदरील लेखाद्वारे प्रकाश टाकलेला आहे.

**२४) स्टे मारीई (२०११)** "Medical Indexing in the U.S." या लेखामध्ये वैद्यकीय क्षेत्रातील इंडेक्सींग याविषयावर अभ्यास केलेला असून संपूर्ण यु.एस.भर या अभ्यासाची ओळख आहे. या अभ्यासामध्ये डेंटिस्ट्री, न्यूरॉलोजी, ॲक्युपंक्चर या संदर्भातील साहित्याचे देखील Indexing करण्यात आलेले आहे.

**२५) हसन (१९७६)** यांना दिल्ली येथील ग्रंथालयामधील असणाऱ्या प्रतिलिपी सेवांचा अभ्यास केलेला आहे. या ग्रंथालयामधील प्रतिलिपी सेवा देण्यासाठी तसेच इतर उपलब्ध साधनांचा उल्लेख केलेला आहे. कॉपीराईट कायदा व विविध प्रतिलिपी साधनांचा अभ्यास सदरील केलेला आहे. सध्याची सेवांची स्थिती सुधारण्यासाठी व वापर वाढण्यासाठी विविध शिफारशी केल्या आहेत. आंतरग्रंथालयातील सहकार्याचे महत्त्व प्रतिपादित केले आहे.

**२६) रावेन (२०११) :** उपार्जन ग्रंथपालांनी त्यांचा वेळ व पैसा वाचवण्यासाठी विविध सूचीय साधने आणि उत्पादनांचा उपयोग करण्याची गरज सदरच्या लेखातून व्यक्त केलेली आहे.

**२७) सिंग (२०१३)** यांनी त्यांच्या ग्रंथालयीन सेवावरील तंत्रज्ञानाचा परिणाम यालेखामध्ये नमूद केले आहे की, भारतामधील अंकिय ग्रंथालय चळवळ वेगाने वृद्धिंगत होत आहे आणि पारंपारिक ग्रंथालये देखील अंकिय ग्रंथालयांकडे वाटचाल करू लागली आहेत. विविध संस्थांमध्ये व सरकारी खात्यांमध्ये अंकिय ग्रंथालय बनवण्यामध्ये आर्थिक बाब अडथळा बनत असल्याचे नमूद केलेले आहे. विविध महाविद्यालये, विद्यापीठे व संशोधन संस्थांच्या एकत्रीकरणातून/एकमेकांच्या सहकारातून व यु.जी.सी. व इन्फ्लिबनेटच्या पुढाकारातून 'कन्सोर्शिया'चा विकास करून त्यामाध्यमातून ग्रंथालय सहकार वाढवण्यास सुरूवात झाल्याचेही त्यांनी नमूद केलेले आहे.

**२८) जयप्रकाश आणि बालसुब्रमनि (२०११)** यांनी त्यांच्या लेखामध्ये ग्रंथालयातील विविध कामे करण्यासाठी व परिपूर्णपणे ग्रंथालयीन सेवा देण्यासाठी तसेच ग्रंथालय परिपूर्ण कार्यान्वित होण्यासाठी आणि ग्रंथालय वाचकांचा वेळ वाचवण्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण अत्यावश्यक असल्याचे नमूद केलेले आहे. तामिळनाडू राज्यामधील विद्यापीठीय ग्रंथालयांच्या संगणकीकरणाच्या स्थितीचा शोध त्यांनी घेतलेला आहे. त्यांनी ग्रंथालय संगणकीकरण, त्याची गरज, विद्यापीठीय ग्रंथालयासाठीची आवश्यकता यावर चर्चा केलेली आहे. संगणकीकरणाच्या विविध

स्तरावर ग्रंथालयीन अधिकारी व कर्मचारी यांना येणाऱ्या विविध समस्यांचा आढावा सदरच्या संशोधन लेखाद्वारे घेतलेला आहे.

**२९) उद्दिन व हसन (२०१२)** यांनी त्यांच्या 'a study on use of Information Technology in Library Service : A study on same selected Libraries in Nothern part of Bangladesh.' सदरील अभ्यासाद्वारे उत्तर बांग्लादेशातील काही निवडक ग्रंथालयांपैकी ५४.५५% ग्रंथालये संगणकाच्या उपयोग ग्रंथालयीन कामासाठी करतात असा निष्कर्ष काढलेला आहे. ९०.९१% ग्रंथालये ही प्रतिलिपी सेवा देतात. सदरील संशोधनामध्ये ७२.७३% ग्रंथालयामध्ये दूरसंचार सेवा असल्याचे आढळून आले आहे. कोणत्याही ग्रंथालयामध्ये ई–मेल सेवा यासारख्या ऑनलाईन संप्रेषण सेवा, ऑनलाईन दस्तऐवज पुरवठा सेवा नसल्याचे आढळून आले आहे.

**३०) नौशाद अली (२०११)** यांनी "A Study on the Application and use of Library Internet Services at the Indian Institute of Technology, Delhi" या विषयावर अभ्यास केलेला असून त्यांनी ४०० वाचकांची नमूद निवड केलेली होती; सदरील अभ्यासासाठी मुलाखत, निरीक्षण व अनौपचारिक मुलाखती या साधनांचा वापर केलेला होता. आय.आय.टी. दिल्ली मधील वापरकर्त्यांना इंटरनेट वापराचे ज्ञान आहे. ७५% वाचक इंटरनेटचा वापर करतात त्यापैकी ३७.५०% वाचक संशोधनाबरोबरच, असाईनमेंट लिहिण्यासाठी (गृहपाठ) तसेच ज्ञानामध्ये भर टाकण्यासाठी उपयोग करत असल्याचे सदर संशोधकांना आढळून आलेले आहे. एकूण प्रतिसादकांपैकी ३६.७५% वाचक ई–नियतकालिकांचा वापर करत असल्याचे तसेच ७५% वाचकांना वेब–ओपॅकची माहिती असल्याचे आढळून आले आहे.

**३१) कोण्णूर आणि राजेंद्र (१९९४)** यांनी त्यांच्या "Automated Library: Same Experiences" या संशोधनपर लेखामध्ये ग्रंथालयामधील संगणकांच्या वापराचे महत्त्व आणि ग्रंथालय संगणकीकरणाचे ग्रंथालयीन कामामधील व सेवेमधील फायदे नमूद केलेले आहेत.

**३२) लार्ज (२००६)** "ICT for Library and Information Professional : Training Package for developing countries provides and skills dealing with application of ICT to Library and Information services" यामध्ये ग्रंथालयीन संगणकीकरणाची आवश्यकता स्पष्ट केलेली असून प्रसंगानुरूप व तंत्रज्ञानाच्या नियोजनाच्या साधनांचा अभ्यास केलेला आहे. उदा. दूरदृष्टीन निर्मिती, पद्धती विश्लेषण आणि आराखडा यांची तंत्रज्ञानाचे नियोजनाचा विकास करताना आवश्यकता या बाबींवर प्रकाश टाकलेला आहे.

**३३) कुमार (२००७)** यांनी त्यांच्या "Statues of Medical College Libraries in Karnataka and Maharashtra : A Comparative Study" या सत्यांच्या Ph.D. च्या थेसिसमध्ये एकूण ७ प्रकरणांच्याद्वारे अभ्यास केलेला आहे. त्यामध्ये प्रस्तावना, संशोधनाचा पूर्वाभ्यास, संशोधन पद्धती, भारतातील वैद्यकीय शिक्षण, विश्लेषण, निष्कर्ष व समारोप यांचा समावेश आहे. पहिल्या प्रकरणामध्ये वैद्यकीय महाविद्यालयीन ग्रंथालयांचा विकास, अंकिय स्वरूपातील माहिती स्त्रोत यांचा समावेश आहे. तर दुसऱ्या प्रकरणामध्ये नॅशनल मेडिकल लायब्ररी, भारतातील मेडिकल कॉलेजेस, महाराष्ट्र व कर्नाटक राज्यामधील वैद्यकिय महाविद्यालये, हेलनेट, मेडिकल ग्रंथालयीन स्टँण्डर्स, ऑस्ट्रेलियन हेल्थ लायब्ररीज आणि कन्जूमर हेल्थ लायब्ररीयन. रिसर्च मेथडॉलॉजी या प्रकरणामध्ये अभ्यासाची उद्दिष्टे, परिकल्पना, अभ्यासाचे महत्व, संशोधनाची साधने, नमूना निवड आणि संशोधनाची मर्यादा नमूद केलेल्या आहेत. मेडिकल एज्युकेशन इन इंडिया या प्रकरणामध्ये Indian Medical Council Act, 1956, Information, Education & Communication, Health research and Types of Course यांचा अभ्यास केलेला आहे.

**३४) दांदगव्हाळ, सागर नाथू** यांनी त्यांच्या 'Library Authomation : Best Practices' या संशोधनपर लेखात प्रस्तावना, ग्रंथालयीन संगणकीकरणाचा विकास, ग्रंथालय, संगणकीकरणाची गरज, ग्रंथालय संगणकीकरणाची उद्दिष्टे, ग्रंथालय संगणकीकरणाची विशेष वैशिष्ट्ये, ग्रंथालय संगणकीकरणाची क्षेत्र, ग्रंथालय संगणकीकरणासाठीच्या मुलभूत गरजा, ग्रंथालय संगणकीकरणासाठीच्या आज्ञावली, ग्रंथालय संगणकीकरणाचे फायदे, ग्रंथालयीन संगणकीकरणाचे तोटे ग्रंथालयीन संगणकीकरणासमोरील आव्हाने, ग्रंथालय संगणकीकरणासाठी शिफारसी यांचा सविस्तर अभ्यास सदरच्या संशोधनामध्ये केलेला आहे.

**३५) बोरकर कैलास (२००४)** ग्रंथपालाची माहिती तंत्रज्ञान युगातील भूमिका ग्रंथपरिवारच्या प्रस्तूत लेखात स्पष्ट केलेली असून संगणकाचा ग्रंथालयामध्ये कसा करावा; तसेच नव–नवीन तंत्रज्ञानाचादेखील वापर कशा प्रकारे ग्रंथपालांनी करावा, याची माहिती सदरच्या लेखामध्ये दिलेली आहे.

माहिती तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयाचे योगदान जास्तीत जास्त प्रमाणात देण्यासाठी ग्रंथपालांची भूमिका महत्वाची असून ग्रंथपालांनी स्वतः संगणकाचे ज्ञान प्राप्त करून घेणे आवश्यक असल्याचे नमूद केलेले आहे. तसेच ग्रंथपालांनी ग्रंथालयाचे संगणकीकरण करून ग्रंथालयीन साधनसामग्रीचा जास्तीत जास्त वापर करण्यावर भर

देणे आवश्यक असून प्रिंट व नॉन प्रिंट वाचनसाहित्याचे ग्रंथालयामधील व्यवस्थापन संगणकाच्या सहाय्याने करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे.

**३६) देशपांडे राजेंद्र व कृष्ण शिवाजी (२०००)** यांच्या शरीरक्रिया विज्ञान भाग–१, या ग्रंथामध्ये आयुर्वेदाचा परिचय करून देण्यात आला आहे. तसेच वात, पित्त, कफ, श्वसन प्रक्रिया, आहार, अन्न पचनक्रिया यांचा अभ्यास केला आहे व आयुर्वेदाचे मानवी जीवनातील महत्त्व दर्शविले आहे.

37) Indian System of Medicine and Homeopathy in India [2001] – Planning and Evolution Cell Development of ISM and Ministry of Health and Family Welfare, GOI.

या पुस्तकामध्ये भारतातील आयुर्वेद, होमिओपॅथी, युनानी महाविद्यालयाची यादी व संख्या, हॉस्पिटल्सची यादी व संख्या, विदयार्थी संख्या, पत्ते व महाविद्यालयासंबंधी सखोल व परिपूर्ण माहिती दिली आहे.

**३८) भांडारकर, पु.ल. (१९९९)** : सामाजिक संशोधन पद्धती, औरंगाबादः विद्या प्रकाशन सदरील ग्रंथातून संशोधकाला गृहितके व त्यांचे स्वरूप व संशोधनातील त्यांचे महत्व याबद्दलची माहिती मिळाली. संशोधनाच्या विविध पद्धतींचा अभ्यास करण्यास या ग्रंथाची मोलाची मदत झाली.

**३९) जरारे, वि. ल. (२००४)** : सामाजिक शास्त्राची संशोधन प्रणाली, अकोला : अद्वैत संशोधनाकरीताच्या संकेतिकरण सारणीकरणाच्या अभ्यासासाठी सदरच्या ग्रंथांची मोलाची मदत झाली. विविध माहिती संकलनाच्या साधनांबाबतची माहिती देखील सदरील ग्रंथांतून मिळाली.

**४०) कुंभार, राजेंद्र (२०००)** : महाविद्यालय व विद्यापीठीय ग्रंथालये, नाशिक, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, २००० या ग्रंथातून महाविद्यालयीन ग्रंथालयांची उद्दिष्टे आणि कार्याविषयी सविस्तर माहिती प्राप्त झाली.

**४१) निकोसे, सत्यप्रकाश (२००७)** : ग्रंथालय आणि माहितीशास्त्र पद्धती, नागपूर, प्रज्ञा प्रकाशन या ग्रंथातून संशोधनासाठी परिपूर्ण माहिती मिळाली. या ग्रंथातून विविध संशोधन पद्धतीसंबंधीची परिपूर्ण माहिती मिळाली.

**४२) आयुर्वेद भारतीय संस्कृतीचा** कोष भाग–१ या ग्रंथामध्ये आयुर्वेद शिक्षणाची वाढ व विकास कशाप्रकारे उपयोगी आहे हे सांगण्यात आलेले आहे.

**४३) जोशी, महादेवशास्त्री**: भारतीय संस्कृती कोष खंड–१ या ग्रंथामध्येदेखील आयुर्वेदाची माहिती दिलेली आहे.

**सारांश :–**

उपरोक्त साहित्य शोधावरून असे दिसून येते की, अभ्यासकांनी विविध महाविद्यालयीन प्रक्रियेचा सविस्तर अभ्यास केला आहे यात प्रामुख्याने ग्रंथालयाचा साहित्यसंग्रह विकास, संगणकीरण, सेवा, वाचकांच्या गरजा, वाचन साहित्याचा उपयोग हा दिसून येतो. विविध स्तरावरील अभ्यासात असे आढळून आले की, आयुर्वेद महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचा अभ्यास फारसा झाला नाही. यामुळे अभ्यासकाने सदर विषयाची संशोधनासाठी निवड केलेली आहे.

## संदर्भ :–


1) Ghatole, R.N. (2003). Samajik Sanshodhan tatve va paddhati. Nagpur: Shree Mangesh Prakashan.
2) Amekar, U. D. (2014). Saraswati shikshan sanstha kharghar, navi mumbai antargat tantraniketan aabhiyantriki vyavsthapan college madhye granthalayat denyat yenarya sevancha va suvidhancha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
3) Kothare, S. S. (2014). Bandra va andheri ya vibhagateel nivdak shikshanshatra padavi mahavidyalayateel granthalayat dilya janarya seva suvidhancha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
4) Kininge, S. V. (2009). Hatkanangale talukyateel mahavidyalay granthalayanchya granthalay seva va sividhancha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
5) Kambale, R. G. (2014). Kolhapur yethil shri shahaji chhatrapati mahavidyalay granthalayateel seva - suvidhnacha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
6) Chavan, M. R. (2003). Pune jilha shikshan mandalache ayurved mahavidyalay granthalayachya vachakana milnarya sevancha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
7) Patil, P. S. (2004). Rajarambapu institute of technology college of engineering sakharale granthalay:ak aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
8) Patil, S. (2003). Kolhapur shaharateel pracharya doctor balkrishna granthalay,rajaram mahavidyalaya kolhapur:ak aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
9) Chavan, S. B. (2004). Dattajirao kadam arts,science and commerce college ichalkarajee:ak aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
10) Nagre, S. D. (2004). Pimpari chinchwad shaharateel ayurved mahavidyalayanchya granthalayacha vikas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
11) Tekale, D. R. (2013). Sanhgad technical education sansthechya antargat yenarya aabhiyantriki mahavidyalayachya granthalayachya vachansahitya vikas dhoranacha aabhyas (Unpublished doctoral dissertation). Tilak maharashtra vidyapeeth.
12) Gaware, M. R. (2008). Krishna vaidyakeey mahavidyalay,karad granthalay sanganakeekaran:ak aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.

13) Deshpande, M. S. (2008). Hirachand nemchand wachanalay ya granthalayache sanganeekaran :ak aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
14) Made, C. V. (2008). Padmashri doctor vitthalrao vikhe patil aabhiyantriki mahavidyalay ahmednagar yethil granthalayachya sanganakikaranacha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
15) Raut, P. (2008). Collection development and services of government college libraries in mumbai city and subarban (Unpublished doctoral dissertation). Tilak maharashtra vidyapeeth.
16) Shinde, A. U. (2010). S.N.D. College of Engineering and Research Centre granthalay-seva suvidhancha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
17) Naugan, A.V.(2010). Mulasi talukyateel marane yethil alard aushadhnirmanshashtra mahavidyalayachya granthalayacha aabhyas (Unpublished M.Lib. Project). Y.C.M.O.U, Nashik.
18) Mech, T. (1987). The realities of college reference service:a case study in personal utilization. Reference librarian, 19, 285-308.
19) Profit, K. (2008). Text messaging at reference:a preliminary survey. Reference librarian, 49(2), 129-134.
20) Mahesh, G. (2008). Changing paradigm in journals based current awareness services in libraries. Information services and use, 28(1), 59-65.
21) Hassan, R. (1976). Reprographic services in delhi libraries. Annals of library science and documentation, 23(2), 173-178.
22) Raven, B., & Isthari, B. (2011). Use of internet services at IGM library university of hydrabad:a study. SRELS journal of information management, 48(2).
23) Jayprakash, M., & Balsubramani, R. (2011). Statues of automation in university libraries in tamilnadu:a survey. European journal of scientific journal, 53(1), 17-24.
24) Uddin, & Hassan. (2012). Use of information technology in library services:a study on some selected libraries in nothern part of bangaladesh. International journal of library and information science, 4(3), 34-44.
25) Naushad, A. N. (2011). The application and use of library internet services at the indian institute of technology delhi. Library philosophy and practice, 1-15.

26) Konnur, M. B., & Rajendra, A. R. (1994). Automated library:same experiences. Harrold of library science, 33, 24-28.

27) Kumar, V. (2007). Statues of medical college libraries in karnataka and maharashtra:a comparative study (Unpublished master's thesis). Shivaji university kolhapur.

28) Ronaldo, K. (2007). Evaluting the future:special collections in art libraries. Art documentation journal of the art library society of north america, 26(2), 38-47.

29) Borkar, K. (2004). Mahiti tantradnan yugatil granthpalachi bhumika. Granth parivar, 3.

30) Bhandarkar, P. L. (1999). Samajik Sanshodhan Paddhati. Aurangabad: Vidya prakashan .

31) Jarare, V. L. (2004). Samajik sanshodhan pranali. Akola: Advait prakashan.p.2

32) Satyaprakash, N. (2007). Granthalay aani mahitishashtra sanshodhan paddhati. Nagpur: Pradnya prakashan.

## प्रकरण – ३ रे

# आयुर्वेद : स्वरूप व शिक्षण प्रणाली

**३.१ आयुर्वेदाचे स्वरूप** : आयुर्वेद हे पृथ्वीवरील सर्वात प्राचीनतम असे वैद्यकशास्त्र आहे. आयुर्वेद या शब्दामध्ये आयुः व वेद अशी दोन पदे आहेत. ''आयु या शब्दाचा अर्थ आयुष्य आणि वेद म्हणजे ज्ञान म्हणजेच आयुर्वेद म्हणजे आयुष्यासंबंधीचे सर्व ज्ञान आहे.''[१]

वेदांना संपूर्ण भारतीय वाङ्.मयात पूज्य स्थान आहे, कारण ते अत्यंत उपयुक्त आहेत. सुश्रृत, चरक, काश्यप व वाग्भट या आयुर्वेदाच्या जेष्ठ शास्त्रज्ञांनी आयुर्वेद हा अथर्ववेदाचा उपवेद मानला आहे. मात्र त्याला काश्यपाने पाचवा स्वतंत्र वेद मानला आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद या वेदांमध्ये प्राधान्याने अध्यात्मिक उपदेश आहेत. मात्र आयुर्वेदामध्ये इहलोक व परलोक या दोहोंना हितकर असा उपदेश आहे यामुळेच आयुर्वेदाला पुण्यतम असे म्हणतात.

''वेदामध्ये २६०, सुश्रुत अहिंजेने ३८५, चरकामध्ये ५००, धन्वंतरीमध्ये निघन्टु मध्ये ३२४, द्रव्यामध्ये ६६६ आयुर्वेद वनस्पतींचा उल्लेख केल्याचे दिसून येते.''[२]

आयु– आयु म्हणजे जीवंत असण्याचा काळ शरीर व जीव अर्थातच आत्मा यांचा संयोग म्हणजेच जीवन होय आणि असे जीवन जगण्याच्या अविच्छिन्न कालाला आयु असे म्हणतात. आयुर्वेदाने आयुची केलेली व्याख्या यापेक्षाही चांगली आहे. ती अशी शरीर, इंद्रिये, मन (सत्व) आणि आत्मा यांच्या एकत्र संयोग असणाऱ्या कालाला आयु म्हणतात. वायुचे धारि, जीवित, नित्यग, अनुबंध असे पर्यायी शब्द आहेत.

वेद–विद् या धातूपासून वेद हा शब्द बनलेला आहे वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा आहे. तसेच सत्ता, ज्ञान, विचार व प्राप्ती असेही त्याचे अर्थ होतात. आयुर्वेद हे आयुष्याचे ज्ञान देणारे शास्त्र होय. यालाच शाखा, विद्या, सूत्र, ज्ञान लक्षण व तंत्र असेही म्हणतात.

**३.१.१ आयुर्वेदाची व्याख्याः**–''आयुष्याच्या दृष्टीने हितकर किंवा पथ्यकर अहितकर किंवा अपथ्यकर अशा द्रव्य, गुण, कर्म यांचे वर्णन देऊन आयुष्यासाठी सुखकर काय व दुखकर काय याचे ज्ञान आयुर्वेद शास्त्र देते. याचप्रमाणे शरीर व मन यांच्याशी हितकर–अहितकर गोष्टींचा संपर्क आल्याने जी प्रकृती किंवा विकृती उद्भवते, ते लक्षात घेऊन त्यावरून आयुष्याची मर्यादा किंवा मान ठरवण्याचे ज्ञान आयुर्वेदाकडून आपल्याला मिळते.''[३]

''आयु म्हणजे जीवन व वेद म्हणजे ज्ञान जीवनाचे सर्वांगीण ज्ञान करून देणारे शास्त्र म्हणजे आयुर्वेद हे केवळ वैद्यकशास्त्र नसून ते जीवशास्त्र आहे. जीवनविद्या आहे म्हणजेच ज्याच्यामुळे आयुष्याचे ज्ञान प्राप्त करून घेता येते ते आयुर्वेद.''[४]

## ३.२) इतिहास :–

आयुर्वेद हा शब्द संस्कृत भाषेतून आलेला आहे. आर्यु + वेंद असा हा शब्द बनलेला आहे. ''आर्यु म्हणजे जीवन आणि वेंद म्हणजे विज्ञान किंवा ज्ञान अर्थातच जीवनाचे ज्ञान म्हणजेच आयुर्वेद होय.'' आयुर्वेदीक आरोग्यामध्ये शरीर, मन आणि आत्मा यांच्या आरोग्याचा समावेश होतो. यासर्वांचे संगोपन चांगले केले तरच वैयक्तिकरित्या चांगले आरोग्य लाभू शकते.[५]

आयुर्वेद उपचारपद्धती बी.सी.ई ५,००० वर्षांपूर्वीची अतिशय प्राचीन उपचार पद्धती आहे. आयुर्वेदामधील कांही संकल्पना सिंधू संस्कृतीच्या कालखंडापासून आल्याचे आढळून येते. लिखित स्वरूपातील आयुर्वेद उपचारपद्धती वेदामध्ये समाविष्ठ होती. आयुर्वेद ही उपवेदाची किंवा अधिकचे ज्ञानाची वैदिक पंरपरेतील ज्ञान शाखा आहे. अथर्ववेदामध्ये सुद्धा आयुर्वेदाचा उल्लेख आढळतो. अथर्ववेदामध्ये ११४ ओव्यांचा आणि मंत्रोच्चरांचा उल्लेख अथर्ववेदामध्ये आहे ज्याचा उपयोग रोग बरे करण्यासाठी होतो. आयुर्वेदाच्या उत्पत्तीच्या अनेक दंतकथा आहेत. उदाः– ही उपचार पद्धती ब्रम्हदेवाने धन्वंतरीला दिलेली उपचार पद्धती आहे. अग्निसेवा या साधूने काही आयुर्वेदाच्या पारंपारिक लिखानावर प्रभाव टाकला.[६]

''पौराणिक काळामध्ये सुद्धा वैद्यकशास्त्र प्रगत होते. रामायणामध्ये लक्ष्मण ज्यावेळी रावणाकडून जखमी होतो त्यावेळी संजीवनी चिकित्सेचा उल्लेख आढळतो.''[७]

प्राचीन काळातील वेगवेगळ्या उपचार पद्धतींपैकी आयुर्वेद ही एक उपचार पद्धती आहे. या उपचार पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे ती प्राचीन उपचार पद्धती असून देखील आधुनिक युगामध्ये देखील मोठ्या प्रमाणात वापरली जाणारी उपचार पद्धती आहे.

## ३.३) आयुर्वेदाचे प्रयोजन :–

चिकित्सा करणे म्हणजेच शरिरातील धातूंचे, साम्य टिकवून ठेवून स्वास्थ टिकविणे आणि धातूंचे साम्य बिघडून स्वास्थ नष्ट होवून व्याधी झाल्यास पुन्हा साम्य प्रस्थापित करणे यासाठी आवश्यक असणारे कार्य किंवा कर्म होय. हे आयुर्वेदाचे कार्य आहे. याठिकाणी धातू हा शब्द शरीरातील दोष सप्तधातु आणि मल या सर्वच शरीर घटकांना उद्देशून वापरलेला आहे. हे साम्य उत्पन्न करण्यासाठी आयुर्वेदाचे

स्वास्थाच्या दृष्टीने व व्याधींचे दृष्टीने तीन भाग केले आहेत. त्याला त्रिस्कंध आयुर्वेद म्हणतात. यामध्ये हेतू, औषध आणि लिंग असे हे तीन भाग आहेत.

### ३.३.१ त्रिस्कंध आयुर्वेद हेतू :-

आरोग्य टिकविण्यासाठी आवश्यक आणि व्याधी निर्माण होण्यासाठी आवश्यक अशा सर्व कारणांचा या हेतू प्रकारामध्ये समावेश होतो. लिंग :- लिंग यालाच लक्षण असे म्हणतात. आरोग्याचे लक्षण काय आणि व्याधी आणि विकृतीची लक्षणे काय याचे वर्णन लक्षण किंवा लिंग या भागामध्ये येते. औषध :- स्वास्थ्य रक्षणासाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींचे सेवन म्हणजेच स्वास्थ्यकर आहार-विहार हे स्वास्थ्याचे औषध आहे आणि व्याधीच्या नाशासाठी केलेले उपचार हे व्याधीवरील औषध आहे.

**आत्मा, मन आणि शरीर :-** रोगानाशाचे उपाय व आरोग्य संपदा टिकवण्याचे उपाय हे जीवंत शरिरावर करावयाचे असतात. आत्म्यामुळे हा जीवनपणा अस्तित्तवात असतो. परंतु आत्म्यावर प्रत्यक्षात काही उपाय योजावे लागत नाहीत. मन व शरीर यांचे सुस्थितीत मात्र वैषम्य निर्माण होवू शकते व त्यामध्ये मानसिक वैषम्याचा शरीरावर आणि शारिरीक वैषम्याचा मनावर परिणाम होतो, असा परस्परांचा संबंध आहे. म्हणून आत्मा, मन आणि शरीर यांचा एकत्रित संबंध असलेल्या जिवंत व्यक्तीचा विचार आयुर्वेदाला करणे आवश्यक आहे. त्यालाच चिकित्साधिकृत पुरूष असे नाव आहे. रोगाची मन आणि शरिर ही दोन आश्रयस्थाने आहेत आणि त्यांच्या क्रियांचे साम्य प्रस्थापित करण्यासाठी तीन प्रकारे चिकित्सा किंवा उपाययोजना केली जाते.

### ३.४ आयुर्वेदाचे अखंडत्त्वः-

आयुर्वेदाचे वैशिष्ट्य म्हणजे आयुर्वेद हा कायम टिकणारा आहे. जगातील इतर वैद्यकशास्त्रांपेक्षा किंवा अन्य निरनिराळ्या शास्त्रांपेक्षा आयुर्वेद शास्त्राचे वैशिष्ट्य म्हणजेच त्याचे कायमतत्व होय. आयुर्वेद हा शाश्वत आहे. आयुर्वेदाचे अखंडत्त्व दर्शवणाऱ्या १. प्राचिनतत्व २. मूलसिद्धतत्व ३. भावस्वभावनित्यत्व या तीन लक्षणांनी सिद्‌ध होते.

### ३.४.१ प्राचीनतत्व :-

आयुर्वेद प्राचीन ज्ञान आहे हे म्हणणे केवळ शब्दार्थानेच खरे आहे असे नव्हे तर ते व्यवहारानेच सिद्‌ध होते. हा व्यवहार म्हणजेच जीवसृष्टीची व विशेषतः मानवाची उत्पत्ती झाल्यापासूनच आयुष्याच्या रक्षणासाठी काय योग्य आहे, दुःख किंवा रोगाच्या निर्मितीची कारणे व त्यावरील उपाय यांचे ज्ञान आहे. हे ज्ञान प्राचीन काळापासूनच आहे म्हणजेच मानवाची निर्मिती होण्यापूर्वीच हे आयुष्य रक्षणाचे म्हणजेच आयुर्वेदाचे

ज्ञान ब्रम्हदेवाने तयार केले. निर्माण केले असे म्हणणे फारसे योग्य ठरणार नाही तर प्राचीन काळापासून अस्तित्त्व असणाऱ्या आयुर्वेदाचे ब्रम्हदेवाने स्मरण करून त्याचा उपदेश इंद्राला केला.

इंद्राला उपदेश करून सृष्टीकर्त्या ब्रम्हदेवाने जी आयुर्वेदाची प्राचीन परंपरा निर्माण केली ती त्या वेळेपासून कुठेही न थांबता सातत्याने टिकून राहिली आहे व तिचे महत्त्व व कार्यप्रणाली अबाधित राहणार आहे. कारण आयुर्वेद जाणणारे गुरूशिष्य परंपरेने सातत्याने आयुर्वेदाचे ज्ञान पुढील पिढीला ज्ञानाचे दान करत आले आहेत.

सुख म्हणजे आरोग्य आणि दुःख म्हणजे रोग जीवसृष्टी ही प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहे आणि तिला दुःख देणारी रोगाची आणि दुःखनाश करणारी उपायस्वरूप द्रव्य ही सुद्धा प्राचीन काळापासून अस्तित्त्वात आहेत. अशा द्रव्याचा उपयोग करून दुःख नाश केला तरीही पुन्हा पुन्हा दुःख निर्माण होते. कायमचा दुःखनाश झाला असे कधीच घडूच शकत नाही आणि त्यामूळेच आयुर्वेदाचे ज्ञान म्हणजेच दुःखाची कारणे, लक्षणे आणि त्यावरील उपाय यांचे ज्ञान अखंडपणे टिकून राहणार आहे.

### ३.४.२ मूलसिद्धत्वः–

द्रव्यांचे गुण कायम टिकणारे आणि कार्यद्रव्यांच्या ठिकाणचे गुण कायम न टिकणारे म्हणजे कार्याचा नाश झाल्यावर नाहीसे होणारे असतात. त्याचे कारण म्हणजे महाभूतांचे शब्दस्पर्शादी गुण हे त्रिकालाबाधित व मूलसिद्धतत्व सिद्ध आहेत. तत्त्वतः हे खरे असले तरी परंपरा सातत्याने तशा प्रकारच्या नवीन उत्पन्न होणाऱ्या कार्यद्रव्याचे ठिकाणीही तेच गुण असतात.

स्वर, द्रव्य, उष्ण, चल व अप्रतिघाततत्व हे अनुक्रमे पृथ्वी, जल, तेज, वायू व आकाश यांचे गुणधर्मही मूलसिद्धतत्वच असल्याचे वर्णन चरकाने केल्याचे आढळते. पांचभौतिक सृष्टी–मधील द्रव्याचे गुणधर्म व शरिरातील दोष, धातू, मल यांचे गुणधर्म हे मूलसिद्धतत्व व अखंड टिकणारे राहणारे आहेत हे लक्षात घेवूनच आयुर्वेदाने स्वास्थ्य व व्याधी यांचे दृष्टीने हेतू, लिंग व औषधी यांची योजना केली असल्याने आयुर्वेदाचे सिद्धांत हे कायम टिकणारे आहेत. त्यामुळे अन्य चिकित्साशास्त्रा प्रमाणे पूर्वीच्या सिद्धांतात बदल करण्याचा अनवस्थ प्रसंग आयुर्वेदावर कधीही येत नाही.

### ३.४.३ भावस्वभावनित्यत्व :–

भावपदार्थाचा स्वभाव या स्वरूपामध्ये त्या त्या द्रव्याचे ठिकाणी शरिरातील दोष, धातू, मल आदी भावपदार्थाचे गुण हे नैसर्गिकरित्याच असतात. आणि त्याचेशी समान असणाऱ्या द्रव्य–गुण–कर्मांच्या उपयोगाने त्या–त्या भावांची वाढ होणे व विरूद्ध

गुणांच्या द्रव्य–गुणकर्मानी त्यांचा शेवट होणे ही गोष्टसुद्धा स्वभाविक अशा स्वरूपातच आहे. म्हणजे हा निसर्गाचा नेहमीचा असा भावस्वभाव आहे. कार्यद्रव्ये जरी अनित्य असली तरी त्यांचे ठिकाणी असणारे गुरू–लघु आदी पाच भौतिक गुण संतान परंपरा न्यायाने नित्यच असतात. म्हणूनच गुरू, स्निग्ध, शीत आदी गुणांनी धातूंचे बृहण होणे किंवा लघु,रूक्ष, उष्ण आदी गुणांनी कर्षण होणे हा सुद्धा नित्य आढळणारा भावस्वभाव आहे. या गुणधर्मामुळेच आयुर्वेदशास्त्र हे चिरंतन शास्त्र आहे.

**३.५ आयुर्वेदाचे वैद्यकिय उपचारपद्धती म्हणून महत्त्व :–**

निरोगी आणि सक्षम जीवनाकरीता आयुर्वेदांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. नैसर्गिक साधनसामग्रीच्याव्दारे शारिरीक व्याधी व रोग बरे करण्याचे सामर्थ्य आयुर्वेदामध्ये आहे. आयुर्वेदामध्ये वनौषधी, आहारविद्या, शारिरीक श्रम, शस्त्रक्रिया, मानसशास्त्र आणि दैववाद यांचा समावेश असतो. आयुर्वेद ही वैद्यकिय उपचार पद्धती भारतीय उपचार पद्धती असून ती सध्या जगभरात प्रसार पावलेली लोकप्रिय उपचार पद्धती ठरत आहे. तिच्या जागतिक वापरामुळे या उपचार पद्धतीचे महत्त्व अधिकच वाढत चालले आहे. प्राचीन काळी मानव हा जंगलात राहत असे, त्यामुळे सभोवतालच्या निसर्गातून मिळणाऱ्या नैसर्गिक साधनसंपत्तीच्या सहाय्याने आजारावर उपचार करावे लागत होते. प्राचीन काळापासूनच लोकांचा विश्वास होता की कोणत्याही रोगावर वनस्पतीपासून बनवलेली औषधे उपाय म्हणून उपयुक्त ठरत आलेली आहे. सध्या आयुर्वेदीक औषधांचा समाजामध्ये जास्तीत–जास्त उपयोग होताना दिसत आहे. कारण ही औषधे वनौषधीपासून बनवलेली असल्याने त्यांचा दुष्परिणाम शरीरावर होत नाही. त्या उपचार पद्धतीने अत्यंत दुर्दम आजारावर देखील उपचार करण्यासाठीची सोय आहे.

**३.६ आयुर्वेदाची व्याप्ती :–** आयुर्वेदाचे जवळपास आठ शाखा पडलेल्या असून त्या त्यांच्या अवयव आणि वयांच्या गटांवरून पडलेल्या आहे. त्या शाखाः कायाचिकित्सा (शरिरांतर्गत रोग चिकित्सा), शल्यतंत्र (शस्त्रक्रिया), शालक्यतंत्र (ई.ॲण्ड.टी), कौमराभ्रार्त्य तंत्र, अगडतंत्र, वाजीकरण तंत्र, रसायन तंत्र, भूतविद्या बालकांचे आरोग्य आणि दिर्घायुष्य, मानसशास्त्र इ.)

**३.६.१ शल्यतंत्र :–** वेदना देणाऱ्या कोणत्याही वस्तूला शल्य असे म्हणतात. शल्खल् या संस्कृत धातूचा अर्थ लवकर प्रविष्ट होणे असा आहे. युद्धाच्या वेळी शरिरात बाणाची, तलवारीची टोके घुसून वेदना होत असे म्हणूनच त्याला शल्य असे नाव दिले गेले. शरीरात घुसून पीडा करणाऱ्या या गोष्टी बाहेर काढून टाकणे व त्यामूळे उत्पन्न

झालेल्या व्रणाची व इतर व्याधींची योग्य उपचारपद्धती करणाऱ्या शास्त्राला शल्यतंत्र असे नाव प्राप्त झाले.

**३.६.२ शालाक्यतंत्र** :– शलाका म्हणजे बारीक लांब सळई अथवा या आकाराची यंत्रे याच्या सहाय्याने ऊर्ध्वजत्रुगत म्हणजे तोंड, गळा, कान, घास, नाक या अवयवांचे परीक्षण व चिकित्सा केली जाते म्हणून त्याला शालाक्यतंत्र म्हणतात.

**३.६.३ कौमारभृत्यतंत्र** :– या आयुर्वेदाच्या शाखेमध्ये प्रामुख्याने बालकाचा विचार केला आहे. लहान मुलांचे पोषण, त्यांची व्यवस्था, बालकाचे आजार (ग्रहजन्य व्याधी) या सर्वांची माहिती यामध्ये विस्ताराने दिलेली आहे.

**३.६.४ कायाचिकित्सा** :–संपूर्ण शरिरामध्ये होणारे ज्वर, रक्तपित्त, शोष, उन्माद, अपस्मार, कुष्ठ, अतिसार इ. रोगांची उपचार ज्या आयुर्वेदाच्या शाखेमध्ये केली जाते, त्या शाखेला कायाचिकित्सा असे म्हणतात. काया याचा अर्थ संपूर्ण शरिर म्हणून संपूर्ण शरीरांतर्गत रोगांच्या उपचाराला कायाचिकित्सा असे म्हणतात.

**३.६.५ अगदतंत्र** :– विष नष्ट करण्यासाठी जी चिकित्सा केली जाते त्याला अगदतंत्र असे नाव सुश्रुताने दिले आहे. चरकाने यालाच विषगैरविरोधक शमन असे नाव दिले आहे. तर अष्टांगसंग्रह व अष्टांगरूदयाने या चिकित्सेला दंष्ट्रचिकित्सा असे म्हटले आहे. परिभाषा–साप, विविध विषारी किटक इ. चावल्याने किंवा त्यांच्या संपर्काने मनुष्य विषग्रस्त झाल्यास त्यावर केली जाणारी उपचारपद्धतीला अगदतंत्र असे म्हणतात.

**३.६.६ ग्रहचिकित्सा**:–अथर्ववेदामध्ये याचे अनेक उल्लेख सापडतात विविध क्रोधित देवता, पिशाच्च, भूत इ. च्या आक्रमनाने पिडीत व्यक्तींचे कष्ट अथवा त्यांना झालेल्या व्याधी पासून दूर करण्यासाठी जी उपचार पद्धती केली जाते तिला ग्रहचिकित्सा असे नाव अष्टांग संग्रहाने दिले आहे. सुश्रृताने याला भूतविद्या असे म्हटले आहे.

आयुर्वेदामध्ये भूतोन्माद, अमानूष उपसर्ग व बालग्रहाचे विस्तारपूर्वक वर्णन केले आहे. या सर्वांचा समावेश भूतविद्या किंवा ग्रहचिकित्सा मानसविकार या दृष्टीकोनातून समजून घेतले आहे आणि म्हणूनच मनाचा सत्व गुण वाढविण्यासाठी यामध्ये प्राधान्याने प्रयत्न केले जातात. यालाच चरकाने उपयाभिलूता उपचारपद्धती असे म्हटले आहे.

**३.६.७ रसायनतंत्र** :– दीर्घकालपर्यंत तारूण्यावस्था टिकवण्यासाठी तसेच आयुष्य व बल याची वृद्धी करण्यासाठी आणि शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यासाठी आयुर्वेदाची जी विशेष शाखा आहे. त्याला रसायनतंत्र असे म्हणतात.

निरनिराळी औषधे, आहार व विहार या तीनही प्रकारांनी रसायन चिकित्सा करता येते. या चिकित्सेने शरिरातील रस रक्तादी धातुंची उत्तम निर्मिती होते. रसायन चिकित्सेने म्हातारपण आणि अप्रत्यक्षरीत्या रोगांचा नाश करता येतो.

**३.६.८ वाजीकरणतंत्र** :–मैथूनशक्ती वाढविण्यासाठी आणि वीर्यवृद्धी करण्यासाठी ज्या चिकित्सेचा उपयोग केला जातो त्याला वाजीकरणतंत्र असे म्हणतात. ज्यांचे वीर्य दूषित झालेले असते अथवा जे क्षीणवीर्य म्हणतात त्यांनाही या उपचारपद्धतीचा फायदा होतो.

आयुर्वेदाचे मुख्य उद्दिष्ट शरिराचे रक्षण करणे तसेच शरिराची स्वतःच्या क्षमतेमध्ये वाढ करणे, कायम राखण्यासाठी आणि क्षमतेचे संतुलन राखण्यासाठी प्राधान्य देण्यासाठी आयुर्वेद औषधाचे शरिर, मन, आत्मा यांचे अखंडत्त्व आणि संतूलन राखणे हे उद्दिष्ट आहे. या तिन्हींचे संतूलन राखल्याने आनंद मिळतो आणि आरोग्य निरोगी राहते आणि रोगापासून वाचवण्यासाठी मदत करते.

मूलतः आयुर्वेदाचे तीन गरजेचे घटक आहे ते म्हणजे वायू, पित्त, कफ आणि रक्त या चौथा घटकाचा त्यात समावेश करण्यात आलेला आहे. भौतिक व मानसिक समस्या देखील आयुर्वेद औषध पद्धतीद्वारे उपचार करता येतात.

वायूः–प्रत्येक जीव प्राण्यांच्या निर्मिती, वाढ आणि विभाजन यावर वायू नियंत्रण ठेवतो.

पित्त :– सर्व प्रकारच्या तेजस्वी ऊर्जा आणि शरिरामध्ये उष्णता निर्माण करण्याचे काम पित्त करते. पित्त हृदयाच्या स्पंदनावर, त्वचेच्या तापमानावर रक्ताचा जोम ठेवण्यासाठी पित्ताचा उपयोग होतो.

कफ :– कफ सौम्य आणि थंड तत्वांचा शरिराला पुरवठा करण्याचे काम करते ज्यांचे संतूलन राखले नाही तर तो आजाराला निमंत्रण ठरू शकतो.

**३.७ आयुर्वेदाचे महत्त्व :–**

ॲलोपॅथीक उपचार पद्धती इतकीच आयुर्वेदीक आणि वनऔषधींची उपचार पद्धती लोकप्रिय ठरत आहे. आयुर्वेदीक व वन औषधींच्या उपचार पद्धतीचा शरिरावर कोणताही इतर दुष्परिणाम न होता रोगापचार होतो. आयुर्वेद उपचार पद्धती संपन्न आरोग्य राखते, रोगप्रतिकारक्षमता वाढवते आणि रोगास प्रतिकार करून रोग बरा करण्याचे काम ही उपचार पद्धती करते. आयुर्वेद उपचार पद्धती मानवी शरिर समतोल राखण्यास तसेच शरिरातील असमतोल आणि बिघाड टाळण्यासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे. एकूण मानवी आरोग्यामध्ये पर्यावरणाचे महत्त्व आयुर्वेदाने ओळखले आहे. मानसिक आरोग्य हे सुद्धा महत्त्वपूर्ण असल्याचे आयुर्वेद स्पष्ट करतो.

आयुर्वेदीक प्रॅक्टीशनर्स लोकांचे त्याचे समाजातील संबंधी कल्पना, त्यांच्या समस्या यांचा त्यांच्या आरोग्यावर परिणाम होतो असे स्पष्ट करतो. जीवनाच्या विविध स्तरांवर त्यांचे वैयक्तिक आरोग्य पूर्वपदावर आणून त्यांना शांती मिळण्यासाठी आणि त्यांना आत्म्याचे खरे स्वरूप लक्षात आणून देण्याकरिता आयुर्वेद मदत करतो.

आयुर्वेदामध्ये अनुवंशिकशास्त्र, स्त्रीरोग, व्याधींची कारणे, शस्त्रक्रिया, शरिरविज्ञान शास्त्र, जीवशास्त्र, आहारशास्त्र, नैतिकता, वैयक्तिक स्वच्छता, सामाजिक औषधे तसेच प्राणी जीवशास्त्र, वनस्पतीशास्त्र, लागवड शास्त्र, वनस्पतीज व प्राणीज औषध उत्पादनाचा व त्यांच्या परिणामांचा अभ्यास, रसायनशास्त्र आणि विश्व उपत्तीशास्त्र यांचा समावेश होतो. आयुर्वेद उपचार पद्धतीमध्ये वनस्पतींचा वापर केला जातो. वनस्पतींच्या तेलांचा व मसालांच्या उपयोग या उपचार पद्धतीमध्ये केला जातो. सध्या ६०० पेक्षाहून जादा वनस्पतीची सूत्रे आणि २५० स्वतंत्र वनस्पती औषधे आयुर्वेदाच्या उपचारामध्ये औषधनिर्माण करण्यासाठी वापरण्यात येत आहेत. काहीवेळा आयुर्वेदाच्या प्रक्रियेच्या अनुषंगाने वनस्पती पूडीचा वेगवेगळ्या धातूसोबत किंवा निसर्गातील वेगवेगळ्या पदार्थासोबत सूत्रानूसार मिश्रण बनवून त्यांच्याव्दारे उपचार केले जातात. अशा मिश्रणामध्ये कित्येक वनस्पती आणि वनस्पतीच्या अर्काचा देखील या उपचार पद्धतीमध्ये उपयोग केला जातो.

सध्याच्या आधुनिक वैद्यकिय शोधपद्धतीनूसार आढळून न येणारे रोग आयुर्वेदाच्या काही उपचार पद्धतीने त्यांच्या प्राथमिक स्तरावर झाल्याचे शोधता येते. खऱ्या अर्थानं आयुर्वेद हे शरीर, मन, आत्मा याविषयीचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. ते खऱ्या अर्थाने जीवनाचे ज्ञान आहे. आयुर्वेदीक औषधे विविध प्रकारची उत्पादने आणि तंत्राच्याव्दारे मानवी शरिर स्वच्छ करून त्यांच्यामध्ये संतुलन राखतात. यापैकी कांही उत्पादने तज्ञांच्या मार्गदर्शनाशिवाय घेतल्यास किंवा अयोग्य पद्धतीने घेतल्यास अपायकारक अर्थातच हाणीकारक ठरू शकतात. उदा.ः काही वनस्पती औषधी दूष्परिणाम देखील करतात किंवा पारंपारीक औषधावर परस्पर क्रिया करतात.

**३.८ भारत : आयुर्वेदाची सद्यःस्थिती –**

जगातील अनेक जुन्या औषध पद्धतींपैकी आयुर्वेद ही एक औषध पद्धती आहे. ही औषध पद्धती किंवा उपचार पद्धती भारतात खूप वर्षांपासून प्रचलित उपचार पद्धती आहे. आयुर्वेद उपचार पद्धती लिखित स्वरूपात असून शब्दांनी हाताळली जात होती. तीन प्राचीन पुस्तके महान काव्य २००० वर्षांपूर्वी संस्कृत भाषेत लिहीलेली आहेत. या महान काळांमध्ये लिखित स्वरूपातील औषधे (आयुर्वेद) बनवण्यासाठीच्या पद्धती दिलेल्या आहेत. चरकसंहिता, सुसूत्र संहिता आणि अष्टांग

आयुर्वेदीक औषधामध्ये (लोकांच्यामध्ये, त्यांच्या आरोग्यामध्ये आणि विश्वातील एकमेकांशी जोडलेले आहेत.) शरीररचना (प्रकृती) आणि जीवन शक्ती (दोष), ज्यांची नेहमी तुलना प्राचीन ग्रीक पद्धतीतील जैवशास्त्रीय घटकांशी केली जाते याच संकल्पनांचा आयुर्वेदीक डॉक्टर उपयोग प्रत्येक व्यक्तीसाठी स्वतंत्र आणि विहीत उपचार करतात त्यामध्ये वनौषधींची संयुगे किंवा आहारशास्त्र, व्यायाम आणि जीवनक्रमाबाबतच्या सूचना देतात. भारतातील जास्तीत जास्त लोक जास्तीत जास्त आयुर्वेदीक औषधे वापरतात किंवा त्यांच्याबरोबर पारंपारीक पाश्चिमात्त्य औषधे वापरतात आणि दक्षिणपूर्व आशियामध्ये विविध स्वरूपात आयुर्वेदाचा वापर केला जातो.

भारतातील जवळपास ८०% पर्यंत लोक कोणत्या ना कोणत्यातरी पारंपारीक औषधांचा वापर करतात. १९७० साली Indian Medical Central Council Act (IMCCA) ची स्थापना झाली, या कायद्यान्वये आयुर्वेद डॉक्टरांची दर्जेदार शैक्षणिक पात्रता ठरवण्यात आली आणि आयुर्वेदाच्या अभ्यासासाठी तसेच संशोधनाकरीता मान्यताप्राप्त संस्था देण्याचा  कायदा भारत सरकारने १८७१ साली करून Indian Medical Central Council Act द्वारे CCIM ची स्थापना आयुर्वेद मंत्रालयाव्दारे करण्यात आली. योग, नॅचरोपॅथी, युनानी, सिद्ध, हॉमिओपॅथी या वैद्यकशास्त्राच्या शाखांचा अभ्यास करण्यासाठी कुटूंबकल्याण आणि कुटूंब कल्याण मंत्रालय, यांचेद्वारे भारतातीतील (AYUSH) ची स्थापना करण्यात आली. आयुर्वेदाचे उच्च शिक्षणाचे प्रमुखत्व ही संस्था करते. भारतीय सरकारने आयुर्वेदाचे संशोधनाकरीता तसेच शिक्षणाकरीता वेगवेगळ्या राष्ट्रीय तसेच राज्यस्तरावर वेगवेगळ्या माध्यमाव्दारे सहकार्य केले आणि पारंपारीक संस्थात्मक औषधांना मदत केली त्यामुळे आयुर्वेदाचा प्रचार आणि प्रसार शहरात तसेच खेड्यातही झाला. राज्यपुरस्कृत Central Council or Research in Ayurvedic Sciences (CCRS) ची रचना आयुर्वेदाच्या संशोधनकरीता करण्यात आली. शहरी तसेच ग्रामीण भागातील दवाखान्यामध्ये आयुर्वेदीक व्यावसायिक दिसू लागले कारण या स्थापन झालेल्या संस्थामधून त्यांनी आयुर्वेदातील पदव्या संपादन केल्या.

भारतामध्ये २०१३ च्या आकडेवारीनुसार १८०, (पांरपारीक आयुर्वेद औषधांचे शिक्षण देणारी) प्रशिक्षण केंद्रे  स्थापन करण्यात आली. चाचेगिरी आणि अनैतिक पेटंटस्च्या विरूद्ध लढाई करण्याकरीता २००१ साली भारत सरकारने Traditional Knowledge Digital Library (TKDL) स्थापना करून आयुर्वेद, युनानी, सिद्ध यांचे ज्ञानभांडार Digital Library च्या माध्यमातून उभारले त्यामुळे या क्षेत्रासंबंधीची

माहिती वेगाने, जलद मिळू लागली तसेच माहिती दीर्घकाळ टिकण्यासाठी मदत झाली. विविध द्रव्यांवर आधारित दूर्मिळ ग्रंथाचे संग्रहण करण्यात आले. या डिजिटल ग्रंथालयाच्या माध्यमातून १०० पेक्षाहून अधिक पुस्तकांचे (पारंपारिक आयुर्वेदीक) संग्रहण या ज्ञानभांडारामध्ये करण्यात आले. विमा कंपन्या आयुर्वेदीक उपचार पद्धतीचा खर्च पाठीच्या कण्याच्या संदर्भातील अव्यवस्था, हाडांची अव्यवस्था, सांधेदुखी आणि कॅन्सर यासारख्या आजारांना देतात. देशातील आरोग्य विमाच्या दाव्यांपैकी अशा प्रकारच्या दाव्याचे प्रमाण जवळपास ५-१०% आहे.

### ३.९ भारतीय उपखंडातील आयुर्वेदाची सद्यःस्थिती :-

नेपाळमधील एकूण लोकसंख्येच्या ७५% ते ८०% लोक आयुर्वेदाचा वापर करतात आणि सर्वांत मोठ्या प्रमाणावर वापरली जाणारी नेपाळमधील औषध पद्धती आहे.[७]

श्रीलंकेतील आयुर्वेदाचे डॉक्टर अर्थातच वैद्य संस्कृत भाषेतील लिखित स्वरूपातील ज्ञानाचा उपयोग भारताप्रमाणेच करतात. परंतू त्यांच्या दोहोंच्यामध्ये काही बाबीमध्ये वेगळेपण दिसते. त्यामध्ये वनौषधीच्या वापराबाबत विविधता आढळते. इ.स. १९८० श्रीलंकन सरकारने देशी औषध मंत्रालय स्थापन केले कारण त्यांना आयुर्वेदाला (देशी औषधांना) चेतना द्यायची होती आणि त्यांचे नियमन करावयाचे होते.

देशी औषधांच्या संस्थेचे संलग्नीकरण युनिवर्सिटी ऑफ कोलंबो यांच्याकडे करण्यात आले. या संस्थेच्या माध्यमातून पदवी, पदव्युत्तर तसेच (एम्.डी.) च्या आयुर्वेद औषधे आणि शस्त्रक्रिया आणि अशाच युनानी औषधामधील पदव्या देण्याची सोय करण्यात आली. सार्वजनिक पद्धतीत इ.स. २०१० मध्ये श्रीलंकेमध्ये ६२ आयुर्वेदीक हॉस्पिटल्स आणि २०८ मध्यवर्ती दवाखाने असून ती ३ दशलक्ष लोकांची सेवा करत आहेत. श्रीलंकेच्या एकूण लोकसंख्येच्या ११% अर्थातच एकूणात श्रीलंकेमध्ये २०,००० नोंदणीकृत आयुर्वेदीक वैद्य आहेत. महावामसा या प्राचीन इतिवृत्तानूसार राजा पांडुकाभाया (४३७ बी सी.ई ते ३६७ बी.सी.ई) यांनी देशातील विविध भागामध्ये आयुर्वेदीक हॉस्पिटल्सची (सिविकासोट्ठी-साला) स्थापन केल्या होत्या. हा अलिकडील लिखित स्वरूपातील पुरावा असून हा जगातील कोणताही आजार बरा करणाऱ्या संस्थामध्ये उपलब्ध आहे. मिंहींटले हे जगातील सर्वात जुने हॉस्पिटल आहे.[८]

### ३.१० भारताबाहेरील औषधांची सद्यःस्थिती :-

आयुर्वेद ही प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील पारंपारीक औषध पद्धती आहे आणि पूर्व आधुनिक चीन आणि युरोपीयन औषधांशी तूलना करणारी आहे. जरी

१९६० च्या सुरूवातीला, पश्चिम जगामध्ये पर्यायी औषध पद्धती म्हणून उदयाला आली. विविध कायदे आणि वैद्यकिय नियमाने (जगात इतरत्र) अनियमित सराव आणि आयुर्वेदाचे व्यापारीकरण याने आयुर्वेदाच्या संबंधित काही उदाहरणामध्ये न्यायिक समस्या निर्माण झाल्या. इ.स. १९८० आयुर्वेदीक पद्धती किंवा परिभाषा 'महात्रऋषि आयुर्वेद' मध्ये स्विकारण्यात येवून तिचा वापर करण्यात आला. काही प्रकरणांमध्ये याचा आयुर्वेदाचा प्रसार करण्याच्या भागात सक्रीय लबाडी करण्याचा तसेच पद्धती चूकीच्या पद्धतीने सादरीकरण करून करण्यात आला. तो प्रयत्न आधुनिक वैद्यकिय संशोधनाच्या मानकांच्या तुलनेत करण्यात आला.

१९७० च्या दशकाच्या सुरूवातीस युनायटेड स्टेटस्मध्ये आयुर्वेदाच्या वर्गाचा प्रसार करण्यासाठी बाबा हरिदास यांनी मदत केली. त्यांनी विविध माध्यमातून व मार्गाच्याव्दारे आयुर्वेदाचा प्रसार करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी सुश्रृतासंहिता आणि चरकसंहिता याचे माऊंट मदोन्ना इन्स्टिट्यूट, कॉलेज ऑफ आयुर्वेद, आयुर्वेद वर्ल्ड आणि आयुर्वेदीक फार्मसी यांचे आस्थापनेवरून आयुर्वेदाचे वर्ग, आयुर्वेदाचा प्रसार करण्यासाठी सुरू करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वसंत लाड, सरिता श्रेष्ठ आणि राम हरिष सिंग यासारख्या आयुर्वेदामध्ये नावलौकिक शिक्षकांना त्याचबरोबर इतरही अनेक आयुर्वेद शिक्षकांना अध्यापनाकरिता बोलावले आयुर्वेद वैद्य मायकेल टाईरा लिहतो, "The history of Ayurveda in North America will always owe a debt to the "selfless coutributions of Baba Hari Dass" संयुक्त राष्ट्रामध्ये कोणत्याच राज्यामध्ये आयुर्वेदाचा उपचार पद्धती परवानाधारक किंवा नियमित नाही. आरोग्य संरक्षणाच्या क्षेत्रामध्ये आयुर्वेदाचे वैद्यधमालिश थेरपी किंवा प्रसुतीतंत्र यासारख्या डॉक्टर यांना परवाना देवू शकतात आणि काही राज्यांनी आयुर्वेदाच्या शिक्षण देणाऱ्या शाळांना मान्यता दिलेली आहे.[९]

### ३.११ आयुर्वेद शिक्षण वाढ व विकास :–

आयुर्वेदाचे संशोधन हे या आयुर्वेदाच्या आद्यमहर्षींच्या कालापासुनच सातत्याने चालू आहे. चरक व सुश्रृत या महर्षींची निरीक्षणशक्ती अतिशय सूक्ष्म होती. सृष्टीमधील मुलभूत तत्वे, त्यांचे मनुष्य शरीरातील अंश, दोनही ठिकाणी असणारे परमपदार्थ– सत्त्व, रज, तम, तसेच स्थूलही पांच भौतिक तत्त्वे यांचे विवेचन कायम आहे. चेतन तत्त्वासह असलेले पांचभौतिक घटकांनी बनलेले मनुष्य शरीर चिकित्सेला योग्य मानलेले आहे. त्यामुळे मनुष्य शरीर हीच खरी प्रयोगशाळा होती व यातील घडामोडींचे सूक्ष्म निरीक्षण करून या मनुष्य शरीरावर निरनिराळे प्रयोग करून त्यांनी आपले सर्व सिद्धांत स्पष्ट केले आहेत. त्याचप्रमाणे संशोधनासाठी निरनिराळ्या प्राण्यांचाही

उपयोग आयुर्वेदाने केलेला दिसतो मात्र आधुनिक शास्त्राप्रमाणे आयुर्वेदाने प्राण्यांचा उपयोग केलेला दिसत नाही. मनुष्यशरीर आणि प्राणीशरीर भिन्न आहे. तरीही या प्रयोगाचे महत्त्व मान्य करणे आवश्यकच आहे.

आधुनिक पद्धतीनुसार आयुर्वेदातील वनस्पती औषधींवर अनेक औषधी कंपन्या, मेडिकल कॉलजमधील फार्माकोलॉजी विभाग, रसायनशास्त्र विभाग यांनी बरेच संशोधन करून अनेक चांगली तत्त्वे, सिद्धांत शोधून काढले आहेत. कलकत्त्याची ट्रॉपिकल स्कूल ऑफ मेडिसीन ही एक महत्वपूर्ण संस्था कार्यरत आहे.

आयुर्वेदाच्या विविध शास्त्रांमध्ये अनेक तऱ्हेचे प्रयोग सातत्याने करून त्या शास्त्राच्या ज्ञानात वाढ करण्यात आली त्यामध्ये अगदतंत्र, शल्यशालाक्य, द्रव्यगुण, रसशास्त्र यांचा समावेश होतो.

आयुर्वेदाच्या उन्नतीसाठी विसाव्या शतकात सरकारने अनेक कमिट्या स्थापन केल्या. यांपैकी चोपडा कमिटी (१९४८) व पंडीत कमिटी (१९५०) या दोन्ही कमिटीने आयुर्वेदाच्या संशोधनासाठी स्वतंत्र केंद्र स्थापण करण्याकरीता केलेल्या शिफारसीनुसार गुजरात राज्यातील जामनगर येथे सेंट्रल इन्स्टिट्युट ऑफ रिसर्च इन इंडिजिनस सिस्टीम्स ऑफ मेडीसीनची स्थापना १९५० साली करण्यात आली.

केंद्रीय आरोग्य मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांची केंद्रीय आयुर्वेद अनुसंधारण परिषद  ही योजना आयोग आणि उडूप समिती यांच्या शिफारशीप्रमाणे ऑक्टोबर १९५९ मध्ये स्थापन केली गेली. या परिषदेने संपूर्ण भारतभर आयुर्वेदाचे संशोधन सुरू करून त्याचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करण्यासंबंधी सूचना केल्या.

काशी हिंदू विश्वविद्यालय येथे १९६३ साली पदव्युत्तर संस्थान स्थापन झाले. आयुर्वेदाची केंद्रीय अनुसंधान परिषद १९५९ साली स्थापन करण्यात आली असली तरी त्याला कायद्याचे स्वरूप प्राप्त होण्यास सुमारे १० वर्षाचा कालावधी लागला. दरम्यान आयुर्वेदाचे संशोधन इंडियन कौन्सिल फॉर मेडिकल रिसर्च (I.C.M.R.) परिषदेतर्फे चालवले जात होते. १९६५ पासून निरनिराळी आयुर्वेद संशोधनाची केंद्रे या परिषदेच्या अधिपत्त्याखाली काम करीत होती. यामध्ये मुख्यत्त्वेकरून औषधी द्रव्यांचे उपयोग निरनिराळ्या रूग्णांवर करून पाहण्याचे प्रमुख केंद्र होते. क्लिनिकल रिसर्च युनिट (आयुर्वेदीक टीम), कंपोझिट ड्रग रिसर्च स्किमच्या या दहा केंद्रामध्ये एकेरी वनस्पतीचे संशोधन सुरू असते. १. प्रत्येक केंद्राचे  क्लिनिंग स्क्रिनिंग युनिट अ. आयुर्वेदीक शाखा ब. मॉडर्न मेडिकल शाखा २. फार्माकोग्नासी युनिट ३. केमिकल युनिट ४. फार्माकोलॉजीकल शाखा असे चार प्रमुख भाग आहे.

पैकी आयुर्वेद शाखा निवड केलेल्या वनस्पतीचे आयुर्वेदशास्त्राच्या दृष्टीकोनातून विशिष्ट व्याधींवर कार्य कसे होते यासाठी रूग्णांना रूग्णालयात प्रवेशित करते. नंतर या रूग्णांना ती वनस्पती औषधरूपाने देऊन त्याचे काय परिणाम होतात. त्याचे निरीक्षण करून रूग्णात होत असलेल्या निरनिराळ्या बदलांची सूक्ष्म नोंद ठेवली जाते. मॉडर्न मेडिकल शाखा या प्रवेशित केलेल्या रूग्णाच्या मल, मूत्र, क्ष–किरण, रक्त तपासणी यासारख्या आवश्यक परिक्षा करून व्याधीनिदान करते व व्याधीमधील बदलांची त्यांच्या दृष्टीकोनातून नोंद घेवून ठेवते. फार्माकोग्नॉसी युनिट अर्वाचीन शास्त्राच्या दृष्टीने वनस्पती निश्चिती करते. केमिकल युनिट या वनस्पतीचे रासायनिक पृथक्करण करून त्यातील निरनिराळ्या घटकांचा सूक्ष्म अभ्यास करते आणि फार्माकोलॉजिकल युनिट वरील रासायनिक पृथ्थकरणातून निष्पन्न झालेल्या द्रव्यांचे प्राणीशरीरावर प्रयोग करून त्याच्या गुणधर्माची निश्चिती करते. या पद्धतीने या चारही शाखा एकत्रितरित्या काम करीत होत्या.

सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन इंडियन मेडिसीन अँण्ड होमिओपॅथी या परिषदेची कायदेशीररित्या १ एप्रिल १९७० रोजी स्थापना झाली. या (C.C.R.I.M.) परिषदेव्दारे पूर्वीचा १. क्लिनिकल रिसर्च युनिटस् चालू ठेवण्यात आलीच शिवाय इतर अनेक केंद्रे उघडण्यात आली यामध्ये २. औषधी द्रव्याचे निश्चितीकरण (फार्मकोग्नसी युनिट) ३. आयुर्वेदीक वनस्पतीची लागवड करून उत्तोमत्तम औषधी द्रव्ये तयार करणे. ४. खेडोपाडी जावून आयुर्वेदीक औषधांची माहिती मिळवणे व रूग्णावर उपचार करणे (मोबाईल युनिट) ५. कुटूंब नियोजनासाठी नवनवीन आयुर्वेदीक औषधी द्रव्ये शोधून काढणे (फॅमिली प्लॅनिंग युनिट) ६. आयुर्वेदातील मुलभूत सिद्धांत संशोधनात नॅशनल केमिकल लॅबोरेटरीज्, हाफकिन इन्स्टिट्युटसारखी स्थानिक संशोधन केंद्रे, अर्वाचीन पद्धतीची सरकारी रूग्णालये यांचीही बरीच मदत होत असते. संशोधन केंद्रे, अर्वाचीन पद्धतीची सरकारी रूग्णालये यांचीही बरीच मदत होत असते. संशोधनाच्या या केंद्रीय परिषदेतर्फे आयुर्वेदाबरोबरच योग, युनानी, होमिओपॅथी, सिद्ध या प्रणालीचेही संशोधन केले जात होते. पुढे–पुढे या सर्व शास्त्रीय पद्धतींना वेगवेगळ्या स्वतंत्र परिषदा (कौन्सिल) असाव्यात म्हणजे सर्वांचे संशोधन योग्य रितीने करता येईल असे ठरल्याने १९७८ पासून पुढील चार परिषदा स्थापन करण्यात आल्या.

१. सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन आयुर्वेद ॲण्ड सिद्ध
२. सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन युनानी मेडिसिन
३. सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन होमिओपॅथी
४. सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन योग ॲण्ड नॅचरोपॅथी स्थापना झाली.

सध्या या चारही परिषदांतर्फे संपूर्ण भारतात संशोधन सुरू आहे.

भारतातील पारंपारिक औषध पद्धतीमध्ये आयुर्वेद, सिद्ध, युनानी, योग व नॅचरोपॅथी या चिकित्सापद्धतींचा समावेश होतो आणि या सर्वांना केंद्रीय शासनाने मान्यताही दिलेली आहे. १९७० मध्ये भारत सरकारने एक ठराव केला व त्यानुसार ठरविले की, ॲलोपॅथी आणि आयुर्वेद, युनानी व होमिओपॅथी या चिकित्सा पद्धतींना राष्ट्रीय स्वास्थ्य योजनेला मदत केली पाहिजे.

भारतातील पारंपारिक औषध पद्धती अंतर्गत येणाऱ्या सर्व चिकित्सा पद्धतींवर (CCIM) नियंत्रण ठेवते आणि त्यांचे अभ्यासक्रम कसे असावेत, त्याची अंमलबजावणी कशी करावी, त्याची पदवी काय असावी याबद्दल निश्चित निर्णय घेते, आयुर्वेदासाठी संपूर्ण भारतभर बी.ए.एम्.एस्. ही डिग्री असून त्याचा अभ्यासक्रम सर्व राज्यात सारखाच आहे.

केवळ अनुभवानूसार वैद्यकिय रजिस्ट्रेशन देणे इंडियन मेडिसीन सेंट्रल कौन्सिल ॲक्ट १९७० प्रमाणे ऑक्टोबर ७६ पासून बंद केले होते. तेव्हापासून फक्त विद्यापीठ मान्य अशा संस्थामधून आयुर्वेदाची पदवी प्राप्त केल्यासच वैद्यकिय व्यवसाय करण्यासाठी परवानगी देण्यास सुरुवात करण्यात आली होती.

आयुर्वेदामध्ये संशोधन करण्यासाठी सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन आयुर्वेद ॲण्ड सिद्ध अशी कमिटी केंद्रीय सरकारने नेमली होती त्यामार्फत औषधी वनस्पतींची लागवड, वनस्पतींची माहिती गोळा करणे, कुटूंब नियोजनासाठी वेगवेगळी औषधे शोधून काढणे, सैद्धांतिक अभ्यास करणे, खेड्यांतील लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी योजना करणे अशी कामे केली जात होती. आयुर्वेदीक औषधे प्रमाणबद्ध व एकसारखी तयार करण्यासाठी ड्रग्ज ॲण्ड कॉस्मेटिक ॲक्ट १९४० हा कायदा आयुर्वेदीय औषधांनाही लागू करण्यात आला होता. गाझियाबाद येथील इंडियन मेडिसिन फॉर्मेस्युटीकल कार्पोरेशन व लखनौमधील ड्रग्ज स्टँण्डर्ड इन्स्टिटयुशन या संस्था स्टँण्डर्ड आयुर्वेदक औषधे तयार करण्याचे संदर्भात काम करीत होत्या.

केंद्रीय सरकारने युनानी औषध पद्धतीत संशोधन करण्यासाठी सेंट्रल कौन्सिल फॉर रिसर्च इन युनानी मेडिसीन हे कौन्सिल नेमले होते. संपूर्ण भारतभर आयुर्वेद व युनानी याचे संशोधन करणाऱ्या कौन्सिलच्या निरनिराळ्या संस्था व केंद्रे तसेच लहान लहान उपकेंद्रे सुरू होती.

भारतातील निरनिराळ्या योग व नॅचरोपॅथीच्या केंद्रांना अर्थिक मदत करण्याचे काम सेंट्रल कौन्सिल फॉर इन योग ॲण्ड नॅचरोपॅथी हे कौन्सिल करत होते. हैदराबाद येथील बेगमपेठ येथे नॅचरोपॅथीचे उत्तम केंद्र होते.

## ३.१२ आयुर्वेदातील पद्व्युत्तर अभ्यासक्रमः-

जे शिक्षण अथवा प्रात्यक्षिक ज्ञान पदवी संपादन केल्यावर घेतले जाते त्याला पदव्युत्तर शिक्षण असे म्हणतात. पदवी संपादनानंतर विशिष्ट शाखेचे उच्चशिक्षण घेणे ही कल्पना आजची नाही तर पुराणे, उपनिषदे आणि चरकसुश्रुत यांच्या कालातही पदव्युत्तर शिक्षण अस्तित्वात होते. व्यवसाय करताना धैर्य, कुशलता आणि यश मिळण्यासाठी पदव्युत्तर शिक्षणाची आवश्यकता असल्याचे चरकाने नमुद करून ठेवलेले आहे. सध्याच्या आयुर्वेदीक पदव्युत्तर शिक्षणक्रमाचे ध्येय असेच आहे. गुजरात आयुर्वेद विद्यापीठाच्या संशोधन व पदव्युत्तर शिक्षण कमिटीने पदव्युत्तर शिक्षणक्रम हा व्यवसायभिमुख असावा असे सुचवून त्यामधून १. उत्तम शिक्षक तयार करणे. २.उत्तम संशोधक तयार करणे. ३. उत्तम वैद्यकिय व्यावसायिक तयार करणे. ४. आयुर्वेदाच्या विविध शाखामधील तज्ञ वैद्यकिय व्यावसायिक तयार करणे. या गोष्टी साध्य व्हाव्यात असे सुचवले आहे.

## ३.१३ पदव्युत्तर शिक्षणाचा इतिहास :-

स्वातंत्र्यपूर्व काळातील फेलो इन इंडियन मेडिसीन (F.I.M) हा आयुर्वेदाचा पहिला पदव्युत्तर अभ्यासक्रम मद्रास कमिटी ऑन इंडिजिनस सिस्टीम ऑफ मेडिसिन यांनी सुचविल्या प्रमाणे मद्रास सरकारने १९३० साली सुरू केला व त्यामध्ये ॲलोपॅथीच्या पदवीधारकांनाही प्रवेश दिला जाऊ लागल्यानंतर त्याचे नामकरण असोसिएट इन इंडियन मेडिसीन (AIM) असे करण्यात आले.

त्यानंतरच्या काळात मॉडर्न मेडिसीनच्या पदवीधारकांना आयुर्वेदाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करावा याकरीता २-३ कमिट्यांनी सरकारला सूचना केल्या, परंतु त्याचा उपयोग झाला नाही. खाजगी स्तरावर या दरम्यान झांशी, गुरूकूल, कांगडी, कलकत्ता आणि पुणे याठिकाणी आयुर्वेदाचे पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू झाले होते.

१९५५ मध्ये दवे कमिटीने सुचविल्याप्रमाणे पहिला सरकारी स्तरावरील पदव्युत्तर अभ्यासक्रम जामनगर (गुजरात) येथे १९५६ मध्ये उडुपा कमिटीने बनारस, पुणे व त्रिवेंद्रम येथेही पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू करावा अशी सुचना केंद्र सरकारला केली. या कमिटीने सुचविल्याप्रमाणे त्रिवेंद्रम व बनारस येथे, D.Ay. च हा अभ्यासक्रम बहुतांशी आयुर्वेदीय होता. पुणे विद्यापीठाने मात्र इंटिग्रेटेड स्वरूपाचा M.A.Sc. हा अभ्यासक्रम टिळक आयुर्वेद महाविद्यालयात सुरू केला. त्यानंतर मुदलियार कमिटीने आयुर्वेदाचा पदव्युत्तर अभ्यासक्रम प्रत्येक राज्यामध्ये सुरू करावा अशी सूचना केली.

त्यानंतर वैद्य पंडित शिवशर्मा यांच्या स्वतःच्या व ऑल इंडिया आयुर्वेदीक काँग्रेस कमिटीच्या प्रयत्नाने भारतीय संसदेने इंडियन मेडिसीन सेंट्रल कौन्सिल ॲक्ट,

१९७०. सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन (C.C.I.M) कायदा तयार करून संपूर्ण भारतात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमामध्ये एकच अभ्यासक्रम सर्व राज्यात सुरू केला.

**३.१४ आयुर्वेद शिक्षणसंबंधी केंद्रीय समित्या :-**

आयुर्वेद अतिप्राचीन काळापासून सर्व भारतीय लोकांना प्रिय आहे. आयुर्वेदाची ओळख ही भारतीय वैद्यकशास्त्र म्हणून आहे. आयुर्वेदाला मिळणारा राजाश्रय कालपरत्वे कमी-जास्त प्रमाणात असल्याचे जरी पहावयास मिळाले. तरी विविध राज्यकर्त्यांनी आयुर्वेदाला महत्त्वाचे स्थान दिलेले पहावयास मिळते.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर मात्र आयुर्वेदाला जशी राजमान्यता मिळावयास हवी होती तशी ती मिळाल्याचे पहावयास मिळाले नाही मात्र सध्या अनेक परदेशी राष्ट्र आणि WHO सारखी संस्थादेखील या शास्त्राकडे आकृष्ट झाल्याचे पहावयास मिळते. त्यामुळे भारत सरकारदेखील आयुर्वेदाच्या उन्नतीसाठी अधिक प्रयत्नशील झालेले दिसते.

भारत सरकारने स्वातंत्र्यानंतर आयर्वेदाचा प्रचार व प्रसार, व्यवसाय, संघटन व्यवस्थित होण्यासाठी अनेक समित्या नेमल्या व त्यांनी त्या-त्या वेळी अनेक सूचनाही केल्या आहेत. त्या समित्यांची माहिती व त्यांच्या शिफारशी सुभाष रानडे व गो. रा. परांजपे यांनी त्यांच्या आयुर्वेदाचा इतिहास व परिचय या ग्रंथात सविस्तरपणे नमूद केलेल्या आहेत त्या खालील प्रमाणे आहेत.[१०]

**३.१४.१ भोर कमिटी :-**

हेल्थ सर्व्हे ॲण्ड डेव्हलेपमेंट कमिटी डॉ. भोर यांचे अध्यक्षतेखाली १९४५ साली भारत सरकारने नेमली. या कमिटीने देशी चिकित्सापद्धतीचा निर्णय स्थानिक राज्य सरकारनी घ्यावा असे सांगून हा प्रश्न निकालात काढला. आयुर्वेद शास्त्राकडे या कमिटीने दुर्लक्षच केले. त्यामुळे अनेकांनी आपली तीव्र प्रतिक्रिया सरकारकडे व्यक्त केली. परिणामतः १९४६ मध्ये दिल्ली येथे सर्व राज्य सरकारच्या स्वास्थ्य मंत्र्याचे अधिवेशन भरले होते. त्यात या गोष्टीचा विचार होवून तत्कालीन मद्रासच्या स्वास्थमंत्री श्रीमती लक्ष्मीपती यांचे अध्यक्षतेखाली पुढील निर्णय घेण्यात आले.

१. केंद्र व राज्यात आयुर्वेद व युनानी शास्त्राचे संशोधन, शिक्षण यांची व्यवस्था राष्ट्रीय योजना समितीच्या शिफारशीनूसार केली जावी.
२. आयुर्वेद व युनानी चिकित्सकांना सरकारी नोकऱ्यात समाविष्ठ करावे.
३. निरनिराळ्या केंद्रीय व राज्यस्तरीय समित्यांमध्ये त्यांना योग्य ते प्राधान्य द्यावे.
   पुढे याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने १९४६ मध्ये पुढील समिती नेमली.

### ३.१४.२ चोपडा समिती :–

कर्नल सर रामनाथ चोपडा हे या कमिटीचे अध्यक्ष होते. तसेच सदरच्या समितीमध्ये डॉ. लक्ष्मीपती, डॉ. बी.सी.लागू , डॉ. बाळकृष्ण पाठक व इतर तीन हकिम याचे सदस्य होते. त्यानंतरही डॉ. शाह, डॉ. घोष व आचार्य यादव यांनाही समाविष्ठ केले गेले. डॉ. व्दारकानाथ या समितीचे सचिव होते. या कमिटीने दिलेला अहवाल दोन भागांमध्ये १९४८ मध्ये प्रसिद्ध झाला. या कमिटीने केलेल्या सूचना पुढीलप्रमाणे होत्या.

१. आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या दोनही शास्त्रांचा समन्वय करणे आवश्यक आहे आणि या दोनही शास्त्रांतील उणीवा एकमेकांनी भरून काढणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित पाठ्यपुस्तकांचे देखील एकीकरण करून समन्वित पाठ्यक्रम तयार करावा.
२. एकाच अध्यापकाने दोनही पद्धतीचे विषय शिकवावेत (म्हणजेच दोषधातूमलविज्ञान शिकवणाऱ्या अध्यापकानेच फिजिऑलॉजी हा संबंधित अर्वाचीन विषय शिकवावा.)
३. संपूर्ण भारतात सर्वांना समान असा फक्त एकच अभ्यासक्रम असावा.
४. प्रत्येक राज्य सरकारने योग्य पाठ्यपुस्तके उत्पन्न करण्यासाठी एक समिती नियुक्त करावी आणि दोनही शास्त्रांचा समन्वय करणारी पाठ्यपुस्तके निर्माण करावीत.
५. सर्व शिक्षणकेंद्रात संशोधनाची सोय करावी.
६. प्रत्येक राज्य सरकारांनी एक समिती नेमून त्या समितीकडून वैद्यांच्या रजिष्ट्रेशनची व्यवस्था करावी. तसेच केंद्र सरकारने एक आखिल भारतीय रजिस्टर तयार करून त्याप्रमाणे कायदा तयार करावा. अशा अनेक महत्त्वपूर्ण सूचना चोपडा समितीने सरकारला केल्या. परंतु, या सुचना सरकारने न स्विकारता आपला पुढील निर्णय जाहीर केला.

अ. आयुर्वेद व ॲलोपॅथी या शास्त्रांचा समन्वय करणे अव्यवहार्य आहे.
इ. केंद्रीय सरकारने केवळ आधुनिक चिकित्सेवर आधारीत अशीच स्वास्थ्य योजना तयार करावी.
उ. आयुर्वेद आणि युनांनी या शास्त्रांचे संशोधन मात्र अवश्य करावे. या शेवटच्या सूचनेचा पाठपुरावा करण्यासाठी यानंतर सरकारने १९४९ मध्ये पुढील कमिटी नेमली.

### ३.१४.३ दवे कमिटी :–

त्रिवेंद्रम येथे १९५४ मध्ये घेतलेल्या केंद्रीय स्वास्थ्य परिषदेमध्ये श्री. दयाशंकर त्रिकमजी दवे यांच्या अध्यक्षतेखाली ही कमिटी नेमली गेली. त्यांनी केलेल्या सूचना खालीलप्रमाणे आहे.

१. प्रत्येक राज्यामध्ये वैद्यकिय शिक्षणाचे एक बोर्ड व फॅकल्टी नेमावी, बोर्डाने सर्व व्यावसायिकांचे रजिस्ट्रेशन करावे आणि फॅकल्टीमध्ये शिक्षणविषयक कार्य करावे.

२. आधुनिक डॉक्टरांइतकेच रजिस्टर केलेल्या वैद्य, हकिमांना वेतन व दर्जा मिळावा.

३. सर्व भारतभर एकच ५ १/२ वर्षांचा शिक्षणक्रम असावा. याची प्रवेश पात्रता इंटर सायन्स असावी आणि पदवी मिळवल्यावर प्रत्येक स्नातकाने कमीत कमी ३ महिने खेडेगावात वैद्यकिय सेवा करावी.

४. सर्व आयुर्वेदीक शिक्षण संस्थाचे नियोजन करण्यासाठी केंद्रीय परिषद नेमली जावी.

५. आयुर्वेदीक फार्माकोपिया व डिक्शनरीज् तयार कराव्यात.

६. समितीने मिश्र शिक्षणासाठी पाठयक्रमही तयार केला.

### ३.१४.४ उड्प कमिटी :–

१९५८ मध्ये भारत सरकारने डॉ. के.एन्. उड्प यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली आणि त्यांना आयुर्वेदीक संशोधन आणि शिक्षणसंस्था यांची सध्याची परिस्थिती, त्यांना मिळणारे आर्थिक सहाय्य आणि त्यांनी आजपर्यंत काय प्रगती केली आहे याबद्दलचा अहवाल तयार करून केंद्र सरकारला शिफारशी करण्यास सांगितले. या कमिटीने केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या.

१. आयुर्वेदाची उन्नती करण्यासाठी मिश्र शिक्षणक्रमयुक्त (आयुर्वेद व ॲलोपॅथी) अभ्यासक्रम असावा. त्याचबरोबर शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रमही चालू ठेवण्यास हरकत नाही.

२. सर्व आयुर्वेद विद्यालये विद्यापीठांशी संलग्नित असावीत.

३. योग्य अध्यापक वर्ग तयार करण्यासाठी स्नातकोत्तर शिक्षण केंद्रे बनारस, पुणे, त्रिवेंद्रम येथे सुरू करावीत.

४. आयुर्वेदीक अध्यापकांचे वेतन मेडीकल कॉलेजमधील अध्यापकांच्या एवढे असले पाहिजे.

५. संशोधनासाठी केंद्रीय अनुसंधान परिषद असावी, ज्यामुळे सर्व देशातील संशोधनामध्ये एकसूत्रीपणा, नियंत्रण सामजस्य राहील.
६. प्रत्येक मेडीकल कॉलेजमध्ये एक आयुर्वेदाचा विभाग आणि रूग्णालयात आयुर्वेदाचा वार्ड ठेवण्यात यावा.
७. आयुर्वेदीक फार्मसीचा कोर्स सुरू करावा.
८. प्रत्येक प्रांतातील शासनाने संशोधनासाठी बोर्ड नेमूण त्यात आयुर्वेदीक व आधुनिक दोनही पदवीधरांना नियुक्त करावे.
९. आयुर्वेदातील औषधांचे आधुनिक पाश्चात्त्य दृष्टीकोनातून देखील संशोधन करावे.

**३.१४.५. व्यास कमिटी :–**

गुजरात राज्याचे आरोग्यमंत्री श्री. मोहनलाल व्यास यांच्या अध्यक्षतेखाली आयुर्वेदाचा स्वतंत्र अभ्यासक्रम तयार करण्यासाठी कमिटी नेमली. त्याप्रमाणे या कमिटीने एक पाठ्यक्रमही तयार केला.

उड्प समितीच्या सूचना केंद्रीय किंवा प्रांतीक सरकारांनी स्विकारल्या नाहीत. महाराष्ट्रात तोपर्यंत जवळजवळ सर्व कॉलेजांमधून इंटिग्रेटेड अभ्यासक्रम सुरू होता. मात्र यातील बहुतेक पदवीधर मात्र ॲलोपॅथीचीच प्रॅक्टीस करीत होते. बहुतेक सर्व विद्यापीठात बॅचलर ऑफ आयुर्वेदीक मेडिसीन अँण्ड सर्जरी हा मिश्र अभ्यासक्रम सुरू होता. परंतु या पदवीधरांना शासनाकडून एम्.बी.बी.एस्.सी समकक्ष असा समान दर्जा व समान वेतनश्रेणी न मिळाल्याने त्यांच्यात असंतोष उत्पन्न होवुन १९७० मध्ये त्यांनी संप केला, दरम्यान संपूर्ण भारतात शुद्ध आयुर्वेदाचा एकच अभ्यासक्रम सुरू करण्यात यावा यासाठी मध्यवर्ती शासनाने सेंट्रल कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसीन स्थापन केले आणि महाराष्ट्र शासनाने मिश्र अभ्यासक्रम बंद केला. याचप्रकारे मद्रास व बनारस येथील मिश्र विद्यालये बंद करण्यात आली. नंतर केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे १९७१ जुलैपासुन सर्वत्र बी.ए.एम्.एस् हा शुद्ध आयुर्वेदाचा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला. सध्या याच अभ्यासक्रमानुसार विद्यापीठीय स्तरावर संपूर्ण भारतात आयुर्वेदाचे पदवी शिक्षण सुरू आहे.

**३.१६ भारतातील आयुर्वेद महाविद्यालयांची प्रवेशक्रिया :–**

आयुर्वेदामधील पदवी प्राप्त करणाऱ्या वैद्यास B.A.M.S. ही पदवी दिली जाते. हा एकंदर साडेपाच वर्षाचा पदवी अभ्यासक्रम आहे. या अभ्यासक्रमाला प्रवेश मिळण्यासाठी विदयार्थी शैक्षणिक पात्रता १०+२ परिक्षा किंवा वरिष्ठ माध्यमिक परिक्षा भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र याविषयांसह उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

तसेच संस्कृतचे ज्ञानही आवश्यक आहे. एम्.बी.बी.एस् आणि बी.डी.एस् यांना प्रवेश मिळण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर प्रवेश परीक्षा घेतली जाते तशीच प्रवेश परीक्षा आयुर्वेदाची पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेण्यासाठी घेतली जाते. काही संस्थामध्ये वरिष्ठ माध्यमिक परिक्षेतील गुणावरही प्रवेश दिला जातो. राज्यस्तरावरील महाविद्यालये त्याच राज्यातील अधिवास असलेल्या विदयार्थ्यांना प्रवेश देतात. जे विदयार्थी बी.ए.एम.एस. ची पदवी घेतात त्यांना पदव्युत्तर पदवी घेण्याची सोय उपलब्ध आहे. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचा कालावधी ३ वर्षांचा असून त्या पदवीस एम्.डी (आयुर्वेद) आणि एम.एस् (आयुर्वेद) असे म्हणतात. जे विदयार्थी एम.बी.बी.एस् आणि एक वर्षाची इंटरशिप पूर्ण करतात त्यांना आयुर्वेदाच्या पदव्युत्तर पदवीकरीता प्रवेश मिळू शकतो.

भारतामध्ये आयुर्वेदातील संशोधन हे आयुष (AYUSH) मंत्रालयामार्फत हाती घेतले जाते. नेपाळमधील आयुर्वेदातील संशोधनला National Ayuredic Training and Research Center (NATRC) या संस्थेमार्फत चालना दिली जाते. श्रीलंकेमध्ये औषध, पोषणद्रव्य व देशी औषधे मंत्रालयाव्दारे विविध आयुर्वेद संशोधन संस्थामध्ये चाललेल्या संशोधनाला चालना दिली जाते.

**सारांश –**

या प्रकरणाद्वारे अभ्यासकाने आयुर्वेद या वैद्यक विद्या शाखेचा आढावा घेऊन त्याचे विविध स्तरावरील वापर. इतिहास, चिकित्सातंत्र, उपयुक्तता इत्यादीवर चर्चा केली आहे. शैक्षणिक प्रगती, विविध समित्या यांचाही अभ्यास थोडक्यात मांडला आहे या प्रकरणातून अभ्यासकास आयुर्वेद चिकित्साची कल्पना झाली.

## संदर्भसूची :–


1. Ranade, S., & Paranjape, G. R. (1981). Ayurvedacha Itihas va parichay. Pune : Anmol Prakashan, p. 217-218
2. Ayurved Bhartiya Sanskruti Kosh Bhag-I Edi. p. 461
3. Ranade, S., & Paranjape, G. R. (1981). Ayurvedacha Itihas va parichay. Pune : Anmol Prakashan.
4. Palange, M. P., & Deshpande, R. (1992). Sharirkriya vidnan Bhag-1. Pune : Anand Prakashan, p. 9
5. Retrieved March, 22, 2017 from http: //www. indiastudychannel.com/ resources
6. http: //en.wikipedia.org/wiki/Ayurveda
7. Wadodkar, S. V. (1980). Ayurvedacha Itihas. Pune : Continental Prakashan. p. 225
8. Retrieved March, 22, 2017 from http:/en. Wikipedia.org/wiki/Ayurved
9. Retrieved March, 22, 2017 from http:/en.wikipedia.org/wiki/Ayurveda
10. Ranade, Subhash & Paranjape, G. R. (1981). Ayurvedacha Itihas va parichay. Pune : Anmol Prakashan.

# प्रकरण – ४ थे

# ग्रंथालयात वाचनसाहित्यसंग्रह, सेवा व संगणकीकरण यांचे योगदान

## ४.१) प्रास्तविक :–

ग्रंथालये ही कोणत्याही शिक्षण प्रणालीचा उपघटक म्हणून त्यांचेकडे पाहिले जाते तसेच शिक्षण प्रणालीचा आधारस्तंभ म्हणून देखील ग्रंथालयांकडे पाहिले जाते. ग्रंथालये मुख्यत्त्वे करून उपार्जन, प्रक्रिया, संघटन व माहिती प्रसारणाचे कार्य करतात. ग्रंथालयीन सेवा हे ग्रंथालयाचे प्रमुख कार्य आहे ज्यामुळे वाचकास हवी ती माहिती संकलित करण्यास मदत होते. ग्रंथालये ही प्रशिक्षित ग्रंथपालामुळे अधिक सक्षम होत आहेत. तसेच माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट, अंकिय संग्रहण, OAI इ. मुळे त्यांची कार्यप्रणाली व माहितीची प्रतीप्राप्ती क्रियेत बदल दिसून येत आहे. ग्रंथालय कोणत्याही प्रकारचे असो त्यामध्ये प्रामुख्याने वाचन साहित्य संग्रह विकास, ग्रंथालयीन सेवा, संगणकीकरण, ई–साहित्य उपयोग इ. महत्त्वाची कार्ये करतात. या सर्व बाबी अत्यावश्यक आहेत. यांचे महत्त्व या प्रकरणात चर्चीले आहे.

## ४.२) वाचनसाहित्यसंग्रहाचा विकास :–

वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करताना वाचनसाहित्य संग्रहाचा गुणात्मक गरजेनूसार, विषयानूसार विकास करून त्याचा जास्तीत–जास्त वाचकांना फायदा होण्याच्या दृष्टीकोनातून विचार करावा लागतो. वाचनसाहित्याचा गुणात्मक विचार करताना त्यावर परिणाम करणारी ग्रंथालयांची ध्येयधोरणे, तत्वे, तंत्रे आणि प्रक्रिया, वाचनसाहित्यसंग्रह विकासातील अडथळे आणि वाचनसाहित्य रद्दबातल करण्याबाबतचे धोरण यांचाही समावेश होतो. सध्याच्या इलेक्ट्रॉनिक युगातील वाचनसाहित्य संग्रहाची उपयुक्तता आणि त्याच्या वाचनसाहित्यांच्या वापराची नोंद घेवून त्यांचे मूल्यमापन करणे आवश्यक असते. संतुलित असा वाचनसाहित्याचा संग्रह करून, दर्जेदार वाचनसाहित्याचा संग्रह करण्याची जबाबदारी ग्रंथपालांवर असते.

वाचनसाहित्यसंग्रह विकास ही आव्हानात्मक अशी अभुतपूर्व प्रक्रिया आहे. ही सातत्याने चालणारी अखंडीत प्रक्रिया आहे. वाचकांच्या वाढत्या गरजा, वाचनसाहित्याची भिन्नता, वाचकांच्या वाचनसाहित्याच्या मागण्या यादृष्टीने वाचनसाहित्याचे उपार्जन करणे आवश्यक असते. वाचनसाहित्यसंग्रह विकास ही संकल्पना विविध क्रियांची एकत्रित करून बनलेली आहे.

"Collection Development is thus a dynamic and continuous activity, which involves the users the library staff and the subject experts on selection team. It is a process to develop a need based, up to date, and

balanced collection which is sufficient to meet the document and information need of the users"[1]

वाचनसाहित्याची निवड व 'वाचनसाहित्यसंग्रह विकास' या संकल्पनेत ध्येयधोरणाच्या संबंधित सर्व कृतींचा परामर्श आणि ग्रंथनिवडीची प्रक्रिया, उपार्जन तसेच वाचनसाहित्याचे मूल्यमापन यांचा एकत्रित समावेश होतो. वाचनसाहित्याचा विकास ही एक महत्त्वपूर्ण कृती असून ती ग्रंथपालांना करावी लागते व तिच्यामध्ये ग्रंथपालाची भूमिका महत्त्वपूर्ण असते. ग्रंथालयाचे वाचक हेच ग्रंथालयातील वाचनसाहित्याचे खरे समीक्षक असतात. ग्रंथालयातील वाचनसाहित्य किती उपयोगी आहे किंवा किती नाही किंवा कोणते वाचनसाहित्य ग्रंथालयात उपलब्ध असणे अपेक्षित आहे, या विषयीचे मार्गदर्शन वाचकच चांगल्या प्रकारे करू शकतात. वाचकांच्या माहितीविषयक गरजांची पूर्तता ग्रंथालयातील वाचनसाहित्य करते किंवा नाही हे वाचकच अधिक चांगल्या प्रकारे सांगू शकतात. ग्रंथालयातील येणाऱ्या वाचकांची, संशोधकांची, अभ्यासकांची वाचनसाहित्याबाबतची मत–मतांतरे जाणून घेणेदेखील आवश्यक बाब असते. वाचक हे ग्रंथालयातील वाचनसाहित्याच्या बाबतीत तो कितपत योग्य असल्याबाबत तसेच कोणत्या वाचनसाहित्याची आवश्यकता आहे हे सांगू शकतात. वाचनसाहित्यसंग्रह बळकट होण्याकरीता तसेच सध्याच्या वाचनसाहित्यसंग्रहातील उणीवा दूर करण्यासाठी सूचना करू शकतात.

### ४.३) वाचनसाहित्य संग्रहाचा अर्थ आणि हेतू :–

वाचनसाहित्यसंग्रहाचा विकास ही प्रक्रिया लवचिक आणि सातत्याने चालणारी कृती आहे. त्यामध्ये वाचक, ग्रंथालयीन कर्मचारी आणि विषयतज्ञ यांचा समावेश निवड समितीत होतो. वाचनसाहित्यसंग्रह विकासाचा शेवट कधीही होत नसतो, परंतू त्याच्याव्दारे गरजेनूसार वाचनसाहित्याचा विकास करणे तसेच तो अद्ययावत करणे आणि संतुलित गरजांची पूर्तता करणारा असतो.[२]

### ४.३.१ वाचनसाहित्य संग्रह विकास :–

ग्रंथालय आपल्या प्रत्यक्ष व संभाव्य वाचकांच्या गरजांचा विचार करत असते. वाचकांच्या गरजा व निकड लक्षात घेवूनच वाचनसाहित्याच्या संग्रहाचा विकास घडवलेला असतो. वाचनसाहित्यसंग्रह विकसित करताना आपल्या वाचकांना अद्ययावत व अधिकृत माहिती जास्तीत जास्त प्रमाणात पोहोचण्यासाठी ग्रंथालय कार्य करत असते. वाचनसाहित्य संग्रह विकसित करताना ग्रंथपालास आपल्या पालक संस्थेची ध्येयधोरणे विचारात घ्यावी लागतात. तसेच आर्थिक साधनांची उपलब्धताही विचारात घ्यावी लागते. ग्रंथालयामधील काही वाचनसाहित्याची उपयुक्तता कालांतराने संपुष्टात

येते तर काही वाचनसाहित्य फाटते व त्यामूळे ते वापरण्यायोग्य रहात नाही. असे वाचनसाहित्य ग्रंथालय संग्रहातून काढून टाकावे लागते, रद्दबातल करावे लागते. वाचनसाहित्य रद्दबातल करण्यासाठी योग्य धोरणांची आणि कार्यक्रमांची आवश्यकता असते. वाचनसाहित्य संग्रह विकासामध्ये वाचनसाहित्याची गुणात्मक वाढ अभिप्रेत असते.

## ४.४) वाचनसाहित्य संग्रह विकासाच्या व्याख्या :-

हॅरॉडस् ग्लोसरी (आवृत्ती ६) या ग्रंथानुसार "ग्रंथालयाचा हेतू साध्य करण्यासाठी सुसंगत आणि विश्वसनीय वाचनसाहित्य उपार्जित करण्याची सतत चालणारी प्रक्रिया म्हणजेच वाचनसाहित्य संग्रह विकास होय."[3]

ॲलन केंट यांनी संपादित केलेल्या एनसायक्लोपिडीया ऑफ लायब्ररी ॲण्ड इन्फर्मेशन सायन्सनूसार ''विशिष्ट ग्रंथालयातील एकूण वाचनसाहित्य म्हणजे वाचनसाहित्य संग्रह यामध्ये ग्रंथ, हस्तलिखिते, कालिके, शासकिय प्रकाशने, पुस्तिका, अहवाल, ध्वनिमुद्रीका, मायक्रोफॉर्म्स, कॉम्प्युटर टेपस् व डिस्कस् इत्यादींचा समावेश होतो.''

ग्रंथालयाकडे असलेल्या वाचनसाहित्यामध्ये योग्य अशा नवीन वाचनसाहित्याची भर घालणे आणि ग्रंथालयातील अनावश्यक वाचनसाहित्य काढून टाकणे म्हणजेच वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करणे होय.

## ४.५ वाचनसाहित्य संग्रह विकासाचे हेतू :-

वाचनसाहित्याची निवड आणि उपार्जन तसेच संग्रहातील वाचनसाहित्याचे उपयुक्ततेच्या दृष्टीकोनातून मूल्यमापन करणे या कार्याचा वाचनसाहित्यसंग्रह विकासाच्या प्रक्रियेमध्ये समावेश होतो. वाचनसाहित्याची निवड करताना वाचकांच्या आवडी-निवडी, गरजा यांचा अभ्यास करून अतिशय विचारपूर्वक वाचनसाहित्याची निवड केली जाते. वाचनसाहित्याची निवड करताना मनमानी केली जात नाही. तसेच संग्रहातील वाचनसाहित्याचे नियमितपणे मूल्यमापन करून जुने, अनावश्यक, असंबंधित वाचनसाहित्य संग्रहातून काढून टाकले जाते. वाचकांच्या गरजा विचारात घेवूनच वाचनसाहित्य संग्रहामध्ये नवीन वाचनसाहित्याची भर घातली जाते व अनावश्यक वाचनसाहित्य काढून टाकले जाते.

**वाचनसाहित्य संग्रह विकासाचे हेतू :-**

१) वाचकांना उपयुक्त असे वाचनसाहित्य निवडणे आणि उपार्जित करणे .

२) आर्थिक साधनांचा सुयोग्य वापर करणे.

३) वाचनसाहित्य संग्रहाचे नियमितपणे मूल्यमापन करून वाचन साहित्य रद्दबातल करणे.

४) वाचनसाहित्य संग्रह अद्ययावत ठेवणे.

**४.६ वाचनसाहित्यसंग्रह विकसित करताना विचारात घ्यावयाच्या प्राथमिक बाबी :-**

मर्यादित आर्थिक साधने आणि वाचकांच्या अमर्यादित गरजा यांची योग्य पद्धतीने सांगड घालण्यासाठी वाचनसाहित्य संग्रह विकासाची आवश्यकता आहे. यासाठी वाचनसाहित्याचे उपार्जन, मूल्यमापन आणि रद्दबातल याबाबतचे सुस्पष्ट धोरण ठरवणे आवश्यक असते.

ब्लूमफिल्ड यांनी वाचनसाहित्यसंग्रह विकसित करताना पालकसंस्थेची ध्येयधोरणे व विशेष कार्यक्रम, वाचकांच्या प्रचलित गरजा, आर्थिक साधनांची उपलब्धता, वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणे, वाचनसाहित्य संग्रह विकासाची धोरणे आणि कार्यक्रम राबवण्यासाठी ठरवलेली व्यूहरचना या प्राथमिक बाबी विचारात घ्याव्या लागतात असे सांगितलेले आहे.

**४.७ वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरण :-**

वाचनसाहित्यसंग्रह विकासाचे धोरण म्हणजेच विशिष्ट ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी निश्चित केलेला कृती कार्यक्रम होय.

अमेरिकन लायब्ररी असोशिएशनच्या कलेक्शन डेव्हलपमेंट कमिटीनूसार, 'वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण लिखित स्वरूपात असावे. त्यामुळे वाचनसाहित्याची निवड कार्यामध्ये सातत्य राखता येते, उत्तम वाचनसाहित्य संकलित करणे शक्य होते तसेच उपलब्ध मंजूर रकमेचा योग्य वापर करणे शक्य होते.'

वाचनसाहित्य विकास कार्यामध्ये स्थैर्य आणि सातत्य येण्याकरीता वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण लिखित स्वरूपात असावे असे सांगितले आहे. ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाचा विकास करण्यासाठी वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण ही एक गतिमान आणि महत्त्वपूर्ण प्रक्रिया आहे. हे धोरण लिखित किंवा अलिखित स्वरूपात असू शकते. तयार आणि लिखित स्वरूपातील धोरणाचे पुनरावलोकन ग्रंथालयांना त्यांचे ध्येय आणि उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रोत्साहन देते तसेच ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रहाला त्याचे ध्येय आणि उद्दिष्टे साध्य करण्यासाठी मदत करते त्यासाठी ते सर्वच स्तरावर जसे वाचनसाहित्याची निवड, उपार्जन, संस्करण, स्थानबद्ध तसेच वाचनसाहित्य रद्दबातल करणे आणि वाचनसाहित्याचा त्याग करणे उपयोगी ठरते. संस्थेची आणि ग्रंथालयांची ध्येय आणि

उद्दिष्टे ही  पूर्ण करण्यासाठी त्यांना हे धोरण स्पष्ट आणि वस्तुनिष्ठ अशा स्वरुपात मार्गदर्शन करते.

मार्गदर्शक तत्त्वे सर्व विषयांची क्षेत्र आणि वेगवेगळ्या स्वरूपाचे ग्रंथालयीन वाचनसाहित्य व्यापू शकतात. विद्यार्थ्यांना शिकवण्यासाठी आणि विविध माध्यमांकरीता, वेगवेगळया स्वरूपाचे वाचनसाहित्य तयार करण्यासाठी शैक्षणिक कर्मचाऱ्यांना लागणारे विविध स्वरूपातील वाचनसाहित्य देण्यासाठी ग्रंथालये विविध प्रकारच्या वाचनसाहित्याची खरेदी करत असतात.[४]

A plan is required that ensures efficient collection development by correction collection weaknesses while maintaining its strengths. A collection development policy statement is a document that represents a plan of action and information which is used to guide the staffs thinking and decesion making. Specifically, the staff consults the collection development policy when considering which subject areas to arrangement and determine how much emphasis is to be given to each area. The policy should be such that is seems as a means of communiction with librarys service population and the people who provide its funding"[5]

लिखित स्वरूपातील वाचनसाहित्य संग्रह विकासाच्या धोरणाचे फायदे काट्झ, एम्.ए.ग्रिल आणि हिकी यांच्यासारख्या कितीतरी तज्ञांनी सांगितलेले आहेत. त्यांच्या दृष्टीकोनातून धोरणांचे घटकाविषयीची चर्चा केली आहे.

**४.८ वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचे फायदे :–** वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाचे अनेक फायदे हिकी, मॅगरील, काट्झ इ. लेखकांनी सांगितले आहेत. या लेखकांनी सांगितलेल्या फायद्यांचा सारांश पालक संस्थेची धोरणे आणि वाचनसाहित्य संग्रह विकासाची धोरणे यातील संबंध स्पष्ट करणे.

१) वाचनसाहित्यसंग्रह विकास कार्याचे नियोजन करण्यासाठी मदत करणे.

२) वाचनसाहित्याची निरपेक्षपणे निवड करण्यासाठी व्यवहार्य मार्गदर्शन करणे.

३) वाचनसाहित्य उपार्जनाची सर्वोत्कृष्ठ पद्धती निवडण्यासाठी मदत करणे.

४) संग्रहातील वाचनसाहित्याची उपयोगीता सिद्ध करुन त्याचे समर्थन करणे.

५) ग्रंथालयासाठी मंजूर केलेल्या रकमेचे वाटप करण्यासाठी मार्गदर्शन करते. खर्चासंबंधीचा प्राधान्यक्रम ठरविण्यास मदत करते. तसेच वाचनसाहित्य संग्रहाची वाढ आणि विकासाची दिशा निश्चित करून दिर्घकालीन आर्थिक नियोजन करण्यास मदत करणे.

६) उपलब्ध साधनसंपत्तीचा योग्य वापर करण्यासाठी मदत करणे.

७) ग्रंथालये सहकाराचे कार्यक्रम राबवणे व ग्रंथालय सहकाराचे जाळे निर्माण करणे

८) वाचनसाहित्याची खरेदी करण्यापूर्वी करावयाच्या सोपस्कारासंबंधीच्या आवश्यक असणाऱ्या पद्धती निश्चित करण्यासाठी वाचनसाहित्य संग्रह विकास धोरण मदत करणे.

९) ग्रंथालयातून रद्दबातल कराव्या लागणाऱ्या वाचनसाहित्याबाबत मार्गदर्शन करणे.

वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरणे निश्चित करण्यासाठी पालक संस्थेची ध्येयधोरणे, वाचकांच्या गरजा, साधनांची उपलब्धता ही मार्गदर्शक तत्त्वे विचारात घ्यावी लागतात. पालकसंस्थेची ध्येये आणि उद्दिष्टे, वापरकर्त्यांच्या गरजा आणि आर्थिक आणि इतर साधनसामग्रीची उपलब्धता यानुसार शैक्षणिक ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह विकासाचे धोरण ठरवण्यात आलेले असते.[६]

**४.९ वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणाचे घटक :–**

वाचनसाहित्याची निवड, उपार्जन, मूल्यमापन, ग्रंथ रद्यबातल करणे, आंतरग्रंथालयीन देवघेव, इ. प्रक्रियांच्या धोरणांचा समावेश वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणांमध्ये होतो. काट्झ् यांच्या मतानूसार, वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणांमध्ये ग्रंथालयाची उद्दिष्टे, ग्रंथालयाचे वाचक, दैनंदिन ग्रंथालय कार्याना तसेच वाचनसाहित्य निवडीत प्रामुख्याने जबाबदार असलेल्या व्यक्ती, वाचनसाहित्य निवडीची कार्यपद्धती, आर्थिक मर्यादा, ग्रंथालयासाठी मंजूर रक्कम इ., ग्रंथालयासाठी निवड न करावयाच्या वाचनसाहित्याचे प्रकार, वाचनसाहित्य संग्रह विकास धोरणामध्ये पुढील बाबीचे स्पष्टीकरण असावे. या घटकांचा समावेश होतो. त्यापैकी वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणामध्ये

**१.** संकलित करावयाच्या वाचनसाहित्याची व्याप्ती व स्वरुप स्पष्ट असावे.

**२.** कोणत्या भाषेतील वाचनसाहित्य संकलित करावे.

**३.** वाचनसाहित्याचा कालखंड निश्चित असावा.

**४.** कोणत्या प्रदेशातील वाचनसाहित्य प्राध्यान्याने संकलित करावे हे निश्चित असावे जसे. भारत, इंग्लंड, अमेरीका.

**५.** वाचनसाहित्य संकलित करण्याच्या प्रकाराविषयी स्पष्टता असावी.

**६.** विदेशी वाचनसाहित्य संकलनाबाबतचे स्पष्टीकरण

**७.** देणगी म्हणून वाचनसाहित्य स्विकारण्याबाबतचे मार्गदर्शन

**८.** वाचनसाहित्य रद्दबातल करण्याबाबतचे स्पष्टीकरण

वाचनसाहित्यसंग्रह विकसित करताना पुढील दोन बाबींकडे विशेष लक्ष द्यावे लागते. १. वाचनसाहित्य कोणत्या निकषांच्या आधारावर निवडावे २. कोणकोणत्या प्रकारचे वाचनसाहित्य निवडावे. Perkins made recommendations of clients and knowledge of their information needs which are key element in deciding what to buy.[7]

ग्रंथपालन व्यवसायामध्ये जसजसा बदल होवू लागला तसतसा वाचनसाहित्य संग्रह विकासाच्या संकल्पनेतही बदल होत गेला वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण 'वाचनसाहित्यसंग्रह निवडीचे धोरण' आणि 'उपार्जनाचे धोरण' या तीनही संकल्पना एकाच अर्थाने ग्रंथपाल वापरू लागले, कारण या तीनही संकल्पना समानअर्थी आहेत. उच्च स्तरावरील वाचनसाहित्य संग्रहातील नियोजन कार्यातील क्रमबद्धता ते दर्शवतात. वाचनसाहित्याची निवड हा दुसरा टप्पा असून निर्णयक्षमता आणि उपार्जन हा तिसरा टप्पा आहे. वाचनसाहित्यसंग्रह ही अशी प्रक्रिया आहे की जिच्यामध्ये वाचनसाहित्याची निवड, निर्णय आणि वाचनसाहित्यसंग्रह विकासांच्या योजनांचा समावेश असतो.

ग्रंथालयातील असणाऱ्या विविध प्रकारच्या वाचनसाहित्याला एकत्रित आकार देण्याच्या विविध कार्याचा एकत्रित समावेश वाचनसाहित्य संग्रह विकासामध्ये होतो.

### ४.१०) वाचनसाहित्य संग्रह विकासाची कार्ये

१) वाचकांचे विश्लेषण

२) वाचनसाहित्य निवडीची धोरणे

३) उपार्जनाची ध्येयधोरणे

४) रिसोर्स शेअरींग

५) वाचनसाहित्य रद्दबातल धोरण

६) वाचनसाहित्याचे मूल्यमापन

### ४.११ वाचनसाहित्यसंग्रह विकासातील टप्पे :–

१. वाचकांच्या माहितीविषयक गरजांचे विश्लेषण करणे.

२. ग्रंथालयाच्या उद्दिष्ठानुरूप ग्रंथनिवडीचे धोरण तयार करून त्याचे उपयोजन करणे.

३. संतुलित असा वाचनसाहित्य संग्रह तयार करण्यासाठी उपार्जन कार्यक्रम ठरवणे.

४. रिसोर्स शेअरींग आणि त्याचा वाचनसाहित्यसंग्रह विकासावरील परिणाम तपासणे

५. वाचनसाहित्य संग्रहाची परिणामकारकता वाढवण्यासाठी वाचनसाहित्याचे रद्दबातल धोरण ठरवणे.

Collection development implies selection, acquisition and evaluation of the library collection in order to see that both print and non-print materials that are available in a library are really useful to the clientale. Its purpose is to find out the users information needs, select and acquire documents, that are really useful to the clientale, periodically review the collection for weeding out unwanted and outdated documents from it [8]

ग्रंथ विकास धोरणात अनेक धोरणांचा समावेश असतो. उदा. कलेक्शन डेव्हलपमेंट, कलेक्शन मॅनेजमेंट, कलेक्शन विडींगआऊट, कलेक्शन बिल्डींग इ.

**४.१२ वाचनसाहित्य रद्दबातल करणेबाबतचे धोरण :–**

वाचनसाहित्यसंग्रह विकासाचे धोरणातील वाचनसाहित्य रद्दबातल धोरण हा एक महत्त्वाचा घटक आहे. वाचनसाहित्य रद्दबातल ठरवणे म्हणजे उपयोगी नसलेले किंवा हाताळण्यायोग्य नसलेले वाचनसाहित्य ग्रंथालयास दान केले जाते. जेथे त्याचा उपयोग होवू शकतो किंवा ग्रंथालयाबाबत त्या ग्रंथालयाचा असणारा वाचनसाहित्य संग्रह पूरक आणि उपयोगी असणे आवश्यक आहे तसेच या वाचनसाहित्यसंग्रह जतन करून ठेवण्यासाठी पुरेशी जागा आणि पुरेशा प्रमाणात पैशांची आवश्यकता असते, खास करून विद्यापीठीय ग्रंथालयांसाठी वाचनसाहित्य ठेवण्याकरीता असणारी जागेची कमतरता ही भेडसावत आहे. ग्रंथ रद्दबातल करणे हा जागेची बचत करण्यासाठीचा एकमेक पर्याय असू शकत नाही. सातत्याच्या वापराने वाचनसाहित्य खराब होते परंतू त्याहीपेक्षा जेंव्हा वाचनसाहित्याची नवीन आवृत्ती येते तेंव्हा त्या सुधारीत आवृत्तीत येणारे घटकही सुधारीत स्वरूपात येतात. त्यामुळे जुन्या आवृत्तीतील पुस्तकांपेक्षा नवीन आवृत्तीतील घटक वाचकांसाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यामुळे जुन्या आवृत्तीतील पुस्तके रद्दबातल ठरवली जातात तसेच कांही पुस्तकातील घटक इलेक्ट्रॉनिक साधनांच्या माध्यमात उपलब्ध होवू लागल्यास उदाः–मायक्रोफॉर्म्स, सीडीच्या, डिस्कच्या त्यासंबंधीचे वाचनसाहित्य रद्दबातल केले जावू शकते.

**विद्यापीठ अनुदान आयोगाच्या ग्रंथरद्दबातल धोरणाबाबतच्या समितीचा अहवाल स्पष्ट करतो की** “Many works lose their value within on generation, say in twenty five years by that time, their thought – content of same may even turn out to be wrong. In a service library no useful purpose is served by tetaining such pedestrian books and proriding self space for them after

they have become obsolete. The proper course is to weed out periodically. They should give place to current variations of them.[9]

**४.१३ वाचनसाहित्याचे संघटनातील समस्या :–**

संघटन म्हणजे उद्दिष्टांप्रत पोहोचण्यासाठी वस्तुंची किंवा विविध क्रियांची आणि नियोजनबद्ध केलेली पद्धतीशीर मांडणी होय. ग्रंथालयामध्ये ग्रंथांची मांडणी ही त्याचा वापर प्रभावीपणे होण्याचा दृष्टीने केलेली असावी. वाचनसाहित्यसंग्रह विकासाच्या धोरणाच्या अनुषंगाने एकदा वाचनसाहित्याची खरेदी केली की त्याची नोंद झाल्यानंतर त्याचा वापर सुरू होतो. वाचनसाहित्याचा वापर जास्तीत–जास्त होण्याकरीता त्याचा वापर योग्यप्रकारे होण्यासाठी त्याचे संघटन करणे आवश्यक असते. वाचनसाहित्याची मांडणी पद्धतशीरपणे करणे आवश्यक असते. ती अशी असावी की जेणेकरून वाचनसाहित्याचा शोध कमी श्रमात व वेळेत घेता यावा. वाचनसाहित्याची रचना करताना ती अतिशय साधी असावी. परंतू ग्रंथालयातील माहितीच्या नोंदीची रचना करताना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. वाचनसाहित्यसंग्रह विकासाचे धोरणामध्ये वाचकांच्या गरजा पूर्ण करणारा वाचनसाहित्यसंग्रह वाचकांना उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याने वाचकांच्या गरजा, आवडीनिवडी, निकड यांचा विचार करणे आवश्यक असते. वाचनसाहित्याचे संघटन करण्यासाठी आणि वाचकांना अधिक प्रभावीपणे सेवा देण्यासाठी वाचनसाहित्याची कपाटातील रचना, वर्गीकरण आणि तालिकीकरण तंत्रे पाळणे आवश्यक असते. वाचनसाहित्य संग्रहाचे, दस्तऐवजांचे आणि अभिलखाचे वर्गीकरणाचे गट तयार करणे आवश्यक असते.

संघटन करताना अनेक समस्या निर्माण होतात. तसेच वाचनसाहित्याचे वर्गीकरण व तालिकीकरण करणे संबंधी समस्या निर्माण होतात. ग्रंथदेवघेव सेवा, संदर्भसेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव आणि यासारख्या इतर सेवा ग्रंथालयीन वाचनसाहित्याचा या परिणामकारक व जास्तीत जास्त वापर कसा होईल याची काळजी घेणे व वाचनसाहित्याचे जतन योग्य प्रकारे होणे देखील संघटनाच्या दृष्टीने आवश्यक आहे. त्यामुळेही वाचनसाहित्य संग्रहाचा वापर जास्तीत–जास्त वाढेल. विशेषाधिकार म्हणजे सेवांचा इष्टप्रयोग नव्हे. गैरवापर, दूय्यम प्रती, चोरी यासारख्या प्रकारांपासून ग्रंथालयातील साहित्याचे रक्षण झाले पाहिजे. त्याचे किटक, धूळ आणि इतर पर्यावरणीय हाणीपासून किंवा धोक्यांपासून संरक्षण झाले पाहिजे. वाचनसाहित्याचे विशिष्ठ कालामधील मूल्यमापन केल्याने वाचनसाहित्य संग्रहाची उद्दिष्टे पूर्ण होतात.

ग्रंथ त्याच्या जागेवर लावणे आणि वाचनसाहित्यसंग्रह पडताळणी केल्याने वाचनसाहित्यसंग्रहाच्या मूल्यमापनाच्या प्रक्रियेला मदत होईल.

विविध सर्वेक्षणावरून वाचनसाहित्यसंग्रहाचा दर्जा आणि व्याप्तीच्या दृष्टीने तो उपयोगाचा आहे किंवा नाही याची खात्री करून घेतली जाते आणि विषय तज्ञांच्या सेवा घेतल्या जातात. मूल्यमापनाबाबत वेबस्टरची डिक्शनरी म्हणते,

"Evaluation means an attempt to determine either the relative or intrinsic worth of something in terms other than monetary. Evaluation is an integral part of library management and administration. Evaluation of the document collection is an essential inevitable component of the collection development policy. Through evaluation only library can improve its quality of service[10]

**४.१४ वाचनसाहित्य संग्रह विकास आणि उपार्जन प्रक्रिया :–**

विशिष्ठ कालाकरीता ग्रंथसंग्रहाचे तसेच वाचनसाहित्यसंग्रहाचे मूल्यमापन, फाटलेला, जीर्ण झालेली पुस्तके रद्दबातल ठरवणे, कालबाह्य आणि हाताळता न येणारे वाचनसाहित्य ठरवणे व ते रद्दबातल करणे या प्रक्रियेबरोबरच वाचन–साहित्याची निवड व उपार्जन या प्रक्रिया देखील वाचनसाहित्यसंग्रह विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहेत. वाचनसाहित्यसंग्रह विकासाचे धोरण लिखित स्वरूपात असणे आवश्यक आहे. वाचनसाहित्यसंग्रह विकासाच्या प्रक्रियेमध्ये वाचनसाहित्याची निवड, उपार्जन, वाचनसाहित्य संग्रहाचे मूल्यमापन, वाचनसाहित्य रद्दबाबतल धोरण यांचा समावेश होतो.

वरील प्रत्येक प्रक्रियेबाबतचे स्वतंत्र धोरण असणे आवश्यक आहे. ग्रंथपालांना या वाचनसाहित्यसंग्रह विकासाच्या धोरणांची व कार्यक्रमांची माहिती असणे आवश्यक असते. वाचनसाहित्यसंग्रह विकास धोरणाने ग्रंथालयात कोणकोणत्या प्रकारचे आवश्यक वाचनसाहित्य उपलब्ध आहे ते तपासणे आवश्यक असते. सध्याच्या या माहिती तंत्रज्ञानाच्या युगामध्ये उपलब्ध असणारी माहिती फक्त पारंपारिक दस्तऐवजाच्या स्वरूपात उपलब्ध असते असे नाही तर ती इलेक्ट्रॉनिक स्वरूपात सुद्धा उपलब्ध असते. (उदाः– ई – पुस्तके आणि ई – नियतकालिके) खास करून विद्यापीठीय ग्रंथालयांच्या बाबतीमध्ये या विद्यापीठातील अध्यापन व संशोधनाकरीता आवश्यक असणारी माहिती अपारंपारिक दस्तऐवजाच्या स्वरूपात उपलब्ध असते.

ग्रंथालयास आवश्यक असणारे वाचनसाहित्य मग ते पारंपारिक किंवा अपारंपारीक स्वरूपातील असो ते वाचनसाहित्य खरेदी, देणगी स्वरूपात अदलाबदल करून आणि न्यायिक पद्धतीने व संविधानिक बंधनाचे पालन करून उपार्जन केले

जाते. ग्रंथालयाचे उद्दिदष्टनुसार त्यांच्या वाचनसाहित्य निवड केली जात असते आणि त्यानुसारच उपार्जन धोरण असावे लागते. ग्रंथालयांनी त्यांच्या गरजेनुसार देणगीदाखल व अदलाबदल केलेले वाचनसाहित्य  स्विकारण्याचे धोरण अवलंबवावे लागते. अनावश्यक वाचनसाहित्य मुक्त असले तरी ते स्विकारू नये. महागडे वाचनसाहित्य पण आवश्यक मात्र खरेदी करणे आवश्यक असते. आदेश विभाग, तालिकीकरण, संस्करण आणि ते कपाटात ठेवण्यापर्यंत करावी लागणारी लिपीकिय कामे देणगीदाखल झालेल्या ग्रंथांवर देखील करावी लागतात.[११]

**४.१५ अंदाजपत्रक आणि निधी वितरण :–**

पालकसंस्था ग्रंथालयाला योग्यरितीने निधी विभागून देत असते. हा मिळालेला निधी ग्रंथालय त्यांच्या खर्चाच्या विविध बाबींना देत असते. ग्रंथालयास स्वतःचे उत्पन्नाचे प्रमुख साधन नसते. ग्रंथालयास उत्पन्नाचे मार्ग म्हणजे वर्तमानपत्राची रद्दी विक्री व पुस्तके विहीत मुदतीत परत न केल्याने जमा होणारी दंडाची रक्कम हे होत. या रक्कमा देखील पालक संस्थेकडेच जमा कराव्या लागतात. ग्रंथालयास पालक संस्थेकडून, राज्य शासनाकडून, केंद्र सरकारकडून, तसेच त्यांच्या विविध संस्थाकडून प्राप्त होणारी अनुदाने या प्रकाराने उपलब्ध होणाऱ्या निधीवरच ग्रंथालये अवलंबून असतात. हा निधी किंवा अनुदाने आवर्ती व अनावर्ती अशी असतात. शैक्षणिक ग्रंथालयांच्या विकासामध्ये ते माहितीस्त्रोत व ज्ञान केंद्र म्हणून उदयास येण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत आहे. ट्रेहान म्हणतो "The book fund allotment should be apportioned and allocated as under.

1) Fixed changes which recure annually and cover renewal of journal subscriptions
2) General fund for purchase of reference books, books of wide general interest and creative reading
3) Departmental fund which is allotted to department generally on the basis of actual expenditure of the previous year and recommendations of the library.
4) Special fund for purchase of text books for poor student.

आवर्ती व अनावर्ती खर्चासाठी ग्रंथालयाचा निधी वापरला जातो. आवर्ती निधी हा पुस्तके व इतर वाचनसाहित्याची खरेदी, कर्मचारी पगार, देखभाल खर्च, इतर खर्चासाठी मंजूर केलेला असतो. काही खर्च पुन्हा पुन्हा, प्रत्येक वर्षी करण्याची आवश्यकता नसते त्याला अनावर्ती खर्च असे म्हणतात.

उदाः–फर्निचर खरेदी, साधनांची खरेदी, ग्रंथालय विस्तार इ. जेव्हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला जातो किंवा विभाग सुरू केला जातो तेंव्हा त्यासाठी इतर विभागाप्रमाणे निधी तसेच जादाचा निधी मंजूर केला जातो.[१२]

पुष्कळ ग्रंथालयांकडे सर्वसाधारण निधी असतो, त्यालाच वाटप न केलेला निधी असे म्हणतात.

Gelfand suggests that 30% to 40% of the library fund should be set apart for this with this fund the librarian can fill the gaps in the library collection, by multiple copies when needed, and purchase special collection or private collections of retired scholars and scientists to enrich the library collection. The fund will be useful for subject development in the collection. In short unallocated funds help in collection development by the librarian. The ways in which academic library book funds are allocated very widely some are devided into an amount of money for each academic departments library needs, with or without a significant amount being retained by the library. Where funds are allocated to departments a variety of for mulae has been evolved in an attempt to find an equitable method of distributing insufficeient funds[13]

### ४.१६ ग्रंथालय समितीची वाचनसाहित्यसंग्रह विकासातील भूमिका :–

ग्रंथपाल हा एकटाच ग्रंथालयाचे धोरण ठरवण्याचे आणि ग्रंथालयाचे व्यवस्थापन करण्याचा कामाचा भार सहन करू शकत नाही. ग्रंथालयांचे दैनदिन कामात ग्रंथालयीन कर्मचारी हे ग्रंथपालांना मदत करत असले तरी ग्रंथालयातील प्रशासकीय काम व धोरण ठरवण्याचे काम इतर व्यक्तींना देणे आवश्यक असते. हे रॉडच्या मतानुसार ग्रंथालय समितीची व्याख्या “The library committee responsible for the provision of library service.”

ग्रंथालयावर नियंत्रण ठेवण्यासाठी लोकांची संघटीत समिती असते तिला ग्रंथालय समिती म्हणतात. ग्रंथालयाबाबत निर्णय घेणाऱ्या लोकांकडून ग्रंथालय समितीची स्थापना करण्यात येत असते. अधिकार क्षमता म्हणजे ज्यांना निर्णय घेण्याचे अधिकार असतात. ग्रंथालयाची ध्येय धोरणे ठरवण्याचे अधिकार ग्रंथालय समितीला असतात. ग्रंथालय समिती ही ग्रंथालयास मार्गदर्शन करण्याचे काम करते.

Library authority will be person or a group like a board of Management, Board of Trustees etc.[14]

आपल्या देशामध्ये विद्यापीठीय व महाविद्यालयीन ग्रंथालयामध्ये ग्रंथालय समित्या असतात. त्यांचा संबंध ग्रंथालयांची ध्येयधोरणे ठरवणे याच्याशी असतो. त्या

ग्रंथालय प्रशासनामध्ये हस्तक्षेप करत नाहीत. उच्च शिक्षण आणि संशोधन यांच्या विकासासाठी, ग्रंथालयाची ध्येयधोरणे ठरवण्यासाठी ग्रंथपालांना ग्रंथालय समिती सहकार्य करत असते. विविध विभागांना आवश्यक असलेले वाचनसाहित्य खरेदीसाठी ग्रंथालय समिती निधी देते. बहुतांशी विद्यापीठामध्ये विद्यापीठाचे कुलगुरू ग्रंथालय समितीचे अध्यक्ष असतात, तर विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिष्ठाता, जेष्ठ अध्यापक यांचा समावेश ग्रंथालय समितीचे सदस्य असतात. त्याचप्रमाणे महाविद्यालयीन ग्रंथालयाचे ग्रंथालय समितीचे प्राचार्य हे अध्यक्ष असतात तर विविध विभागांचे विभाग प्रमुख हे ग्रंथालय समितीचे सदस्य असतात तसेच काही जेष्ठ अध्यापक, विदयार्थी प्रतिनिधी सुद्‌धा ग्रंथालय समितीचे सदस्य असू शकतात. ग्रंथालय समिती उपार्जन, संघटन, मूल्यमापन, वाचनसाहित्य रद्‌दबातल करण्याबाबतचे धोरण याचे विस्तारीत स्वरूपात धोरण ठरवण्याचे काम ग्रंथालय समिती करत असते. ग्रंथालय समिती विविध प्रशासकीय व धोरणात्मक निर्णय घेण्यामध्ये ग्रंथालय समिती महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडत असते.

**ग्रंथालयीन कर्मचारी** :–

सातत्याने बदलणाऱ्या परिस्थितीशी तोंड देण्याकरीता, चांगल्या पद्‌धतीने व यशस्वीरित्या काम पूर्ण होण्याकरीता ग्रंथालयाला पुरेशा स्वरूपात आणि दर्जेदार कर्मचारी पुरवणे आवश्यक असते.

अध्यापक (शिक्षक) व विदयार्थी यांच्या अध्यापनाच्या(शिकवण्याच्या) आणि संशोधनाच्या गरजा पूर्ण करण्याइतकी पुरेशी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची आवश्यकता असते. पदानूसार आणि संस्थेच्या गरजा पूर्ण करण्याइतके ग्रंथालयातील जागेनुसार ग्रंथालयीन कर्मचारी असणे आवश्यक असून त्यांचे पुरेसे शिक्षण व त्यांना पूरेसा अनुभव असावा.

ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी आणि त्यांच्या सहकार्यांनी सातत्याने चालणाऱ्या व्यावसायिक विकास, नियंत्रित आणि वाढणारे ज्ञान आणि कौशल्य मिळवण्यासाठी बांधिलकी व्यक्त करणे आवश्यक आहे. ज्ञानाधारीत व्यावसायाकरीता ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी योगदान देणे आवश्यक आहे. ग्रंथालयीन कर्मचारी व्यावसायिकदृष्ट्या सक्षम आणि विविध अधिकार प्रदान केलेले असावेत.

ग्रंथालयीन कर्मचारी माहिती व तंत्रज्ञानाच्या ग्रंथालयातील साधनसामग्रीची वाढ व नियंत्रण राखून ती ग्रंथालयीन तंत्रज्ञान साधने आणि चालू प्रशिक्षणामध्ये भाग घेवून प्रवाहात ठेवू शकतात.

## ४.१७ ग्रंथालयाचे संगणकीकरण

संगणकीकरण ही उत्स्फूर्त गती किंवा स्वतःची चळवळ शक्ती आहे. संगणकीकरण ही संकल्पना सर्वप्रथम १९३६ साली डी.एस.हार्डर यांनी वापरली. प्रगतशील उत्पादन प्रक्रिये दरम्यान विविध भागांची/अवयवांची स्वयंचलीत हाताळणी करण्यासाठी हा शब्द सर्वप्रथम वापरला. हार्डर हा युनायटेड स्टेटस् मधील जनरल मोटार कंपनीमध्ये कार्यरत होता.

"Computerization is defined as the act of implementing a computer based system to enchance business efficiency"[15]

ग्रंथालय संगणकीकरणाच्या बाबतीमध्ये विचार करताना ग्रंथालयामध्ये हस्तलिखीत कामाच्या पद्धतीऐवजी माहिती आणि संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून ग्रंथालयामधील कामामध्ये गतीमानता व कार्यक्षमता तसेच परिणामकारकता आणणे हा उद्देश ग्रंथालय संगणकीकरणाचा आहे. संगणकीकरणामुळे ग्रंथालयांचे चित्र बदलले आहे. ग्रंथालयांचे हाताने लिखीत स्वरूपात कामांऐवजी संगणकाच्या सहाय्याने ही कामे केल्यास ग्रंथालय आणि माहितीकेंद्रातून दिल्या जाणाऱ्या सेवा योग्य ती माहिती वाचकास व योग्य त्या वेळेत आणि तत्परतेने मिळण्यासाठी ग्रंथालयाचे संगणकीकरण आवश्यक आहे. ग्रंथालयाचे अंशतः संगणकीकरणही करता येणे शक्य आहे. उदाः. इलेक्ट्रॉनिक तालिकीकरण तसेच संपूर्ण ग्रंथालयाचेही संगणकीकरण करता येते उदाः. उपार्जन, तालिकीकरण, वर्गीकरण, ग्रंथदेवघेव तसेच नियतकालिकाचे व्यवस्थापन इ. कामामध्ये केली जाणारी दैनंदिन, नित्याची तसेच लिपिकीय कामे संगणकाव्दारे केल्याने त्या कामासाठीचा वेळ व पैसा कमी खर्च होईल तसेच ही कामे संगणकाव्दारे केल्याने कामात अचूकता, तत्परता, प्रभावीपणा आणि परिणामकारकता येवू शकते.

पारंपारिक पद्धतीने चालणाऱ्या ग्रंथालयामधील उपार्जन, तालिकीकरण, ग्रंथदेवघेव करण्यासाठी संगणकीकरणाच्या प्रक्रियेमध्ये पूर्णपणे संगणकीकरण किंवा कांही अंशी संगणकीकरणासाठी डेटा प्रोसेसिंग मशिन्स वापरल्या जातात. त्याकरीता संगणक आज्ञावलींचा वापर केला जातो. त्यांच्या सहाय्याने पारंपारिक पद्धतीने केली जाणारी कामे यंत्राच्या सहाय्याने केली जातात. त्यामुळे कामामध्ये वेळेची बचत होवून सेवा अधिक प्रभावीपणे व परिणामकारकपणे देता येवू लागल्या आहे तसेच कामातील चूकाही कमी होण्याकरीता मदत झाली आहे. ग्रंथालयातील विविध सूचीय, सारात्मक माहिती संगणक आज्ञावलीमध्ये साठवून ठेवली जाते व तिची पुर्नप्राप्ती करून ती माहिती वाचकांना त्वरीत उपलब्ध करून देता येवू शकते.[१६]

**४.१७.१ संगणकीकरणाची आवश्यकता :-**

सध्याच्या माहिती स्फोटाच्या युगामध्ये वाढलेली छापील आणि इलेक्ट्रॉनिक माहिती संसाधनाचे प्रभावीपणे उपार्जनाचे व्यवस्थापन, त्याचप्रमाणे वाढत जाणारी वाचक संख्या आणि त्यांच्या माहिती विषयीच्या मागणीतील विविधता यांची पूर्तता करण्यासाठी ग्रंथालयांचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे. संगणकीकरणाच्या माध्यमातून प्रचंड स्वरूपातील माहितीचे व्यवस्थापन व पुर्नप्राप्ती माहिती संसाधनाच्यासाठीचा खर्च यांचा प्रभावी मेळ घालता येवू शकतो. माहितीचे उपार्जन, सोपस्कार, तिची साठवण व पुर्नप्राप्ती व एवढी प्रक्रिया केलेली माहिती वाचकांना अचूकपणे, वेळेत, प्रभावीपणे, सातत्याने, नियमितपणे पुरवण्यासाठी संगणकीकरणाची प्रक्रिया अत्यावश्यक बनलेली आहे. संगणकीकरणाच्या आवश्यकतेची प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**१) माहितीचा स्फोट :-**

सध्याच्या माहिती स्फोटाच्या युगामध्ये प्रकाशित व अप्रकाशित स्वरूपात निर्माण होणाऱ्या माहितीमध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. या स्वरूपातील माहितीचे अर्थातच अप्रकाशित माहितीचे बाबतीत मोठ्या प्रमाणात अडचणी येत आहेत त्यामुळेच इन्फर्मेशन ओव्हरलोड होवू लागली आहे.[17]

सध्याच्या माहितीस्फोटाच्या काळात संगणकाचा वापर अत्यावश्यक बनलेला आहे. "Computer is capable of storing bulk of information on tiny sotage medium"[18]

ग्रंथालयामध्ये माहिती हाताळण्याच्या संदर्भसेवा, तालिकीकरण इ. सारख्या वेगवेगळ्या पद्धती आहे. परंतू या माहितीच्या विस्फोटामुळे या पारंपारीक पद्धतींच्याव्दारे माहिती हाताळणे अशक्य होवू लागले त्यामुळे संगणकीकरणाची आवश्यकता वाटू लागली.

**२) वाचकांच्या विशिष्ठ व वस्तूनिष्ठ वाचनसाहित्याची वेळेत प्रतिपूर्ती:-**

ग्रंथालयामध्ये वाचकांना हव्या असलेल्या तसेच हव्या नसलेल्या वाचनसाहित्याचा संग्रह असतो. ग्रंथालयाचा वाचकवर्ग, त्याच्या देवघेवी संदर्भातील माहिती तसेच त्याच्या गरजेची तसेच गरजेची नसलेली माहिती आणि प्रत्येक वाचनसाहित्याची स्थिती विषयीची माहिती ग्रंथालय प्रणालीमध्ये असते. या माहितीशिवाय ग्रंथालय कार्यान्वित होवू शकत नाही. संगणकीकरणाच्या उपयोजनाच्या माध्यमातून ग्रंथालयीन कर्मचारी एका क्षणात ग्रंथालयातील वाचनसाहित्य संग्रहाबाबतचा अहवाल बनवू शकतात. माहिती तंत्रज्ञानाच्या या युगातील वाचकांच्या गरजा, अपेक्षा

बदलल्या आहेत. सध्याच्या वाचकांच्या गरजा अधिक वस्तूनिष्ठ बनल्या आहेत तसेच त्यांना ग्रंथालयीन सेवा जगभरात कोठेही व २४ x ७ x १२ उपलब्ध असणे अपेक्षित आहे. वाचकांच्या गरजांची पूर्तता करून त्यांना समाधानी करण्यासाठी ग्रंथालय संगणकीकरणाची आवश्यकता आहे.

**३) कर्मचारी उत्पादकता/क्रियाशिलता वाढवण्यासाठी :-**

ग्रंथालयातील पुष्कळशा दैनंदिन कामांची पुनरावृत्ती होत असते. संगणकीकरणाच्या माध्यमातून या दैनंदिन कामांचे व संसाधनाचे चांगल्याप्रकारे व्यवस्थापन करता येणे शक्य झाले आहे त्यामुळे ग्रंथालयीन वाचकांचा वेळ तर कर्मचारी यांचे श्रम, वेळ व पैसा या मध्ये बचत झाली आहे. संगणकीकरणामुळे दैनंदिन कामे, अधिक पुनरावृत्ती होणारी कामे प्रभावीपणे पार पाडून वाचकांना योग्यप्रकारे सेवा देता येणे शक्य होवू लागले आहे.[१९]

**४.१८ संगणकीकरणाव्दारे ग्रंथालयातील केली जाणारी कामे:-**

**१) उपार्जन :-**

उपार्जन हे ग्रंथालयातील एक प्रमुख काम आहे. सदरच्या कामामध्ये सूचनांचे व्यवस्थापन, मान्यता, आदेश, रद्दबातल आणि स्मरणपत्र, दस्तऐवजांची प्राप्ती, दाखल नोंद, विक्रेता, प्रकाशक, परकीय चलनदर यांचे व्यवस्थापन इ. सारख्या कामाचा समावेश होतो. ही सर्व कामे संगणकीकरणाच्याव्दारे आणि विविध मोड्युल्सच्या सहाय्याने प्रभावीपणे व परिणामकारकपणे करता येणे शक्य होते तसेच केंद्रीभूत पद्धतीने देखील विविध ग्रंथालये या क्रिया संगणकीकरणाच्याव्दारे प्रभावीपणे पार पाडता येवू शकतात.

**२) तालिकीकरण :-**

ग्रंथालयाचा आरसा म्हणून ग्रंथालयाचे तालिकीकडे पाहिले जाते कारण ग्रंथालयातील जे काही वाचनसाहित्य असते त्याचे प्रतिबिंब सूचीय स्वरूपातील माहिती, दस्तऐवाजाचे वर्णन करणारी माहिती तालिका देत असते. ग्रंथालयातील वाचनसाहित्यसंग्रह चांगल्या स्वरूपात आहे की नाही किंवा वाईट, समाधानकारक स्वरूपातील आहे का? हे पाहण्यासाठी ग्रंथालय तालिका माध्यम असते. उपार्जन, संदर्भसेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव यासाठी तालिकेचा उपयोग होतो. वाचकांना मार्गदर्शन करण्याचे काम तालिका करते, तालिका ग्रंथपालांना देखील मार्गदर्शन करण्याचे काम करत असते. ती ग्रंथपालांच्या उपार्जनाच्या वेळी वाचनसाहित्याची पुनरावृत्ती होवू नये यासाठी मदतपूर्ण ठरते. ग्रंथालयातील संग्रह कळण्यासाठी

तालिकेचा उपयोग होतो. त्यामुळे तालिका हे ग्रंथालयामधील महत्त्वाचे साधन म्हणून ओळखले जाते. म्हणून जर या तालिकीकरणाच्या प्रक्रियेचे संगणकीकरण झाले तर वाचकांच्या व ग्रंथपालांच्या दृष्टीने ते अधिक फायदेशीर होईल. वाचकांना व ग्रंथपालांना आवश्यक ती माहिती जलदगतीने शोधण्याकरीता तालिकेचे संगणकीकरण आवश्यक आहे. तालिका ही लॅनच्या माध्यमातून नेटवर्कच्या कार्यकक्षेत आणली तर एका वेळा अनेक वाचकांना तिचा वापर करता येईल. संगणकीकृत तालिकेमुळे ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास हाताने करावी लागणारी वेळखावू कामे, पुन्हाःपुन्हा करावी लागणारी कामे करावी लागणार नाहीत. छापील स्वरूपातील तालिकापत्र आणणे, त्यांच्यातील माहिती हाताने भरणे, तालिका अद्ययावत ठेवणे यासारखी कामे संगणकीकरणाव्दारे प्रभावीपणे करता येतील. छापील तालिकापत्रांचे कॅबिनेटच्या तुलनेत – संगणकीकृत तालिकेसाठी लागणारी जागाही कमी लागेल. अर्थातच जागेची बचत होवू शकते.[२०]

### ३) ग्रंथदेवघेव नियंत्रण :–

ग्रंथदेवघेव पद्धतीमध्ये वाचनसाहित्याचा प्रकार, त्याची जागा सद्यःस्थिती, ग्रंथ देवघेव, नूतनीकरण, वाचनसाहित्य संग्रहातील त्याचे स्थान, वाचकांची कच्च्या स्वरूपातील माहिती, त्यांचे विशेषाधिकार, पुस्तक उसनवारीच्या याद्या, पुस्तक वेळेत जमा न केल्याने होणारा दंड, पुस्तकाचे आरक्षण, पुस्तकाच्या दंडाची सूचना, दंडाची गणना, वाचकांना स्वयंचलनाने सूचना आणि या संदर्भातील इतर माहिती आणि अहवाल यासाठी संगणकीकरणाचा उपयोग होवू शकतो व ही सर्वच कामे संगणकीकरणामुळे जलदगतीने, प्रभावीपणे, अचूकपणे पार पाडता येवू शकतात. काही ठिकाणी RFID च्या माध्यमातून या ग्रंथदेवघेव पद्धतीस पूरक पद्धती वापर होतो आहे.

### ४) नियतकालिकांचे नियंत्रणः–

नियतकालिकांचे संगणकीकरणाच्या माध्यमातून केल्या जाणाऱ्या नियंत्रणामध्ये प्रामुख्याने सूचना, नवीन वर्गणीदार, पुर्ननोंदणी, वर्गणीदार रद्दबातल आणि आदेशाबाबत दावा, सदोष अंक परत करणे, बिलासंदर्भातील कार्यवाही करून बील लेखा विभागाला पाठवणे आणि सांख्यिकीय माहिती यांचा समावेश होतो. हा विभाग अंकांची नोंदणी करणे आणि न मिळालेल्या अंकाचे बाबतीत अहवाल तयार करण्यासाठी एक पद्धती पुरवते.

### ५) माहितीसेवाः–

प्रचलित जागरूकता सेवा, छापील अनुक्रमणिका, निवडक माहितीचे प्रसारण सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा, संदर्भसेवा यासारख्या माहितीसेवा ग्रंथालयीन

संसाधनाच्याव्दारे वाचकांना उपलब्ध करून देण्यासाठी संगणकीकरणाचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होतो.

**६) ग्रंथालयीन तालिकाः–**

ग्रंथालयातील वाचनसाहित्याचे भौतिक स्वरूपाचे वर्णन करणारी, ग्रंथालयाचा आरसा असणारी व ग्रंथालयातील विविध वाचनसाहित्याची माहिती व स्थान दाखवणारी तालिका हे महत्त्वाचे साधन आहे. तालिकेव्दारे ग्रंथालयातील संसाधनाचा शोध घेता येतो. ही संसाधने इतरही ग्रंथालयातून संगणकीकरणाव्दारे प्राप्त करता येवू शकतात. ओपॅकव्दारे संसाधनाचे नाव, लेखक, कळशब्द, प्रकाशक, वर्गांक याव्दारे शोध घेता येवू शकतो.

**७) कार्यालयीन कामाकाजाचे संगणकीकरणः–**

वर्ड प्रोसेसिंग, इलेक्ट्रॉनिक फायलींग व डायरी मॅनेजमेंट आणि ई–मेल व फॅक्स सारखे संप्रेषण या मूळ क्रियांचे एकत्रिकरण म्हणजे कार्यालयीन संगणकीकरण होय, या तीन क्रिया या कोणत्याही संस्थेच्या कार्यालयातील किंवा विभागातील मुलभूत गरजा आहेत.

**४.१९ ग्रंथालय संगणकीकरणाचे फायदे :–**

१) माहितीचा जलद प्रभावी शोध घेता येतो.
२) ग्रंथालयीन कर्मचारी आणि वाचक यांच्या वेळेची बचत होते.
३) मानवी चूकांचे प्रमाण कमी होण्यास मदत होते व कामात अचूकता येते.
४) वेगवान पद्धतीने संप्रेषण होते.
५) सेवांच्या दर्जात, वेगात सुधारणा होऊन त्या प्रभावीपणे देता येतात.
६) संग्रह पडताळणी कामात मदत होते.
७) सहजपणे व सुलभपणे काम करता येते.
८) संसाधनाचे वाटप करण्यास मदत होते.
९) ग्रंथालयीन कर्मचाऱ्यास प्रेरणा मिळते.
१०) मानवी संसाधनाचा विकास होतो.
११) देवघेव पद्धतीवर सुरेख नियंत्रण ठेवता येते.
१२) तालिकीकरण वेगात, प्रभावीपणे करता येते.
१३) विविध प्रकारच्या सेवा देता येतात.

## ४.२० ग्रंथालय संगणकीकरणासाठीच्या आज्ञावली :–

| **Sr. no.** | **Name of Software** | **Platform Support** | **Manufactuere** |
|---|---|---|---|
| 1. | Automation of Libraries | Windows, Linux | BIREME |
| 2. | Alice for Windows | Windows | Softlink |
| 3. | CDS/ISIS | Windows/Dos | UNESCO |
| 4. | DELPLUS | Windows, Linux | DELNET |
| 5. | Evergreen | Windows, Linux | Georgia public Library service |
| 6. | E-Granthalaya | Windows | National Informatics Center |
| 7. | Koha | Windows, Linux | Katipa communications |
| 8. | IO Library Suite | Windows | Agilent |
| 9. | Libsys | Windows, Linux | Info-tek consultants |
| 10. | New Genlib | Windows | Verus Solutions |
| 11. | SLIM ++ | Windows | Algorhythms Consultants |
| 12. | SOUL | Windows | INFLIBNET |

**४.२१ संगणकीकरणासाठी संगणक आज्ञावलीची निवड करताना विचारात घ्यावयाच्या बाबी:–** ग्रंथपालांनी संगणक आज्ञावलींच्या निवड करताना ग्रंथालयातील कामे आणि माहितीची पुर्नप्राप्ती करणेसाठी मदत करणाऱ्या आज्ञावलीची निवड करताना रंधवा यांनी सूचविलेल्या बाबी खालीलप्रमाणे आहेत.[२१]

१) ग्रंथालयांच्या गरजा

२) उत्पादनाचा दर्जा

३) सोयी आणि कामे

४) कर्मचारी प्रशिक्षण आणि सहाय्यकारी सेवा

५) हार्डवेअर/सॉफ्टवेअरची गरज

६) कार्यक्षमता

७) वापरकर्त्याची उपयुक्तता

८) रचना

९) प्रमाणीकरण: एक वापरकर्ता आणि अनेक वापरकर्तेंच्या नेटवर्क जाळे

१०) वापरकर्त्याच्या नियंत्रणाकरीता उपयुक्त संगणक आज्ञावली

११) विविध निर्णय घेण्याकरीता विविध अहवाल तयार करणारी संगणक आज्ञावली

१२) कच्चा स्वरूपातील माहितीचे स्थलांतर किंवा रूपांतर करण्यासाठी सूरक्षास्तर वाढवणारी आज्ञावली.

**४.२२ ग्रंथालय संगणकीकरणासाठी मुलभूत गरजा :–**

१) पुरेशा प्रमाणातील वाचनसाहित्य संग्रह

२) आर्थिक मदत

३) संगणक हार्डवेअर्स

४) संगणक आज्ञावली (सॉफ्टवेअर्स)

५) कर्मचारी प्रशिक्षण

६) विकासासाठीच्या देखभालीचा खर्च

**४.२३ ग्रंथालय संगणकीकरणाच्या पायऱ्या :–**

प्रत्येक ग्रंथालयाचे संगणकीकरण प्रकल्प शाश्वत राहण्याकरीता त्यांनी खालील टप्पानिहाय प्रक्रिया अवलंबवावी. ग्रंथालय संगणकीकरणाच्या मुख्यत्त्वे तीन पायऱ्या आहेत.

१) नियोजन

२) अंमलबजावणी

३) मूल्यमापन

**४.२४ ग्रंथालयीन सेवा**

ग्रंथालयाचे मुख्य कार्य वाचकांची वाचनविषयक गरज भागवणे हे असते. ग्रंथालय ही सेवा देणारी संस्था आहे. ग्रंथालय कोणत्याही प्रकारचे असले तरी सेवा देणे हेच त्याचे उद्दिष्ट असते. ग्रंथालयातील वाचनसाहित्य व वाचक यांचा दुवा ग्रंथालयीन कर्मचारी असतात व हे कर्मचारी अचूक वाचकांना अचूक वाचनसाहित्य कमीत–कमी वेळेत उपलब्ध करून देण्याचे काम करत असतात. ग्रंथालय विविध सेवा वाचकांना पुरवत असतात त्यापैकी काही सेवा खालील प्रमाणे आहेत.

**४.२४.१ ग्रंथदेवघेव सेवा :–**

अचूक वाचकास अचूक वाचनसाहित्य कमीत–कमी वेळेत उपलब्ध करून देणे हे प्रत्येक ग्रंथालयाचे महत्त्वाचे कार्य आहे. प्रत्येक ग्रंथालय आपल्या वाचकांची वाचनाविषयक गरज भागवण्यासाठी कार्यरत असते. लेजर देवघेव पद्धती, कार्ड पद्धती, ब्राऊनी देवघेव पद्धती, नेवार्क देवघेव पद्धती यासारख्या देवघेव पद्धती ग्रंथदेवघेव करण्यासाठी वापरल्या जात होत्या.

Helen Geer advocated that while embarkig on a ciruclation system for alibrary it should be evaluated on the parameter of cost evolved in its organization and administrations, improvement in readers - service and reducations in costly records[22]

### ४.२४.२ संदर्भसेवा :–

योग्य वाचकाला योग्य वाचनसाहित्य योग्यवेळी उपलब्ध करून देण्यासाठी वैयक्तिक पातळीवर केलेली मदत म्हणजेच संदर्भसेवा होय.

Rothstein defines reference service as "personal assistance given by the librarian to the individual reader in pursuit of information"[23]

ग्रंथालयाच्या प्रकारानुसार संदर्भसेवेचे स्वरूप असते. संदर्भसेवा जास्तीत जास्त संशोधन ग्रंथालयातून दिली जाते.

### ४.२४.३ प्रचलित जागरुकता सेवाः–

प्रचलित जागरूकता सेवा ही ग्रंथालयातील एक महत्त्वाची सेवा आहे. ग्रंथालयामध्ये येणारे नव–नविन वाचनसाहित्य, प्रलेख व इतर वाचनसाहित्य वाचकांच्या दृष्टीक्षेपास आणून देणे यालाच प्रचलित जागरूकता सेवा असे म्हणतात.

Vichery CAS as "More frequently and more adequately met by circulation than by retrieving current journals, newly received books and reports, abstract bullettins and the like being fed and scanned by users"[24]

### ४.२४.४ निवडक माहितीचे प्रसारण सेवा :–

सर्वप्रथम १९५९ साली हॅन्स पीटर लून यांनी ही संकल्पना शोधली. ही सेवा व्यक्तिगत पातळीवर मोठ्या प्रमाणावर दिली जाते. यामध्ये वाचनसाहित्याचा प्रोफाईल व वाचकांचा प्रोफाईल हे तयार करून त्यामध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जात असतो. यामध्ये सध्या संगणकाच्या उपयोजनामुळे प्रभावीपणा आलेला आहे.

Luhn defines SDI as "Channeling of new ideas of information from whatever source to those points within the organization wher the probability of usefulness, in connection with current work of interest, is high."[25]

### ४.२४.५ प्रतिलिपी सेवा :–

वाचनसाहित्याची नक्कल बनवणे व ती वाचकांना उपलब्ध करून देणे या सेवेलाच प्रतिलिपी सेवा म्हणतात.

According to Bose reprographic service is a group of mechanical devices whereby one or multiple copies of a document can be made through copying and duplicating process. But reprography covers not only

devices but processes and techniques and also induldes mechanical alongwith photographic, thermal and electronic processes too.[26]

### ४.२४.६ भाषांतर सेवा :-

वाचनसाहित्य वेगवेगळ्या भाषेमध्ये असते. सर्व वाचकांना सर्वच भाषा ज्ञात असतातच असे नाही. वाचकांना त्यांची वाचनसाहित्याची गरज भागविण्यासाठी वाचनसाहित्याचे त्याला ज्ञात नसलेल्या भाषेतून त्याला ज्ञात असलेल्या भाषेत रूपांतर करणे म्हणजे भाषांतर करणे होय.

दळणवळणामधील अडथळा टाळण्यासाठी भाषांतर सेवेची आवश्यकता असते. आयुर्वेद महाविद्यालयामध्ये या सेवेची आवश्यकता मोठ्या प्रमाणावर असते कारण तेथील वाचनसाहित्य मोठ्या प्रमाणात संस्कृत भाषेत असते; ते इंग्रजीमध्ये करणे किंवा इतर प्रादेशिक भाषेत वाचकांना उपलब्ध करून देण्याकरीता भाषांतर सेवेची आवश्यकता असते.

### ४.२४.७ सी.डी.रॉम सेवा:-

माहिती स्फोटाच्या सध्याच्या काळामध्ये माहितीवर त्वरित प्रक्रिया करण्यासाठी आणि माहितीचे उपार्जन करण्यासाठी एक साठवण माध्यम म्हणून सी.डी. रॉमकडे पाहिले जाते. सी.डी. रॉमचा पुरवठा करणे या सेवेलाच सी.डी.रॉम सेवा असे म्हणतात. CD-ROM is more accessible for searching the information and as, it occupies less space and has large storing capacity, it is more suited for libraries[27]

### ४.२४.८ ऑनलाईन सेवा :-

वाचकांना ऑनलाईन डेटाबेसेस, वाचनसाहित्य, वाचनसाहित्याचे इंडेक्सींग, ॲबस्ट्रॅक्टींग पुरवणे यांचा समावेश ऑनलाईन सेवेमध्ये होतो. वाचकांना Web OPAC उपलब्ध करून देणे. वाचकांना विविध सेवा संगणकावर इंटरनेटच्या जोडणीच्या माध्यमातून उपलब्ध करून दिल्या जातात त्यालाच ऑनलाईन सेवा म्हणतात. अशा प्रकारच्या सेवा ग्रंथालयात दिल्या जातात.

### ४.२५) महाविद्यालयीन ग्रंथालय सेवा:-

सातारकर यांनी महाविद्यालयीन ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवांचे १) अत्यंत महत्त्वाच्या सेवा २) इष्ट सेवा या दोन गटात विभाजन केलेले आहे. या दोन गटांविषयीची माहिती सविस्तरपणे खालीलप्रमाणे आहे.[२८]

### ४.२५.१) अत्यंत महत्त्वाच्या सेवाः–

१) ग्रंथालय हे दिवसातून किमान नऊ तास उघडे असणे आवश्यक आहे. जर अध्यापनाचे तास अधिकचे असतील तर महाविद्यालयीन ग्रंथालय दोन तास अगोदर व दोन तास नंतर उघडे असणे आवश्यक आहे.

२) वाचनकक्ष रविवारी तसेच सुट्टीच्या दिवशी (उन्हाळी सुट्टीच्या काही दिवस अगोदर किंवा उन्हाळी सुट्टीच्या होण्याच्या अगोदर) साधारणतः १५ मे ते ३० जुलै पर्यंत प्रत्येक वर्षी उघडा ठेवण्यात यावा.

३) ग्रंथालयातून विदयार्थ्यांना कमीत–कमी दोन तर जास्तीत–जास्त पाच पुस्तके उसनवारीने नेण्याची व्यवस्था असावी.

४) वाचकांना उपयुक्त असलेले वर्तमानपत्रातील लेख नियमितपणे दर्शनी भागात लावणे आवश्यक आहे.

५) प्रचलित जागरूकता सेवा देण्यासाठी ग्रंथालयामध्ये स्वतंत्र कक्ष असणे आवश्यक आहे. या कक्षामध्ये महत्त्वपूर्ण व उपयोगी माहिती साठवली जावी तसेच ती वाचकांच्या निदर्शनास आणून देण्याची सोय असावी.

६) अभ्यासक्रमातील होणाऱ्या बदलांबाबत ग्रंथपालाने जागरूक असणे आवश्यक असते. त्या बदलांबाबतची माहिती ग्रंथपालांना असावी. शैक्षणिक परिस्थितीबाबतची माहिती ग्रंथपालांना असणे आवश्यक असते आणि त्यांच्या अनुषंगाने ग्रंथालय सेवा देण्याबाबतचा आराखडा ग्रंथपालांकडे असावा. जेणेकरून महाविद्यालयाचे विविध कृती कार्यक्रमामध्ये ग्रंथालयाचे योगदान राहणे आवश्यक असते.

### ४.२५.२) इष्ट सेवा :–

१) अध्यापकांचे ज्ञान अद्ययावत ठेवण्यासाठी ग्रंथालय प्रचलित जागरूकता सेवा अध्यापकांना देवू शकते. (Selective Dissimination of Information)

२) विदयार्थ्यांचे सामान्यज्ञान वाढवण्याच्या दृष्टीकोनातून महत्त्वाची असणारी माहिती पुरवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावून पुढे–पुढे नेणारी माहिती प्रस्तूत करणे.

३) याप्रकारच्या कृतींमध्ये अथवा कृतींच्या प्रकारांमध्ये खालील कृतीचा समावेश होतो.

१) दस्तऐवजांची कार्यक्रमानिमित्तीची प्रदर्शने.

२) शिष्यवृत्ती आणि फ्रिशिफ्स् संदर्भातील माहिती देणे.

३) भरती संदर्भातील जाहिराती तसेच करियर संदर्भातील मार्गदर्शन करणे.

४) स्थानिक लोकांना आवडणारे आणि स्थानिक लोकांनी लिहिलेल्या साहित्यकृतीचे अथवा वाचनसाहित्याचे प्रदर्शन भरवणे आणि ते लोकांच्या दृष्टीस पडण्याच्या दृष्टीने भूमिका पार पाडणे

५) इंटरनेट सुविधा.

६) विदयार्थ्यांना त्यांचे प्रकल्प अहवाल पूर्ण करण्यासाठी मदत करणे.

७) मागणी असलेल्या तसेच नसलेल्या वाचनसाहित्याच्या सूची बनवणे.

८) निबंध स्पर्धा, प्रश्नोत्तर स्पर्धांकरीता विदयार्थ्यांना मदत करणे.

९) रेडीओ, दूरदर्शन आणि सार्वजनिक ठिकाणी करावयाच्या संभाषणाच्या तयारीसाठी मदत करणे.

१०) विद्यार्थी व अध्यापकाने नियतकालिके आणि वर्तमानपत्रात केलेल्या लिखाणाचे सादरीकरण करणे.

११) माजी विदयार्थ्यांना विस्तारीत सेवांच्याव्दारे ग्रंथालय सेवा उपलब्ध करून देणे.

१२) बहिस्थः विदयार्थी म्हणून नोंदणी केलेल्या विदयार्थ्यांना त्यांच्याकडून काही ठेव स्वरूपात रक्कम आणि फि स्वरूपात काही रक्कम स्विकारून त्यांना ग्रंथालय सेवांचा लाभ देणे.

### ४.२५.३) ग्रंथालय सेवांची किमान प्रमाणकेः–

महाविद्यालयीन ग्रंथालयासाठी कांही मार्गदर्शक तत्त्वे P.N.Kaula यांनी सूचवली आहेत. ग्रंथालयीन सेवांसाठी व अत्यंत गरजेच्या सेवांसाठी किमान प्रमाणके सूचवली आहेत. त्यांनी केलेल्या सुचनांपैकी ग्रंथालयीन सेवांच्या बाबतच्या कांही महत्त्वाच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत.[२९]

१) महाविद्यालयातील एकूण विदयार्थीसंख्येच्या कमीत कमी १०% विदयार्थी एकावेळी वाचन कक्षामध्ये बसू शकतील एवढा वाचन कक्ष असावा.

२) महाविद्यालयातील शिकवल्या जाणाऱ्या ज्ञानशाखांची, संदर्भग्रंथांची संख्या पुरेशा स्वरूपात व प्रमाणात असावी.

३) महाविद्यालयात शिकवल्या जाणाऱ्या ज्ञानशाखांच्या प्रत्येक विषयांचे किमान १५ नियतकालिकांचे महाविद्यालयाचे ग्रंथालय वर्गणीदार असावे.

४) प्रती १० विदयार्थ्यांमागे एक याप्रमाणे क्रमिक पुस्तके उपलब्ध असावीत.

५) महाविद्यालयामध्ये शिकवल्या जाणाऱ्या ज्ञानशाखांच्या प्रत्येक विषयांसाठीच्या प्रत्येक पुस्तकांच्या कमीत–कमी १० प्रती असाव्यात.

### ४.२६ अत्यावश्यक सेवाः–

१) महाविद्यालयाच्या उद्दिदष्टानूसार आणि गरजेनूसार, ग्रंथ, पाम्प्लेटस् आणि इतर वाचनसाहित्य यांनी परिपूर्ण असणारा अतिशय संतूलित वाचनसाहित्यसंग्रह ग्रंथालयामध्ये असणे आवश्यक आहे.

२) अध्यापनाला पूरक अशी दृकश्राव्य साधने आणि इतर यांत्रिक साधनांचा पुरवठा ग्रंथालयाने करणे आवश्यक आहे.

३) अध्यापकीय वर्गाला त्यांना स्वतःचा अभ्यास करण्यासाठी आणि संशोधनाचे काम करण्यासाठी ग्रंथालयामधील विविध संसाधने सहजतेने उपलब्ध झाली पाहिजेत.

४) जास्तीत–जास्त पुस्तकांचा वापर करून विदयार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रूंदावण्याकरीता विदयार्थ्यांना ग्रंथालयांनी मदत करणे आवश्यक आहे.

५) ग्रंथालयाची साधने आणि साहित्य यांचा वापर करण्याचे धाडस करण्याचे धैर्य आणि शिक्षण ग्रंथालयांनी देणे आवश्यक आहे.

६) सूचनांच्या स्वरूपातील वाचनसाहित्य शोधण्यासाठी मदत करणे आणि ते सर्व शिक्षकांना विदयार्थ्यांच्या मनात उत्तेजना निर्माण होण्याकरिता करण्यासाठी वाटप करणे आवश्यक आहे.

७) त्यांच्या क्षेत्रातील ग्रंथालयाच्याव्दारे आंतरग्रंथालयीन देवघेव आणि संसाधनाचे वाटप करण्याची सोय उपलब्ध करून देणे आवश्यक असते.

### ४.२६.१ वाचनसाहित्यसंग्रहः–

१) महाविद्यालयात शिकवल्या जाणाऱ्या ज्ञानशाखांतील प्रत्येक विषयासंबंधीचे नवीनतम् वाचनसाहित्याचे प्रवाहात असणारे वाचनसाहित्य ग्रंथालयात असावे.

२) समाजातील लोकांच्या गटातील विदयार्थ्यांपैकी ५०% विदयार्थ्यांना पुस्तक पेढी सुविधा पुरवण्यात यावी.

३) त्या भागातील इतर ग्रंथालयाशी ग्रंथपालाचे संबंध मदतपूर्ण असावेत. जेणेकरून त्या भागातील सहकारी तत्त्वावरील प्रकल्पांना ग्रंथालयीन सेवांचे विस्तारीकरण करणेच्या प्रकल्पांना पुढे नेता येईल.

### ४.२६.२ वित्ताबाबतः–

१) महाविद्यालयाचे अर्थसंकल्पातील रक्कमेच्या किमान ६.२५% रक्कम ग्रंथालयीन सेवावंर खर्च होणे अपेक्षित आहे.

२) प्रत्येक वेगवेगळया विषयासाठीचे निधीचे अचूकपणे वाटप होणे आवश्यक आहे.

३) शैक्षणिक वर्षाच्या सुरूवातीलाच निधी मिळणे आवश्यक आहे.

४) प्रत्येक आर्थिक वर्षातून मिळालेल्या निधीचा वापर कसा करावयाचा याचे मार्गदर्शन अर्थातच सूचना ग्रंथपालांनी देणे आवश्यक आहे.

५) एका वर्गातील सरासरी ५० विदयार्थ्यांना वाचनकक्षाची सुविधा असावी.

६) महाविद्यालयात शिकवल्या जात असलेल्या मुख्य विषयाची पुस्तके सूची आणि संदर्भसाहित्य यांचे प्रतिनिधीत्व संग्रह वाचनकक्षात असला पाहीजे.

७) ग्रंथालय मुक्तव्दार असावे.

८) ग्रंथालय वर्षभर उघडे असावे.

९) ग्रंथालय संग्रह पडताळणी झाल्यानंतर ग्रंथालयातील हरवलेली पुस्तके ग्रंथालय संग्रहातून रद्दबातल केली पाहिजेत.

१०) ग्रंथालय समितीने सल्लागार समिती म्हणून कार्य केले पाहिजे.

११) वाचनसाहित्य संग्रहाचे संघटन करणेसाठी व त्यांची पुर्नप्राप्ती करण्यासाठी तालिकीकरण व वर्गीकरण तसेच अत्याधुनिक व स्पष्ट पद्धतीची गरज असते.

**४.२७ ग्रंथालयातील प्रमाणकेः-**

ग्रंथालयाचे संघटन व सेवा यांच्या बाबतीत पुरेशी प्रमाणके ग्रंथालय क्षेत्रात नाहीत. दस्तऐवजाचे क्षेत्रामध्ये प्रमाणकांची आवश्यकता असल्याची जाणीव व महत्त्व डॉ. एस आर. रंगनाथन् यांना वाटत होते. भारतीय प्रमाणक संस्थेच्या दस्तऐवज विभागीय समितीने ३१ प्रमाणके तयार केली.

ही सर्व प्रमाणके ही नियतकालिके, पुस्तकांची ग्रंथनामे, लेखकाचे मत, अणुक्रमणिका सार बनवण्यासाठीची सूत्रे, तालिकीकरणाच्या संज्ञाची यादी, ग्रंथसूचीय संदर्भ, सार, मोबाईल ग्रंथालय खोली, ग्रंथालय इमारत, कॅबिनेटस्ची रचना, ग्रंथालयातील फर्निचर्सची फिटींग, थिसॉरस, ग्रंथसूचीय नोंदी इ. ग्रंथालयीन सेवांच्या बाबतीत कोणतेही प्रमाणक तयार करण्यात आलेले नव्हते.

विद्यापीठीय अनुदान आयोगाचे तत्कालीन अध्यक्ष डॉ. डी.आर. कोठारी यांचे अध्यक्षतेखाली १९६४ मध्ये शिक्षण आयोगाची स्थापना करण्यात आली. सदरच्या आयोगामध्ये एकही ग्रंथपाल सदस्य नव्हता, तर डॉ. एस्.आर.रंगनाथन यांचा विशेषतज्ञ म्हणून सल्ला घेतला जात होता.

१९६६ सालच्या कोठारी आयोगाच्या अहवालामध्ये डॉ. एस.आर.रंगनाथन यांच्या महाविद्यालयीन अध्यापन हे वर्गखोली ओरिएंटेड पेक्षा ते ग्रंथालय ओरिएंटेड असावे असे नमूद केले. या आयोगाने ग्रंथालयाचे महत्त्व अधोरेखित करून सध्या ग्रंथालयातील पुस्तक व नियतकालिकांवर केला जाणारा खर्च समाधानकारक

नसल्याचे नमूद केलेले आहे. ग्रंथालयामध्ये संदर्भसेवेच्या आवश्यकतेवर भर दिलेला असून प्रत्येक विदयार्थ्यामागे २५/– रू व प्रत्येक शिक्षकास मात्र ३००/– अनुदान देण्याची व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्याची शिफारस केलेली आहे. ज्या ग्रंथालयांना पाच वर्षे पूर्ण झालेली आहेत. त्यांना ३,००,०००/– जास्तीचा निधी त्यांचा वाचनसाहित्य संग्रह सक्षम व नियंत्रित करण्याकरीता खर्च करण्यात यावा, असेही सूचवले आहे. इतर ग्रंथालयांनी त्यांच्या अंदाजपत्रकापैकी ६.२५ % ते १०% पर्यंत रक्कम त्यांच्या संग्रहाच्या विकासावर खर्च करावी. कोठारी आयोगाने 'एखाद्या विभागाने त्यांच्या ग्रंथालयाकडे दूर्लक्ष केले किंवा त्याला कमी महत्त्व दिले तर ते त्या विभागाकरीता अतिशय धोकादायक असते' असे सांगितले आहे परंतु कोणतेही महाविद्यालय किंवा विद्यापीठ त्यांना मिळणाऱ्या निधीपैकी ६.२५ निधी ग्रंथालयावर खर्च करत नसल्याचे वास्तव आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने उच्चशिक्षण पद्धतीकडे लक्ष द्यावयला पाहिजे होते. १९४८ मध्ये नेमलेल्या राधाकृष्ण आयोगाने उच्चशिक्षण देणाऱ्या संस्थांचा सर्व्हे करून काही शिफारशी केल्या होत्या. या आयोगाने डॉ.एस.आर.रंगनाथन यांचाच सल्ला ग्रंथालयांच्या बाबतीमध्ये घेतलेला होता. ग्रंथालयाचे बाबतीत समितीने त्यांची निरिक्षणे नोंदवलेली होती. बहुतांशी महाविद्यालये व विद्यापीठ यांच्यामधील ग्रंथालय सुविधा अत्यंत कमी प्रतीची आहे असे सांगितले असून त्यांनी आपल्या अहवालामध्ये पुढे असेही नमुद केले होते की, ग्रंथालये ही पूर्ण विद्यापीठीय कामांचे ह्दय आहे. विद्यापीठामध्ये शास्त्रीय व मानवशास्त्रीय शाखांचे अभ्यासाकरीता उच्चतम दर्जाची ग्रंथालये अत्यावश्यक असून आम्ही असेही शिफारस करत आहोत की, एकूण अर्थसंकल्पापैकी ६.२५% रक्कम महाविद्यालये व विद्यापीठीय ग्रंथालयांना देण्यात यावी आणि प्रत्येक विद्यार्थ्यामागे रू. ४०/– इतका वार्षिक निधी त्यांच्या ग्रंथालयांना देण्यात यावा.

प्रत्येक पाच वर्षात ग्रंथालयाला महत्त्वाची पुस्तके आणि नियतकालिके खरेदी करण्यासाठी खास निधी उपलब्ध करून देण्याची आयोगाने शिफारस केली आहे. आयोगाला महाविद्यालयाचे व विद्यापीठाचे ग्रंथालयांना देणाऱ्या अपूऱ्या निधीमूळे आवश्यक प्रकाशनाची पुस्तके खरेदी करणे अशक्यप्राय होत असल्याचे निदर्शनास आलेले होते हि बाब आयोगाचे लक्षात आली होती. इतर काही शिफारशीमध्ये मुक्तव्दार पद्धत, पदवीच्या वाचकांना प्रशिक्षण, उच्चशिक्षित व प्रशिक्षित कर्मचारी वर्ग, दिवसभरातून कमीत–कमी १२ तास ग्रंथालय उघडे ठेवणे तसेच आठवड्यातील सातही दिवस ग्रंथालय उघडे ठेवणे या शिफारशी केलेल्या आहेत.

**ए.सी.आर.एल.ने सूचवलेली प्रमाणके**:– ए.सी.आर.एल. यांनी मध्ये ग्रंथालयाकरीता काही प्रमाणके सूचवली आहेत.[३०]

**४.२७.१. वाचनसाहित्य संग्रह** :–

संस्थेची संशोधन आणि अध्यापनाची ध्येय पूर्ण करण्यासाठी ग्रंथालयांनी त्यांच्या वाचकांना परिपूर्ण, दर्जात्मक, सखोल, विविधांगी, विशिष्ट नमुन्यातील, नवीन व पूरक वाचनसाहित्य पूरवणे आवश्यक आहे. ग्रंथालयाने संशोधनाचे संबंधित क्षेत्राशी निगडीत, अभ्यासक्रमाशी संबंधित किंवा संस्थेला अधिक बळकटी देणारा वाचनसाहित्य संग्रह पुरवणे आवश्यक असते. दृश्यात्मक व भौतिक स्वरूपात हाताळता येणाऱ्या विविध स्वरूपातील संसाधनाच्या स्वरूपात असणारा वाचनसाहित्यसंग्रह ग्रंथालयाने पुरवणे आवश्यक असते. दूर्मिळ तसेच डिजिटल स्वरूपातील वाचनसाहित्याचे जतन व पुरवठा ग्रंथालयाने करणे आवश्यक आहे. वाचकांना आवश्यक असणाऱ्या वाचनसाहित्याचे संग्रहण, संघटन, वापर, प्रसारण व जतन करण्यासाठी ग्रंथालयांकडे सुविधा असणे आवश्यक आहे. ग्रंथालयांनी गुणात्मक दळणवळणाच्या आर्थिक आणि परिपूर्ण नमुन्याशी संबंधित समस्यांबाबतीत वाचकांना प्रशिक्षित देणे आवश्यक आहे. ग्रंथालयांनी गुणात्मक व सांस्कृतिक अभिलेख खूप काळ वाचकांना पुरवले पाहिजेत.

**४.२७.२ जागा**:–शिकण्याला विस्तारीत व नवीन ज्ञानाच्या निर्मितीला प्रोत्साहीत करण्याच्या दृष्टीने भौतिक आणि दृश्य स्वरूपातील साहित्याचे आदानाप्रदान करण्यासाठीचे वस्तुनिष्ठ ठिकाण ही ग्रंथालये आहेत. स्वतःच्या आभासी व भौतिक जागेचा  पुरेशा वापर करण्यासाठी माहितीचे आदान प्रदान करण्यासाठी ग्रंथालये मदत करतात की जी त्यांचे अंर्तज्ञानी सुचालन करतात. ग्रंथालये सुरक्षित आणि विश्वसनीय भौतिक आणि आभासी वातावरण निर्माण करतात कि जे अभ्यास आणि संशोधनाकरीता उपयुक्त आहे ते पुरवतात. अभ्यास आणि संशोधनाकरीता विश्वसनीय आणि मजबूत आभासी वातावरण करण्यासाठी ग्रंथालय माहिती तंत्रज्ञानाच्या साधनसामग्रीचा वापर करतात. ग्रंथालये त्यांच्या भौतिक आणि आभासी जागांचा वापर बौद्धिक लोकांना कार्यक्रम, प्रदर्शन, व्याख्याने आणि इतर कार्यक्रमांसाठी करतात. ग्रंथालये शिकण्याच्या दृष्टीने उपयुक्त बनण्याकरिता सहकार्यात्मक सुविधा निर्माण करण्यासाठी आणि अध्ययनासाठी तसेच नवीन ज्ञाननिर्मीती करीता मदत करतात.

ग्रंथालये स्वच्छ, आकर्षक आणि पुरेशी जागा, संशोधनाकरीता आणि अभ्यासाकरीता पूरक वातावरण हे योग्य पर्यावरणीय परिस्थितीनूसार आणि योग्य वेळेत

त्यांच्या मनुष्यबळाच्या सहाय्याने, संसाधनांच्या व संग्रहाच्या सहाय्याने त्यांच्या सेवा देण्यासाठी करतात. वाचकांशी सल्लामसलत करून ग्रंथालये भौतिक व आभासी जागांची माहिती त्यांना देते.

**४.२७.३ व्यवस्थापन/प्रशासन :–**

ग्रंथालये ही सातत्याने नियोजन आणि वाचकांना दिल्या जाणाऱ्या वाचनसाहित्याचे मूल्यमापन करणे आणि त्यांचे ध्येय प्रभावीपणे आणि परिणामकारकपणे पूर्ण करण्यासाठी कार्यरत असतात. संस्थेने विकसित केलेली ग्रंथालयाची ध्येये आणि उद्‌दिष्टे एका रांगेत ठेवून सातत्याने पुढे ढकलेली जातात.

ग्रंथालयाचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांनी संस्थेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये भाग घेणे आवश्यक आहे. संस्थेच्या इतर गरजा संतुलित राखताना ग्रंथालयास देण्यात येणारा निधी हा वाचकांच्या वाजवी अपेक्षांची पूर्ती करण्यासाठीची संसाधने उपलब्ध करुन देण्याकरीता पुरेसा असावा. प्रभावी खर्च परिणामकारकता आणि वाचनसाहित्यसंग्रहाचा वापर वाढण्यासाठी ग्रंथालयांनी एकत्रित येवून 'कन्सोर्शिया' ची स्थापना करणे आवश्यक बनले आहे.

औपचारिक आणि अनौपचारीक मूल्यमापनाच्या विविध पद्धतीतून बाहेर आलेले परिणाम आणि डेटा यांच्यावर ग्रंथालयाच्या योजना आधारीत असाव्यात.

ग्रंथालयाच्या वापरकर्त्यांना ग्रंथालयाशी केलेल्या संभाषणात्मक मुल्यमापनातून परिणाम मिळू शकतो. सातत्याने सुधारीत होण्याची संस्कृती हे ग्रंथालयीन व्यक्तींना आदर्श बनेल. सातत्याने सुधारणा होण्याकरीता ग्रंथालयांनी माहिती तंत्रज्ञानाच्या साधनसामग्रीचा वापर कच्चा स्वरूपातील माहिती गोळा करणे, विश्लेषण करणे आणि तिचा करणे वापर आणि इतर मूल्यमापनासाठी करणे आवश्यक असते.

**सारांश :–**

कोणतेही प्रकारचे ग्रंथालय असो त्या ग्रंथालयास काही मुलभूत कार्य व ग्रंथालय सेवा देणे आवश्यक आहे. सर्व कार्य व सेवा ह्या आवश्यक आहेत. परंतु गुणात्मक संग्रह विकास, ग्रंथालय सेवा, आधुनिकीकरण, संगणकीकरण, जागतिक माहितीचा शोध इ. महत्त्वाची कार्य ग्रंथालयास करावी लागतात व यासाठी कार्यक्षम व प्रशिक्षित ग्रंथपाल नेमणे आवश्यक आहे. तसेच वाचकाच्या गरजा शोधणे व त्याप्रमाणे वाचनसाहित्यसंग्रह विकास करून दर्जेदार व प्रभावी ग्रंथालयीन सेवा वाचकांना देणे आवश्यक असते. त्याकरीता तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ग्रंथालयीन सेवा अधिक प्रभावीपणे, कार्यक्षमतेने, अचूकतेने देता येऊन सेवेत व ग्रंथालयीन कामात सुलभता येते.

## संदर्भसूची –


1. Prashar, R. G. (1993). Developing Library Collection. Ludhiana : Medallion Press. P. 15
2. Gopinath, M. A., & Rao IKR. (1982). Collection Development and Users: an analytical approach(19), DRTC Annual Seminar.
3. Harrod's Librarians Glossary... and Reference Book. (1987) Complied by Ray Prytherch. Ed. 6. Brookfield Vermont : Gower Publishing
4. Chopra, H. R. (1994). Wedding - out Library Material in Academic Libraries. Ed.by Chaturvedi. DD. Delhi : Anmol Prakashan
5. Evans, G. Edward. (2004) Developing Library and Information Centre Collections (4th Ed.) Libraries Unlimited : Colorado: Greenwood Publication. p 16-17
6. Krishna, K. (1986). Library Manual. New Delhi : Vikas Publishing House.
7. Perkins, D.L. (Ed.) (1979). Guideline for Collection development. Chicago : American Library Association. p. 20
8. Dhimal, A. K. (2002). Academic Libraries. New Delhi : Ess Ess Publications.
9. Indira Gandhi National Open University. (1998). Academic Library System : Collection Development (MLIS-E-3). New Delhi : IGNOU
10. Lax, MRN., & Rattan, R. N. (1993). Collection Development in University Academic Library Role in the National Development Festschriften volume in honour prof. N.B. Ramaiah. Madras : T. R. Publication.
11. Mittal, R. L. (1993). Library Administration : Theory & Practice. Ed. 5. (Reprint), New Delhi : Metropolitan Book Co. Pvt. Ltd.
12. Shipman, J. C. (1971). Collection Building in Encyclopedia of Library information Science (A. Kent, Ed.). New York : Marcle Dekker.
13. Prashar, R. G. (1993). Developing Library Collection. Ludhiana : Medallion Press.
14. Srivastava, A. P. (1994). Collection Development in India. University News, February-7.
15. Retrieved March, 22, 2017, From http:\\www.absolutesolutions.co.uk/computer.htm.
16. Kent, A. (1997). Encyclopedia of Library and Information Science. New York : Marcel Dekker. p. 19

17. Information Explosion. (2017) Retrieved Jan. 21, 2017 http://en.wikipedia.org/wiki/information explossion
18. Sharma, Pandey, S. K. (1993). Library Computerization : Theory and practice. New Delhi : Ess Ess Publication p. 94
19. Moorthy, A. Lakshman. (2004). Library Automation in India. In Horizon of Information Technology : New Age, New Wage Trend and impact of Library Science, 1, 288-300
20. Saffady, William. (1988). Library Automation : An Overview. Library Trends. 37, 269-281.
21. Randhawa, S. (2013), Open Source Library Management Software. E-Library Science research Journal. I-7. 2-3.
22. Geer, H. T. (1955). Charging System. Chicago: ALA p.4.
23. Rothstein, S. (1961). Reference Service : New Dimension in Librarianship Coll. and Res. Lib. Vol. 22,(1.) pp. II-18
24. Vichery, B.C. ( Brain Campbell) (1965). On Retrieval System Theory, (II Ed.) Buter worths, Washington. P. 154.
25. Lohn, H. P. (1961). Selective Dissemination of New Scientific Information with the Aid of Electronic Processing Equipment. American Documentation, Vol-12 (4), pp. 131-138
26. Bose, H. (1972). Reprography in Documentation in Goyal, S.P. (Ed.). Indian Librarianship. Delhi : scientific Books Store. p. 29
27. Khan, M.T.M. (1997). Information Organization and Communication. New Delhi : Ess Ess Publication. p. 258
28. Satarkar, S.P. (2000). Personel Management in College Libraries. Jaipur: Rawat Publications. p. 149-150.
29. Kaula, P. N. (1994). Academic Libraries. New Delhi : Anmol Publication Pvt. Ltd. p. 117-119
30. ACRL. (2012). Standards for Libraries in Higher Education. C & RL News. p 34-39

# प्रकरण ५ वे
# माहितीचे विश्लेषण

पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांचे एकूण २२ ग्रंथपालांना प्रश्नावली देण्यात आलेली होती. त्यापैकी १७ ग्रंथपालांनी प्रश्नावली भरून दिलेली आहे. या प्रश्नावलीमधील उत्तरांचे विश्लेषण खालीलप्रमाणे करण्यात आलेले आहे.

**तक्ता क्र. १ :** पश्चिम महाराष्ट्रातील जिल्हानिहाय आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या

| अ.क्र. | जिल्हा | आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ०६ | २७.२७% |
| २. | कोल्हापूर | ०४ | १८.१८% |
| ३. | पुणे | ०६ | २७.२७% |
| ४. | सांगली | ०३ | १३.६४% |
| ५. | सातारा | ०२ | ९.०९% |
| ६. | सोलापूर | ०१ | ४.५५% |
| | एकूण | २२ | १००% |

वृत्तालेख क्र.१




**विश्लेषण–**

पश्चिम महाराष्ट्रातील अहमदनगर व पुणे जिल्ह्यांमध्ये आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या सर्वात जास्त असून ती प्रत्येकी ०६ इतकी आहे. त्यांचे शेकडा प्रमाण प्रत्येकी

२७.२७ % इतके आहे. या दोन जिल्ह्यांमध्ये पश्चिम महाराष्ट्रातील निम्म्यांहून अधिक आयुर्वेद महाविद्यालये आहेत. सर्वात कमी आयुर्वेद महाविद्यालये सोलापूर जिल्ह्यात असून त्यांची संख्या फक्त एक इतकी असून त्याचे शेकडा प्रमाण ४.५५% इतके आहे.

**निष्कर्ष :–**

पश्चिम महाराष्ट्रात एकूण ६ जिल्ह्यात २२ आयुर्वेद कॉलेज आहेत यामध्ये पुणे व अहमदनगर ह्या जिल्ह्यात सर्वात जास्त (२७%) महाविद्यालये आहेत दोन्ही जिल्हे मिळून ५६% तर सोलापूरात ४% महाविद्यालये आहेत. थोडक्यात पुणे व अहमदनगर जिल्हा आघाडीवर आहे.

**तक्ता क्र. २ : जिल्हानिहाय प्रतिसादक संख्या**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | प्रतिसादक महाविद्यालय ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ०४ | २३.५३% |
| २. | कोल्हापूर | ०३ | १७.६५% |
| ३. | पुणे | ०६ | ३१.२९% |
| ४. | सांगली | ०२ | ११.७६% |
| ५. | सातारा | ०१ | ०५.८८% |
| ६. | सोलापूर | ०१ | ०५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**वृत्तालेख क्र.२**



**विश्लेषण –**

पश्चिम महाराष्ट्रातील २२ महाविद्यालय ग्रंथपालापैकी १७ महाविद्यालयीन ग्रंथपालांनी प्रतिसाद दिला आहे. १७ महाविद्यालयीन ग्रंथपालापैकी सर्वात जास्त प्रतिसादात पुणे जिल्ह्यातील आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथपालांनी प्रतिसाद दिला. त्यांचे प्रतिसादाचे प्रमाणे ३५.२९% इतके आहे व त्याची संख्या ६ इतकी आहे.

एकूणात सर्वात कमी वाटा प्रमाण सातारा व सोलापूर जिल्ह्यातील ग्रंथपालांचा असून त्यांचे शेकडा प्रमाण प्रत्येकी ५.८८% इतके आहे व या जिल्ह्यातील प्रत्येकी १ महाविद्यालयाचे ग्रंथपालानी प्रतिसाद दिलेला आहे.

**निष्कर्ष**–पश्चिम महाराष्ट्रातील प्रतिसादीत १७ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी सर्वाधिक महाविद्यालय पुणे जिल्ह्यातील आहेत.

**तक्ता क्र. ३ जिल्हानिहाय पुरवण्यात आलेल्या प्रश्नावलीची संख्या व प्रतिसादक संख्या**

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | पुरवण्यात आलेल्या प्रश्नावलींची संख्या | प्रतिसादक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ०६ | ०४ | ६६.६७% |
| २. | कोल्हापूर | ०४ | ०३ | ७५.००% |
| ३. | पुणे | ०६ | ०६ | १००% |
| ४. | सांगली | ०३ | ०२ | ६६.६६% |
| ५. | सातारा | ०२ | ०१ | ५०.००% |
| ६. | सोलापूर | ०१ | ०१ | १००% |
| | एकूण | २२ | १७ | ७७.२७% |

**विभाजित स्तंभालेख क्र.१**



**जोडस्तंभालेख क्र.१**




**विश्लेषण –**

पश्चिम महाराष्ट्रातील जिल्ह्यानिहाय पुरविण्यात आलेल्या प्रश्नावलींची संख्या व प्रतिसादकांची संख्या दिलेली आहे. यामध्ये सोलापूर व पुणे जिल्ह्यातील प्रतिसादाची टक्केवारी सर्वाधिक असून या दोनही जिल्ह्यातील प्रतिसादाचे शेकडा प्रमाण १००% इतके आहे. म्हणजेच पुणे जिल्ह्यातील एकूण ६ महाविद्यालयीन ग्रंथपालांना प्रश्नावली पाठवली होती व त्या सर्वच महाविद्यालयीन ग्रंथपालांनी भरून दिली त्यामूळे त्यांचा प्रतिसाद १००% इतका आहे, तसेच सोलापूर जिल्ह्यातील एकच महाविद्यालय असून तेथील ग्रंथपालाना प्रश्नावली पुरवण्यात आलेली होती व ती त्यांनी भरुन दिली आहे. म्हणून तेथील प्रतिसाद १००% इतका आहे.

सर्वात कमी प्रतिसादाची शेकडेवारी सातारा जिल्ह्यातील असून त्यांचे शेकडा प्रमाण ५०% इतके आहे. सातारा जिल्ह्यातील २ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथपालांना प्रश्नावली पुरवण्यात आलेली होती. त्यापैकी १ ग्रंथपालाने प्रश्नावली भरून दिलेली आहे. एकूण २२ महाविद्यालयातील ग्रंथपालांना प्रश्नावली पाठवण्यात आलेली होती त्यांपैकी १७ ग्रंथपालांनी प्रतिसाद दिलेला असून त्यांचे शेकडा प्रमाण ७७.२७% इतके आहे.

**तक्ता क्र. ४ प्रतिसादक महाविद्यालयाची स्थापना (वर्षासह)**

| अ.क्र. | महाविद्यालयाचे नांव | स्थापना वर्ष |
|---|---|---|
| १. | गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय आणि हॉस्पिटल, अहमदनगर | १९१७ |
| २. | प्रवरा मेडिकल ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, शेवगांव, जिल्हा. अहमदनगर | १९९९ |
| ३. | श्री. विवेकानंद नर्सिंग होम ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, राहुरी फॅक्टरी, राहुरी, जिल्हा अहमदनगर | १९९१ |
| ४. | अश्विनी रूरल आयुर्वेद महाविद्यालय अश्वी (बु), जिल्हा. अहमदनगर | २००० |
| ५. | यशवंत आयुर्वेद महाविद्यालय पदव्युत्तर शिक्षण व संशोधन केंद्र, कोडोली, जिल्हा. कोल्हापूर | १९८९ |
| ६. | कै. केदारी रेडेकर आयुर्वेद महाविद्यालय, शेंदरी माळ, गडहिंग्लज, जिल्हा. कोल्हापूर | १९९९ |
| ७. | डॉ. जे.जे. मगदूम ट्रस्टचे, डॉ. जे.जे. मगदूम आयुर्वेद महाविद्यालय, जयसिंगपूर, जिल्हा. कोल्हापूर | २००५ |
| ८. | महाराष्ट्र आरोग्य मंडळाचे, सुमतीभाई शहा आयुर्वेद महाविद्यालय, हडपसर, पुणे | १९९० |
| ९. | टिळक आयुर्वेद महाविद्यालय, रास्ता पेठ, पुणे | १९३३ |
| १०. | पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे, कॉलेज ऑफ आयुर्वेद आणि रिसर्च सेंटर, निगडी, पुणे | १९९० |
| ११. | पद्मश्री डॉ. डी.वाय. पाटील आयुर्वेद महाविद्यालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे | १९९८ |
| १२. | बी.एस.डी. ट्रस्टचे आयुर्वेद महाविद्यालय, वाघोली, पुणे | १९९८ |
| १३. | आयुर्वेद शिक्षण मंडख, पुणेचे अष्टांग आयुर्वेद महाविद्यालय, पुणे | १९३६ |
| १४. | वसंतदादा पाटील आयुर्वेद महाविद्यालय आणि इन्स्टिटयुट ऑफ योगा, सांगली | १९८१ |
| १५. | आ.श्री. आण्णासाहेब डांगे आयुर्वेद महाविद्यालय, आष्टा, सांगली | २००० |
| १६. | एस.सी.एस.ई. चे रूरल इन्स्टिटयुट आयुर्वेद ॲण्ड रिसर्च सेंटर ॲण्ड हॉस्पिटल,मायनी, जिल्हा. सातारा | २००० |
| १७. | सेठ गोविंद रावजी आयुर्वेद महाविद्यालय, सोलापूर | १९६२ |

**विश्लेषण:**

२२ आयुर्वेद महाविद्यालयात १९१७ मधील नगर येथील आयुर्वेद महाविद्यालय सर्वात जुने आहे (१९१७) (गंगाधर शास्त्री गुणे) तर कोल्हापूरातील मगदुम ट्रस्टचे महाविद्यालय २००५ मध्ये स्थापित झाले त्यानंतर कोणतेही नविन महाविद्यालयाची निर्मिती झाली नाही.

**तक्ता क्र. ५ पश्चिम महाराष्ट्रात कालखंडनिहाय स्थापन झालेली महाविद्यालयांची संख्या**

| अ.क्र. | कालखंड | पश्चिम महाराष्ट्रात स्थापन झालेल्या आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १९५० पूर्वीची महाविद्यालये | ०३ | १७.६५% |
| २. | १९५१ ते १९७० | ०१ | ५.८८% |
| ३. | १९७१ ते १९९० | ०४ | २३.५३% |
| ४. | १९९१ नंतर स्थापन झालेली महाविद्यालये | ०९ | ५२.९४% |
| | एकूण | १७ | १००% |

**वृत्तालेख क्र.३**



**विश्लेषण–**

स्वातंत्र्यपूर्व कालखंडात पश्चिम महाराष्ट्रात स्थापन झालेल्या महाविद्यालयांची संख्या ३ असून त्यांचे शेकडा प्रमाण १७.६५% इतके आहे. पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयांपैकी सर्वांत जास्त आयुर्वेद महाविद्यालये १९९१ नंतर स्थापन झालेली आहेत. त्यांची संख्या (०९) इतकी असून त्यांची टक्केवारी ५२.९४% इतकी आहे. सर्वात कमी महाविद्यालये १९५१ ते १९७० या कालखंडात स्थापन झालेली असून त्यांची संख्या (१) इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ५.८८% इतके आहे.

**निष्कर्ष** :

आयुर्वेद महाविद्यालयाची प्रगती ही समाधानकारक आहे ॲलोपॅथी व होमिओपॅथी यांच्या तुलनेत १९९१ नंतर २००५ पर्यंत प्रगतीचा वेग जास्त होता या काळात ९ नविन आयुर्वेद महाविद्यालये या क्षेत्रात स्थापित झाली १९५० ते १९७० पर्यंत फक्त ५ महाविद्यालये होती तर १९७० च्या नंतर १३ महाविद्यालये स्थापन झाली. (१७ प्रतिसादीत महाविद्यालयांपैकी)

**तक्ता क्र. ६ प्रवेशित विद्यार्थी संख्या**

| अ.क्र. | प्रवेशित विदयार्थी संख्या | महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २०० | ०२ | ११.७६% |
| २. | २०१ ते ४०० | १० | ५८.८३% |
| ३. | ४०१ ते ६०० | ०५ | २९.४१% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण –** सर्वाधिक महाविद्यालयात १० महाविद्यालयामध्ये २०१ ते ४०० इतकी प्रवेशित विदयार्थी संख्या आहे. या महाविद्यालयाचे शेकडा प्रमाण ५८.८३% इतके आहे. सर्वात कमी दोनच महाविद्यालयामध्ये प्रवेशित विदयार्थी संख्या ते २०० इतकी आहे. एकूणात या महाविद्यालयांची टक्केवारी ११.७६% आहे.

**निष्कर्ष** – १७ महाविद्यालयातून साधारणतः १ ते ६०० प्रवेशित विद्यार्थी संख्या १ ते ६०० विद्यार्थी संख्या असणारी महाविद्यालये आहेत तर २०१ ते ४०० विद्यार्थी संख्या असणारी सर्वाधिक १० महाविद्यालये असून त्यांचे शेकडा प्रमाण ५८.८३% इतके आहे. १ ते २०० विद्यार्थी संख्या असणारी दोन महाविद्यालये असून त्यांची टक्केवारी ११.७६% इतकी आहे.

**तक्ता क्र. ७** पश्चिम महाराष्ट्रातील अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांची संख्या

| अ.क्र. | जिल्ह्याचे नांव | अनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या | विनाअनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | अहमदनगर | ०१ | ०५ | ०६ |
| २. | कोल्हापूर | ०० | ०४ | ०४ |
| ३. | पुणे | ०२ | ०४ | ०६ |
| ४. | सांगली | ०१ | ०२ | ०३ |
| ५. | सातारा | ०१ | ०१ | ०२ |
| ६. | सोलापूर | ०१ | ०० | ०१ |
| | एकूण | (६) २७.२७% | (१६)७२.७३% | (२२)१००% |

## जोडस्तंभालेख क्र.२



## विभाजित स्तंभालेख क्र.२




**विश्लेषण**–पश्चिम महाराष्ट्रातील एकूण २२ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी ०६ आयुर्वेदीक महाविद्यालये अनुदानित असून त्यांचे शेकडा प्रमाण २७.२७% इतके आहे. तर विनाअनुदानित आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या १६ असून त्यांचे शेकडा प्रमाण ७२.७३% इतके आहे. पश्चिम महाराष्ट्रमध्ये एकही शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नाही.

पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर या जिल्ह्याशिवाय अन्य जिल्ह्यांमध्ये किमान १ तरी अनुदानित आयुर्वेद महाविद्यालय आहे. अनुदानित आयर्वुद महाविद्यालयाची जिल्हानिहाय सरासरी १ असून विनाअनुदानित महाविद्यालयाची जिल्हानिहाय सरासरी २.६७% इतकी आहे. एकूण आयुर्वेद महाविद्यालयातील जिल्हानिहाय सरासरी ३.६६% इतकी आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सोलापूर जिल्ह्यामध्ये एकही विनाअनुदानित आयुर्वेद महाविद्यालय नाही.

**निष्कर्ष** :–पश्चिम महाराष्ट्रातील २२ महाविद्यालयापैकी फक्त २७%(६) अनुदानित महाविद्यालय आहेत तर ७३% (१६) महाविद्यालये ही विना अनुदानित आहेत. पश्चिम महाराष्ट्रात एकही शासकीय आयुर्वेद महाविद्यालय नाही.

**तक्ता क्र. ८ पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयात राबविले जाणारे अभ्यासक्रम**

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | राबवणाऱ्या महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | बी.ए.एम.एस | १७ | १००% |
| २. | एम.एस | ०५ | २९.४१% |
| ३. | एम.डी | १० | ५८.८२% |
| ४. | एम.फिल | ०० | ००.००% |
| ५. | पी.एच.डी | ०२ | ११.७६% |
| ६. | इतर (D.H.O) | ०१ | ५.८८% |

**विश्लेषण–** पश्चिम महाराष्ट्रातील प्रतिसाद दिलेल्या १७ महाविद्यालयांपैकी सर्वच महाविद्यालयांमध्ये बी.ए.एम.एस. अभ्यासक्रम राबवला जातो त्याची टक्केवारी १००% इतकी आहे. एकाही महाविद्यालयामध्ये एम.फिल हा अभ्यासक्रम राबवला जात नसून त्याची टक्केवारी ००.००% इतकी आहे. ५०% हून अधिक महाविद्यालयामध्ये अर्थातच १० महाविद्यालयामध्ये एम.डी. अभ्यासक्रम राबवला जातो त्याचे शेकडा प्रमाण ५८.८२% इतके आहे. आयुर्वेदाबाबतचा इतर अभ्यासक्रम एकाच महाविद्यालयात राबवला जातो त्याचे शेकडा प्रमाण ५.८८% इतके आहे.

**निष्कर्ष** :–१७ आयुर्वेद महाविद्यालयापैकी सर्वच १००% महाविद्यालयात बी.ए.एम.एस. हा मुलभूत पदवी अभ्यासक्रम राबविला जातो. तर फक्त २९% (५) एम.एस. पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविला जातो. तर फक्त ११%(२) महाविद्यालयात पी.एचडी. अभ्यासक्रम राबविला जातो.

**तक्ता क्र. ९ : महाविद्यालय मान्यता**

| अ.क्र. | मान्यता देणारी संस्था/शासन विभाग/संचालनालय | महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एम.सी.आय.एम. | ०७ | ४१.१८% |
| २. | सी.सी.आय.एम | १७ | १००% |
| ३. | आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई | १३ | ७६.४७% |
| ४. | आयुष संचालनालय, भारत सरकार, नवी दिल्ली | ११ | ६४.७१% |
| ५. | इतर | ० | ००% |

**विश्लेषण**–पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेदीक महाविद्यालयांपैकी सर्वच (१७) महाविद्यालयांना सी.सी.आय. एम ची मान्यता असून त्यांची शेकडेवारी १००% इतकी आहे. सर्वात कमी महाविद्यालयांना (०७) एम.सी.आय्.एम. ची मान्यता असून त्यांची शेकडेवारी ४१.१८% इतकी आहे.

इतर कोणत्याही संस्थेची/शासन विभागाची/संचालनालयाची मान्यता एकाही आयुर्वेदीक महाविद्यालयास नाही.

**निष्कर्ष** :– सर्व महाविद्यालयास सी.सी.आय.एम. ची मान्यता आहे. तर ४१% (७) महाविद्यालयास एम.सी.आय.एम. ची मान्यता आहे आणि ७६% (१३) आयुर्वेद महाविद्यालयांना आयुष संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांची मान्यता आहे.

**तक्ता क्र. १० : महाविद्यालयांचे विद्यापीठ संलग्नीकरण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | संलग्नीकरण | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक | १७ | १०० % |
| २. | सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे / सोलापूर विद्यापीठ, सोलापूर / इतर | ०० | ००% |

**विश्लेषण :** एकूण प्रतिसादक १७ महाविद्यालयांपैकी १७ म्हणजे १००% महाविद्यालये ही महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ, नाशिक शी संलग्नीत आहेत. इतर कोणत्याही विद्यापीठाशी एकही महाविद्यालय संलग्नीत नाही.

**निष्कर्ष** : सर्व १७ आयुर्वेद महाविद्यालय ही महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक शी संलग्नीत आहेत.

**तक्ता क्र. ११: महाविद्यालय प्रमाणन स्थितीविषयीचा तक्ता**

| अ.क्र. | प्रमाणन स्थिती | महाविद्यालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | प्रमाणन पूर्ण | ०२ | ११.७६% |
| २. | प्रमाणन प्रक्रिया सुरू असलेली | ०२ | ११.७६% |
| ३. | प्रमाणन झाले नाही | १३ | ७६.४८% |
| | एकूण | १७ | १००% |

**वृत्तालेख क्र.४**




**विश्लेषण–** पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालयांचे प्रमाणन झालेले नसून त्यांची संख्या (१३) इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ७६.४८% इतके आहे.

प्रमाणन पूर्ण झालेल्या व प्रमाणन प्रक्रिया सुरू असलेल्या महाविद्यालयांची संख्या समान आहे. ती प्रत्येकी (२) इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रत्येकी प्रमाण ११.७६% इतके आहे. प्रमाणन झालेल्या दोन महाविद्यालयांपैकी एका महाविद्यालयाचे प्रमाणन नॅक व्दारे व एका महाविद्यालयाचे आयएसओ व्दारे प्रमाणन झालेले आहे.

**निष्कर्ष**– महाविद्यालय प्रमाणनस्थितीत फक्त २४% (४) महाविद्यालयांनी भाग घेतलेला आहे. तर ७६% (१३) महाविद्यालयाचे प्रमाणन झालेले नाही.

**तक्ता क्र. १२ : ग्रंथालयाची क्षेत्रफळे**

| अ.क्र. | ग्रंथालयाचे क्षेत्रफळ (स्वे.फू.) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २००० | ०५ | २९.४१% |
| २. | २००१ ते ४००० | ०७ | ४१.१८% |
| ३. | ४००१ ते ६००० | ०५ | २९.४१% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण–** पश्चिम महाराष्ट्रामधील आयुर्वेद महाविद्यालयातील २००१ ते ४००० या दरम्यान असून त्या ग्रंथालयांची संख्या (०७) इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ४१.१८% आहे. १ ते २००० स्वे.फू. व ४००१ ते ६००० स्वे.फू या दोनही क्षेत्रफळांच्या दरम्यान असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या समान असून ती प्रत्येकी (०५) इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण २९.४१% इतके आहे.

**निष्कर्ष–** सर्वाधिक महाविद्यालयाची क्षेत्रफळे २००१ ते ४००० स्क्वेअर फूट इतकी आहेत. तर १ ते २००० व ४००१ ते ६००० क्षेत्रफळ असणारी प्रत्येकी ५ महाविद्यालयाची ग्रंथालये आहेत.

**तक्ता क्र. १३ ग्रंथालयाचे कामाचे तास**

| अ.क्र. | ग्रंथालयाचे कामाचे तास | महाविद्यालय ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ७ ते ८ | ०९ | ५२.९४% |
| २. | ९ ते १० | ०३ | १७.६५% |
| ३. | ११ ते १२ | ०५ | २९.४१% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयामधील सर्वाधिक ९ ग्रंथालयांचे कामाचे तास ७ ते ८ तास आहेत. अशा महाविद्यालयीन ग्रंथालयांची शेकडेवारी ५२.९४% आहे. सर्वात कमी ०३ ग्रंथालयाचे कामाचे तास ९ ते १० इतके असून अशा महाविद्यालयीन ग्रंथालयांची शेकडेवारी १७.६५% इतकी आहे.

**निष्कर्ष**– ५२%(९) आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये ७ ते ८ तास कार्यवंतीत असतात तर ४८%(८) आयुर्वेद महाविद्यालयांची ग्रंथालये ९ ते १२ तास कार्यवंतीत असतात व वाचकांना ग्रंथालय सेवा देतात. ७ ते ८ तास ग्रंथालयाचे कामाचे तास असणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या निम्म्याहून अधिक आहे.

**तक्ता क्र. १४: वाचनकक्षाची वेळ**

| अ.क्र. | वाचनकक्षाची वेळ | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ७ ते १० | ०८ | ४७.०६% |
| २. | ११ ते १४ | ०४ | २३.५३% |
| ३. | १५ ते १८ | ०२ | ११.७६% |
| ४. | १८ तासांपेक्षा अधिक | ०३ | १७.६५% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – सर्वाधिक ग्रंथालयाची (एकूण ८) वाचनकक्षाची वेळ ७ ते १० तास इतकी असून त्या ग्रंथालयांचे शेकडा प्रमाण ४७.०६% इतके आहे. सर्वात कमी २ महाविद्यालयीन ग्रंथालयांची वेळ १५ ते १८ तास इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** – सर्वच आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयात वाचन कक्ष सुविधा आहेत. सर्वसाधारण ५०% महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ११ तासांपेक्षा अधिक तास वाचन कक्ष वाचकांसाठी उपलब्ध असतो.

**तक्ता क्र. १५: विदयार्थी वाचनकक्षाची आसनक्षमता**

| अ.क्र. | वाचनकक्षाची आसन क्षमता (विदयार्थी) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १० ते ४९ | १ | ०५.८८% |
| २. | ५० ते ९० पेक्षा कमी | ०५ | २९.४१% |
| २. | ९० ते १२९ | ०८ | ४७.०६% |
| ३. | १३० ते १६९ | ०२ | ११.७७% |
| ४. | १७० पेक्षा अधिक | ०१ | ०५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–सर्वाधिक ८ ग्रंथालयांची वाचनकक्षाची आसनक्षमता ९० ते १२९ इतकी असून त्या ग्रंथालयांची शेकडेवारी ४७.०६% इतकी आहे. सर्वात कमी प्रत्येकी १ ग्रंथालयाची वाचनकक्षाची आसनकक्षात (१० ते ४९) व (१७० पेक्षा अधिक) या गटातील विदयार्थ्यांची आहे.

**निष्कर्ष**– ८ महाविद्यालयाचे ग्रंथालयांची आसन क्षमता ९० ते १२९ इतकी असून ती सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. १६: शिक्षक वाचनकक्षाची क्षमता**

| अ.क्र. | वाचनकक्षाची आसन क्षमता (शिक्षक) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते १९ | ०६ | ३५.२९% |
| २. | २० ते ३९ | ०८ | ४७.०६% |
| ३. | ४० ते५९ | ०३ | १७.६५% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–२० ते ३९ इतकी शिक्षकांसाठीची आसनक्षमता असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक ०८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४७.०६% इतके आहे. सर्वात कमी शिक्षकांसाठीची आसनक्षमता असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या ०३ असून त्यांची क्षमता (४० ते ५९ शिक्षक वाचकांची आहे.) अशा ग्रंथालयांची शेकडेवारी १७.६५% इतकी आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक आठ महाविद्यालयाचे ग्रंथालयातील वाचन कक्षामध्ये २० ते ३९ इतकी शिक्षक आसन क्षमता आहे.

**तक्ता क्र. १७ : ग्रंथालय सभासद संख्या**

| अ.क्र. | ग्रंथालय सभासद संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २९९ | ०३ | १७.६५% |
| २. | ३०० ते ५९९ | १० | ५८.८२% |
| ३. | ६०० ते ८९९ | ०३ | १७.६५% |
| ४. | ९०० पेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–सर्वाधिक ग्रंथालयाची सभासद ३०० ते ५९९ इतकी आहे. अशा ग्रंथालयाची संख्या १० इतकी आहे त्यांचे शेकडा प्रमाण ५८.८२% इतके आहे.

**निष्कर्ष** – ५८% (१०) महाविद्यालयाचे ग्रंथालयात सभासद संख्या ६०० पर्यंत आहे.

**तक्ता क्र. १८: शिक्षक सभासद संख्या**

| अ.क्र. | शिक्षक सभासद संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ३० | ०३ | १७.६५% |
| २. | ३१ ते ६० | ०६ | ३५.२९% |
| ३. | ६१ ते ९० | ०७ | ४१.१८% |
| ४. | ९१ पेक्षा अधिक | ०१ | ०५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – सर्वाधिक (०७) ग्रंथालयांची शिक्षक सभासद संख्या ६१ ते ९० आहे. त्या ग्रंथालयाची शेकडेवारी ४१.१८% आहे. सर्वात कमी फक्त (०१) ग्रंथालयाची शिक्षकसभासद संख्या ९१ पेक्षा अधिक आहे व त्याची शेकडेवारी ०५.८८% इतकी आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक ७ महाविद्यालयाचे ग्रंथालयांची शिक्षक सभासद संख्या ६१ ते ९० इतकी असून ती सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. १९: शिक्षकेतर कर्मचारी सभासद संख्या**

| **अ.क्र.** | **शिक्षकेतर कर्मचारी सभासद संख्या** | **ग्रंथालयांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | १ ते ३० | १० | ५८.८२% |
| २. | ३१ ते ६० | ०४ | २३.५३% |
| ३. | ६१ ते ९० | ०२ | ११.७७% |
| ४. | ९१ पेक्षा अधिक | ०१ | ०५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – सर्वाधिक (१०) ग्रंथालयांची शिक्षकेतर कर्मचारी सभासद संख्या १ ते ३० आहे. त्या ग्रंथालयांची शेकडेवारी ५८.८२% आहे. सर्वात कमी शिक्षकेतर कर्मचारी सभासद संख्या ९१ पेक्षा अधिक आहे. त्याचे शेकडा प्रमाण ०५.८८% आहे.

**निष्कर्ष** : प्रतिसादित १७ महाविद्यालयाचे ग्रंथालयापैकी १० महाविद्यालयाचे शिक्षकेतर कर्मचारी ग्रंथालय सभासद संख्या १ ते ३० इतकी आहे.

**तक्ता क्र. २०: ग्रंथालयाचा दैनदिंन सरासरी वापर करणाऱ्या वाचकांची संख्या**

| **अ.क्र.** | **ग्रंथालयाचा दैनदिंन सरासरी वापर करणाऱ्या वाचकांची संख्या** | **ग्रंथालयांची संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५० | ०७ | ४१.१८% |
| २. | ५१ ते १०० | ०८ | ४७.०६% |
| ३. | १०१ ते १५० | ०० | ००.००% |
| ४. | १५१ ते २०० | ०१ | ५.८८% |
| ५. | २०१ पेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – सर्वाधिक ०८ ग्रंथालयांचा दैनंदिन सरासरी वापर करणाऱ्या वाचकांची संख्या (५१ ते १००) आहे. शेकडा प्रमाण ४७.०६% आहे. सर्वात कमी प्रत्येकी ०१ ग्रंथालयाचेच वाचक (१५१ ते २००) व (२०१ पेक्षा अधिक) सरासरी ग्रंथालयांचा दैनंदिन वापर करतात, अशा ग्रंथालयाची शेकडेवारी प्रत्येकी ५.८८% आहे.

**निष्कर्ष** : आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयांचा सरासरी दैनंदिन १ ते १०० वाचक वापर करतात. ही परिस्थिती खूप चांगली आहे. ग्रंथालयाचा वापर करण्याचे प्रयोजन अत्याधिक माहिती मिळविणे हे दृष्टीगोचर आहे.

**तक्ता क्र. २१: दैनंदिन सरासरी पुस्तकांची देवघेव**

| अ.क्र. | दैनंदिन सरासरी पुस्तकांची देवघेव | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५० | ०७ | ४१.१८% |
| २. | ५१ ते १०० | ०५ | २९.४१% |
| ३. | १०१ ते १५० | ०५ | २९.४१% |
| ४. | १५१ पेक्षा अधिक | ०० | ००.००% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–सर्वाधिक ०७ ग्रंथालयांची दैनंदिन सरासरी देवघेव १ ते ५० इतकी होती. त्या ग्रंथालयाचे शेकडा प्रमाण ४१.१८% इतके आहे. ५१ ते १०० आणि १०१ ते १५० सरासरी पुस्तकांची दैनंदिन देवघेव होणाऱ्या ग्रंथालयांची संख्या प्रत्येकी ५ आहे. अशा ग्रंथालयाची शेकडेवारी प्रत्येकी २९.४१% इतकी आहे.

**निष्कर्ष** : ग्रंथालयातील देवघेव सेवेत असे आढळून आले की, साधारणतः ४१% (७) महाविद्यालयाचे ग्रंथालयात १ ते ५० पर्यंत पुस्तकांची देवघेव होते साधारण ५८% (१०) महाविद्यालयाचे ग्रंथालयात ५१ ते १५० पर्यंत पुस्तकांची देवघेव होते. फक्त क्रमिक पुस्तकांची देवघेव होते सर्वसाधारण वाचक हे संदर्भपुस्तके विविध लेख वर्तमानपत्रे यांच्या वापरासाठी ग्रंथालयात येतात.

**तक्ता क्र. २२ : ग्रंथालयीन कर्मचारी संख्या**

| अ.क्र. | ग्रंथालयीन कर्मचारी संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २ | ०४ | २३.५३% |
| २. | ३ ते ४ | १२ | ७०.५९% |
| ३. | ४ ते ५ | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – सर्वाधिक १२ महाविद्यालयांचे ग्रंथालयातील कर्मचारी संख्या ३ ते ४ इतकी आहे. अशा ग्रंथालयांची शेकडेवारी ७०.५९% आहे. ४ ते ५ कर्मचारी असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या सर्वात कमी आहे ती १ आहे. अशा ग्रंथालयाचे शेकडा प्रमाण ५.८८% आहे.

**निष्कर्ष** : ७०% महाविद्यालयाचे ग्रंथालयात फक्त ३ ते ४ कर्मचारी आहेत यात ग्रंथपाल, सहाय्यक ग्रंथपाल, लिपिक, व ग्रंथालय परिचर अशी पदे आहेत. २३% महाविद्यालयाचे ग्रंथालयात तर १ ते २ पदेच आहेत. त्यात ग्रंथपाल व ग्रंथालय परिचर ही पदे आहेत. ग्रंथपालच सर्व ग्रंथालयीन कामकाज करतात ५% ग्रंथालयात ४ ते ५ कर्मचारी काम करतात. कर्मचारी वर्ग कमी असले कारणाने ग्रंथपाल वाचकांना अधिक प्रभावीपणे सेवा देऊ शकत नाहीत.

**तक्ता क्र. २३ : ग्रंथपालांची शैक्षणिक पात्रता**

| अ.क्र. | ग्रंथपाल शैक्षणिक पात्रता | ग्रंथपालांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एम.लिब | १३ | ८१.२५% |
| २. | एम.फिल | ०२ | १२.५०% |
| ३. | सेट आणि नेट (ग्रंथालय आणि माहितीशास्त्र) | ०१ | ६.२५% |
| | एकूण | १६ | १००% |

**वृत्तालेख क्र.५**




**विश्लेषण**– एका महाविद्यालयातील ग्रंथपाल पद रिक्त आहे. १६ ग्रंथपालांपैकी सर्वाधिक १३ ग्रंथपाल एम.लिब (ग्रंथालय आणि माहितीशास्त्रातील पदव्युत्तर पदवी प्राप्त आहेत) त्यांची शेकडेवारी ८१.२५% आहे. एका महाविद्यालयाचे ग्रंथपाल एम.लिब ॲपियर आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ६.२५% इतके आहे. एका महाविद्यालयाचे ग्रंथपाल सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ६.२५% इतके आहे.

**निष्कर्ष**–१६ महाविद्यालयाचे ग्रंथालयातील सर्वच ग्रंथपाल प्रशिक्षित असून ८१%(१३) ग्रंथपाल ग्रंथालय आणि माहिती शास्त्रातील पदव्यूत्तर पदवीप्राप्त आहेत तर १९%(३) ग्रंथपाल हे एम.फिल व सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण आहेत.

**तक्ता क्र. २४: ग्रंथपालांचा अनुभव**

| अ.क्र. | ग्रंथपाल अनुभव वर्षे | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५ | ०४ | २५.००% |
| २. | ६ ते १० | ०६ | ३७.५०% |
| ३. | ११ ते १५ | ०३ | १८.७५% |
| ४. | १६ ते २० | ०१ | ६.२५% |
| ५. | २० पेक्षा अधिक | ०२ | १२.५०% |
|  | एकूण | १६ | १००% |

**विश्लेषण**–६ ते१० वर्षांचा अनुभव असणारे ग्रंथपाल सर्वाधिक असून ते सहा ग्रंथालयामध्ये कार्यरत आहेत. अशा ग्रंथपालांचे शेकडा प्रमाण ३७.५०% इतके आहे. एका महाविद्यालयाच्या ग्रंथपालांचा अनुभव (१६ ते २०) वर्षांच्या दरम्यान आहे. अशा महाविद्यालयाचे शेकडा प्रमाण ६.२५% आहे. एका महाविद्यालयमधील ग्रंथपाल हे पद रिक्त आहे.

**निष्कर्ष** –५६% (९) ग्रंथपालांना ६ ते १५ वर्षांचा ग्रंथालय क्षेत्रातील अनुभव आहे. तर १८% ग्रंथपालांना १६ वर्षापेक्षा अधिक अनुभव आहे. ७४% ग्रंथपाल प्रशिक्षित तसेच अनुभवी आहेत. परंतु २५% ग्रंथपाल हे १ ते ५ वर्षाचा अनुभव असलेले आहेत.

**तक्ता क्र. २५: सहाय्यक ग्रंथपालाची शैक्षणिक पात्रता**

| अ.क्र. | सहाय्यक ग्रंथपालाची शैक्षणिक पात्रता | सहाय्यक ग्रंथपालाची शैक्षणिक संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | एल.टी.सी | ०३ | २३.०८% |
| २. | बी.लिब | ०४ | ३०.७७% |
| ३. | एम.लिब | ०३ | २३.०८% |
| ४. | सेट/नेट उत्तीर्ण | ०२ | १५.३८% |
| ५. | इतर | ०१ | ७.६९% |
| | एकूण | १३ | १००% |

**वृत्तालेख क्र. ६**



**विश्लेषण**–एकूण १७ आयुर्वेद महाविद्यालयांपैकी ०४ महाविद्यालयामध्ये सहाय्यक ग्रंथपाल नाहीत. उर्वरीत १३ महाविद्यालयांपैकी सर्वाधिक ०४ सहाय्यक ग्रंथपाल हे बी.लिब. (ग्रंथालय आणि माहितीशास्त्रामधील पदवीधर) आहेत. त्यांचे शेकडा प्रमाण ३०.७७% इतके आहे. एम.लिब आणि एल.टी.सी शैक्षणिक पात्रता असणाऱ्या ग्रंथपालांची संख्या प्रत्येकी ३ असून त्यांचे प्रत्येकी शेकडा प्रमाण २३.०८% इतके आहे. दोन सहायक ग्रंथपाल हे सेट/नेट परीक्षा उत्तीर्ण असून त्यांचे शेकडा प्रमाण १५.३८% इतके आहे. इतर शैक्षणिक पात्रता असणारे एक ग्रंथपाल कार्यरत असून त्यांची टक्केवारी ७.६९% इतकी आहे.

**निष्कर्ष** –एकूण १३ सहाय्यक ग्रंथपालांपैकी ५३%(७) सहाय्यक ग्रंथपालांची शैक्षणिक पात्रता ही ग्रंथालय व माहिती शास्त्रातील पदव्युत्तर पदवी अशी आहे. ग्रंथालय शास्त्रातील नेट /सेट उत्तीर्ण असणाऱ्या ग्रंथपालांची टक्केवारी १५%(२) आहे. ४ महाविद्यालयाचे ग्रंथालयात सहाय्यक ग्रंथपाल कार्यरत नाहीत.

**तक्ता क्र. २६ःसहाय्यक ग्रंथपालाचा अनुभव**

| अ.क्र. | सहाय्यक ग्रंथपालाचा अनुभव (वर्षे) | सहाय्यक ग्रंथपालाची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५ | ०७ | ५३.८५% |
| २. | ६ ते १० | ०४ | ३०.७७% |
| ३. | ११ ते १५ | ०० | ००.००% |
| ४. | १६ ते २० | ०० | ००.००% |
| ५. | २१ वर्षापेक्षा अधिक | ०२ | १५.३८% |
| | एकूण | १३ | १००% |

**विश्लेषण**–एकूण१३ महाविदयालयाच्या ग्रंथालयांमधील सहाय्यक ग्रंथपालापैकी सर्वांत जास्त अनुभव असणाऱ्या सहाय्यक ग्रंथपालांची संख्या ७ असून त्यांचे शेकडा प्रमाण ५३.८५% आहे व त्यांना १ ते ५ वर्षांचा अनुभव आहे. तर २१ वर्षांपेक्षा जास्त अनुभव असणाऱ्या ग्रंथपालांची संख्या २ असून त्यांचे शेकडा प्रमाण १५.३८% इतके आहे. ११ ते २० वर्षे अनुभव असणाऱ्या ग्रंथपालांची संख्या शून्य इतकी असून त्याचे शेकडा

प्रमाण ०.००% इतके आहे. एकूण १७ प्रतिसादकांपैकी एकूण १३ प्रतिसादकांनी या प्रश्नाचे उत्तर दिले असून ४ ग्रंथपालांनी आपला प्रतिसाद नोंदविलेला नाही.

**निष्कर्ष** –एकूण १३ सहाय्यक ग्रंथपालांपैकी सर्वाधिक ५३%(७) सहाय्यक ग्रंथपालांना ग्रंथालयीन कामाचा १ ते ५ वर्षांचा अनुभव आहे. २१ वर्षांपेक्षा अधिक अनुभव असणाऱ्या सहाय्यक ग्रंथपालांची टक्केवारी १५% (२) इतकी आहे.

**तक्ता क्र. २७ः ग्रंथालय सेवा**

| अ.क्र. | ग्रंथालयीन सेवा | सेवा पुरविणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या | महाविद्यालयाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ग्रंथदेवघेव | १७ | १००% |
| २. | संदर्भसेवा | १७ | १००% |
| ३. | भाषांतर सेवा | १० | ५८.८२% |
| ४. | प्रचलित जागरूकता सेवा | १५ | ८८.२४% |
| ५. | प्रतिलिपी सेवा | १२ | ७०.५९% |
| ६. | निवडक माहितीचे प्रसारण सेवा | १० | ५८.८२% |
| ७. | कात्रणसेवा | १६ | ९४.११% |
| ८. | आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा | ०८ | ४०.०६% |
| ९. | वाचनकक्ष | १७ | १००% |
| १०. | पुस्तकपेढी योजना | १७ | १००% |
| ११. | सारसेवा | ०५ | २९.४१% |
| १२. | सुचीसेवा | ०९ | ५२.९४% |
| १३. | रेफरल सेवा | १२ | ७०.५९% |
| १४. | सल्लामसलत सेवा | १२ | ७०.५९% |
| १५. | इतर सेवा | ०४ | २३.५३% |

**साधा स्तंभालेख क्र. १**




**विश्लेषण** – प्रतिसादित एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयापैकी १५ सेवा पुरविणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ४ असून त्यांची शेकडेवारी १०० इतकी आहे. त्याखालोखाल कात्रण सेवा पुरविणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या १६ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ९४.११ टक्के इतके आहे. सर्वात कमी सेवा (इतर सेवा) पुरविणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ४ असून त्यांचे शेकडा प्रमाण २३.५३ इतके आहे. प्रमुख १५ सेवांपैकी ग्रंथ देवघेव, संदर्भसेवा, वाचन कक्ष सेवा, पुस्तकपेढी सेवा या सेवा सर्वच महाविद्यालयात म्हणजेच १००% (१७) महाविद्यालयात दिल्या जातात. त्या खालोखाल कात्रणसेवा ९४% (६) ग्रंथालये देतात. तर प्रचलित जागरुकता सेवा, प्रतिलीपी सेवा, रेफरल सेवा, सल्लामसलत सेवा या सेवा ७०% ग्रंथालयातून दिल्या जातात. भाषांतर सेवा, निवडक माहितीचे प्रसारण सेवा या सेवा ५८% (१०) महाविद्यालयाचे ग्रंथालयातून दिल्या जातात.

**निष्कर्ष**–पारंपरिक दिल्या जाणाऱ्या सेवांची आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयातील स्थिती चांगली आहे. आंतरग्रंथालयीन देवघेव सेवा, सारसेवा व इतर सेवा देणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या निम्म्याहून कमी आहे.

**तक्ता क्र. २८:आधुनिकीकरणावर आधारित ग्रंथालय सेवा**

| अ.क्र. | ग्रंथालयीन सेवा | सेवा पुरविणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या | महाविद्यालयाची टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ई–मेल सेवा | १६ | ९४.१२ % |
| २. | एस.एम.एस. सेवा | ११ | ६४.७१% |
| ३. | ई–दस्तऐवज पुरवठा सेवा | ११ | ६४.७१% |
| ४. | इन्फ्लिबनेटचा डेटाबेस पुरवठा सेवा | ०१ | ५.८८% |
| ५. | राष्ट्रीय डेटाबेस पुरवठा सेवा | ०४ | २३. ५३% |
| ६. | महत्त्वाच्या संकेतस्थळांची यादी पुरविणे | १३ | ७६.४७% |
| ७. | प्रचलित माहितीचा संग्रह | १३ | ७६.४७% |
| ८. | लक्षवेध निर्माण | ०५ | २९.४१% |
| ९. | वापरकर्त्यांना माहितीशोध सेवा | १४ | ८२.३५% |
| १०. | कन्सोर्शिया | ०१ | ५.८८% |
| ११. | ओपॅक | ०९ | ५२.९४% |
| १२. | ऑनलाईन शोधसेवा | १४ | ८२.३५% |
| १३. | सी.डी.रोम सेवा | १५ | ८८.२४% |
| १४. | इतर सेवा | ०७ | ४१.१८% |

**साधा स्तंभालेख क्र. २**

**आधुनिकीकरणावर आधारित ग्रंथालय सेवा**




**विश्लेषण**–प्रतिसादित एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयापैकी ई–मेल सेवा पुरविणाऱ्या महाविदयालयांचे ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे. ती १६ असून त्यांची शेकडावारी ९४.१२ इतकी आहे. त्याखालोखाल सी.डी.रोम सेवा पुरविणाऱ्या महाविद्यालयांची संख्या १५ असून त्यांचे शेकडा प्रमाण ८८.२४ इतके आहे. वापरकर्त्यांना माहितीशोध सेवा व ऑनलाईन शोध सेवा देणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या प्रत्येकी १४ असून त्यांची शेकडेवारी ८२.३५ इतकी आहे. इनफ्लिबनेटचा डेटाबेस पुरविणाऱ्या अणि कन्सोर्शिया सेवा पुरविणाऱ्या ग्रंथालयांची संख्या सर्वात कमी १ असून त्यांचे शेकडा प्रमाण ५.८८ टक्के इतके आहे.

**निष्कर्ष :** ६४% ते ९४% आधुनिकीकरणावर आधारित सेवा देणारी महाविद्यालयीन ग्रंथालये आहेत. त्या आधुनिक सेवांतर्गत १) ई–मेल व एसएमएस आधारित सेवा, २) इन्फ्लीबनेट माहिती संचावर आधारित सेवा ३) इंटरनेट आधारित सेवा, ४) ऑनलाईन व ऑफ लाईन माहिती शोध सेवा या सेवा दिल्या जातात. कन्सोंशिया

व ई डेटा बेसेस या सेवा देणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वात कमी आहे.

**तक्ता क्र. २९: दैंनदिन सरासरी वाचकांची संख्या**

| अ.क्र. | दैंनदिन सरासरी वाचकांची संख्या | ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५० | ०७ | ४१.१८% |
| २. | ५१ ते १०० | ०८ | ४७.०६% |
| ३. | १०१ ते १५० | ०० | ००.००% |
| ४. | १५१ ते २०० | ०१ | ५.८८% |
| ५. | २०० वर्षापेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयामध्ये सर्वात जास्त महाविद्यालयाचे ८ ग्रंथालयात दैनंदिन सरासरी ५१ ते १०० वाचक येतात. त्यांची टक्केवारी ४१.१८% इतकी आहे. सर्वात कमी महाविद्यालयाचे ग्रंथालयात म्हणजे फक्त एकाच महाविद्यालयाचे ग्रंथालयात १५१ ते २०० वाचक येतात, अशा महाविद्यालयाचे ग्रंथालयाची टक्केवारी प्रत्येकी ५.८८% आहे.

**निष्कर्ष** : दैनंदिन सरासरी १ ते १०० वाचक येणाऱ्या ग्रंथालयांची टक्केवारी ८८% असून अशा महाविद्यालयाचे ग्रंथालयांची संख्या १५ इतकी असून ती सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. ३०:दैनंदिन देवघेव होणारी ग्रंथ संख्या**

| अ.क्र. | दैंनदिन देवघेव होणारी ग्रंथ संख्या | ग्रंथालय संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २५ | ०२ | ११.७६% |
| २. | २६ ते ५० | ०५ | २९.४२% |
| ३. | ५१ ते ७५ | ०२ | ११.७६% |
| ४. | ७६ ते १०० | ०३ | १७.६५% |
| ५. | १०० ते १२५ | ०२ | ११.७६% |
| ६. | १२५ पेक्षा अधिक | ०३ | १७.६५% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**– प्रतिसाद दिलेल्या १७ महाविद्यालयाचे ग्रंथालयामधील सर्वात जास्त ५ महाविद्यालय ग्रंथालयातून दैनंदिन देवघेव होणारी ग्रंथसंख्या सरासरी २६ ते ५० इतकी आहे. या पाच महाविद्यालयांची टक्केवारी २९.४२% इतकी आहे. सर्वात कमी देवघेव एकूण दोन महाविद्यालयांचे ग्रंथालयामध्ये होते ती सरासरी ग्रंथ देवघेव १ ते २५ इतकी होते. अशा महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : सरासरी २६ ते ५० इतकी दैनंदिन ग्रंथ देवघेव होणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ५ असून त्यांची शेकडेवारी २९.४२% इतकी आहे. सरासरी ७६ पेक्षा अधिक ग्रंथ देवघेव असणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयांची संख्या ८ इतकी असून त्यांची शेकडेवारी ४७.०६% इतकी आहे.

**तक्ता क्र. ३१:पुस्तकांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी)**

| अ.क्र. | पुस्तकांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी) रू. | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते १,००,००० | ०६ | ४२.८६% |
| २. | १,००,००१ ते २,००,००० | ०३ | २१.४३% |
| ३. | २,००,००१ ते ३,००,००० | ०३ | २१.४३% |
| ४. | ३,००,००१ ते ४,००,००० | ०१ | ०७.१४% |
| ५. | ४,००,००१ पेक्षा अधिक | ०१ | ०७.१४% |
| | एकूण | १४ | १००% |

**विश्लेषण**– सरासरी रु. ३,००,००० पर्यंत पुस्तकखरेदीसाठी तरतूद करणाऱ्या आयुर्वेद महा. ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे. त्यांची संख्या (१२) इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ८५.७२% इतके आहे. सरासरी ३,००,००१ पेक्षा अधिक रू पुस्तकखरेदीसाठी तरतूद करणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या २ इतकी आहे. व त्यांचे शेकडा प्रमाण १४.२८% इतके आहे.एकूण १७ महाविद्यालयाचे ग्रंथालयापैकी सदरच्या प्रश्नाचे उत्तर फक्त १४ प्रतिसादकाने दिले आहे.

**निष्कर्ष** : सर्वच आयुर्वेद महाविद्यालयातून पुस्तकासाठी केली जाणारी सरासरी आर्थिक तरतूद खूपच मर्यादित आहे. त्यामुळे ग्रंथसंग्रह विकास योग्य प्रमाणात होत नाही.

**तक्ता क्र. ३२:नियतकालीकांसाठीची आर्थिक तरतूद**

| अ.क्र. | नियतकालीकांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी) रू. | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २५,००० | ०६ | ४२.८६% |
| २. | २५,००१ ते ५०,००० | ०३ | २१.४३% |
| ३. | ५०,००१ ते ७५,००० | ०२ | १४.२८% |
| ४. | ७५,००१ ते १,००,००० | ०० | ००.००% |
| ५. | १,००,००१ पेक्षा अधिक | ०३ | २१.४३% |
| | एकूण | १४ | १००% |

**विश्लेषण** – नियतकालिकांसाठीची १ ते ७५,००० रू तरतूद करणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ७८.५७% इतके आहे. नियतकालिकांच्या खरेदीसाठी १,००,००१ पेक्षा अधिक तरतूद करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या ३ असून त्यांचे शेकडा प्रमाण २१.४३% इतके आहे. सदरच्या प्रश्नाकरीता फक्त ३ ग्रंथपालांनी प्रतिसाद नोंदविलेला नाही.

**निष्कर्ष** : नियतकालिकांसाठी सरासरी १ ते ७५,००० रू. इतकी अल्प तरतूद करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. ३३: ई–माध्यमांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी)**

| अ.क्र. | ई–माध्यमांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी) रू. | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५,००० | ०१ | २५.००% |
| २. | ५,००१ ते १०,००० | ०० | ००.००% |
| ३. | १०,००१ ते १५,००० | ०० | ००.००% |
| ४. | १५,००१ ते २०,००० | ०१ | २५.००% |
| ५. | २०,००१ पेक्षा अधिक | ०२ | ५०.००% |
| | एकूण | ०४ | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयाचे ग्रंथालयापैकी फक्त ४ प्रतिसादकांनी सदरील प्रश्नासाठी त्यांचा प्रतिसाद नोंदवला असल्याने त्याचे विश्लेषण केलेले नाही. परंतु इ माध्यमासाठी अद्याप कोणत्याही महाविद्यालयाने फारशी तरतुद केलेली नाही.
**निष्कर्ष :** ई–माध्यमांसाठीची आर्थिक सरासरी तरतूद खूपच कमी आहे.

**तक्ता क्र. ३४ःई–नियतकालिकांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी)**

| अ.क्र. | ई–नियतकालिकांसाठीची आर्थिक तरतूद (सरासरी) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते ५,००० | ०१ | १६.६७% |
| २. | ५,००१ ते १०,००० | ०० | ००.००% |
| ३. | १०,००१ ते १५,००० | ०२ | ३३.३३% |
| ४. | १५,००१ ते २०,००० | ०१ | १६.६७% |
| ५. | २०,००१ पेक्षा अधिक | ०२ | ३३.३३% |
| | एकूण | ०४ | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयाचे ग्रंथालयापैकी फक्त ४ प्रतिसादकांनी सदरील प्रश्नासाठी त्यांचा प्रतिसाद नोदंवला असल्याने त्याचे विश्लेषण केलेले नाही.परंतु ई–नियतकालिकांसाठीची तरतुद खुपच कमी आहे.
**निष्कर्ष :** ई–नियतकालिकांसाठीची आर्थिक सरासरी तरतुद खूपच कमी आहे.

**तक्ता क्र. ३५ःग्रंथालयाचे नाव**

| बाब | महाविद्यालयाचे नाव तेच ग्रंथालयाचे नाव असलेली महाविद्यालये | महाविद्यालयाचे नाव तेच ग्रंथालयाचे नाव नसलेली महाविद्यालये | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १४ | ०३ | १७ |
| टक्केवारी | ८२.३५% | १७.६५% | १००% |

**विश्लेषण** – महाविद्यालयाचेच नाव ग्रंथालयास असलेल्या महाविद्यालयांची संख्या १४ असून त्याचे शेकडा प्रमाण ८२.३५% इतके आहे. तर महाविद्यालयापेक्षा ग्रंथालयास

वेगळे नाव असलेल्या महाविद्यालयांची संख्या ०३ आहे व त्याचे शेकडा प्रमाण १७.६५% इतके आहे.

**निष्कर्ष :** महाविद्यालयाचे नाव तेच ग्रंथालयाचे नाव असणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. ३६ : ग्रंथालय समिती स्थिती**

| बाब | ग्रंथालय समिती आहे | ग्रंथालय समिती नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १६ | ०१ | १७ |
| टक्केवारी | ९४.११% | ५.८९% | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी १६ महाविद्यालयांचे ग्रंथालयास ग्रंथालय समिती आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ९४.११% इतके आहे. तर एक महाविद्यालयाचे ग्रंथालयास ग्रंथालय समिती नाही त्यांचे शेकडा प्रमाण ५.२९% एवढे आहे.

**निष्कर्ष :** ९४% महाविद्यालयाचे ग्रंथालयास सल्लागार समिती आहे. ही खूप चांगली बाब आहे.

**तक्ता क्र. ३७: ग्रंथालय समिती सदस्य संख्या**

| अ.क्र. | ग्रंथालय समिती सदस्य संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ५ | ०१ | ६.६७% |
| २. | ७ | ०९ | ६०.००% |
| ३. | ८ | ०२ | १३.३३% |
| ४. | ९ | ०२ | १३.३३% |
| ५. | १७ | ०१ | ६.६७% |
| | एकूण | १५ | १००% |

**विश्लेषण** – एका महाविद्यालयास ग्रंथालय समिती नाही. एका ग्रंथपालाने ग्रंथालय समिती सदस्य संख्या दिली नसल्याने एकूण १५ महाविद्यालयाच्या ग्रंथालय समितीच्या सदस्य संख्या सदरच्या तक्त्यात दिली आहे. एकूण १५ महाविद्यालयाचे ग्रंथालयापैकी

०९ ग्रंथालयांच्या ग्रंथालय समितीची सदस्य संख्या ७ आहे. या महाविद्यालयाचे ग्रंथालयाचे शेकडा प्रमाण ६०.००% इतके आहे. प्रत्येकी एका महाविद्यालयांची ग्रंथालयाची सदस्य संख्या ५ व १७ असून त्यांची टक्केवारी ६.६७% इतकी आहे.
**निष्कर्ष :** सल्लागार समितीत साधारणतः ५ ते ९ सदस्यांचा समावेश दिसून येतो.

**तक्ता क्र. ३८ः ग्रंथ संख्या**

| अ.क्र. | ग्रंथ संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १०,००० ते १२,००० | ०७ | ४१.१९% |
| २. | १२,००१ ते १४,००० | ०४ | २३.५३% |
| ३. | १४,००१ ते १६,००० | ०२ | ११.७६% |
| ४. | १६,००१ ते १८,००० | ०१ | ५.८८% |
| ५. | १८,००१ ते २०,००० | ०२ | ११.७६% |
| ६. | २०,००० वर्षापेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – पश्चिम महाराष्ट्रातील एकूण १७ आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयापैकी ०७ ग्रंथालयाची संख्या १०,००० ते १२,००० यांचे दरम्यान आहे. या ग्रंथालयांची टक्केवारी ४१.१९% इतकी आहे. २०,००० पेक्षा अधिक ग्रंथसंख्या असणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या १ असून त्याची शेकडेवारी ५.८८% इतकी आहे.
**निष्कर्ष :** १४,००० पर्यंत ग्रंथ संख्या असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या ११ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६४.७२% इतके आहे. या ग्रंथालयातील ग्रंथ संग्रह साधारणतः १० हजार ते २० हजार या दरम्यान आहे.

**तक्ता क्र. ३९:नियतकालिकांचे बांधीव अंकांची संख्या**

| अ.क्र. | नियतकालिकांचे बांधीव अंक | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ पेक्षा कमी | ०३ | १७.६५% |
| २. | १ ते १०० | ०८ | ४७.०६% |
| ३. | १०१ ते २०० | ०१ | ५.८८% |
| ४. | २०१ ते ३०० | ०३ | १७.६५% |
| ५. | ३०० पेक्षा अधिक | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी सर्वाधिक ८ ग्रंथालयांमध्ये नियतकालिकांचे १ ते १०० बांधीव अंक आहेत. या महाविद्यालयांची शेकडेवारी ४७.०६% इतकी आहे. एकही नियतकालिकांचा बांधीव अंक नसलेल्या ग्रंथालयांची संख्या (०३) असून त्याचे शेकडा प्रमाण १७.६५% इतके आहे. ३०० पेक्षा अधिक नियतकालिकांचे बांधीव अंक असणाऱ्या महाविद्यालयाची संख्या २ असून त्यांची टक्केवारी ११.७६% आहे.

**निष्कर्ष** : १ ते १०० नियतकालिकांचे बांधित अंक असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४७.०६ इतके आहे.

**तक्ता क्र. ४०:संशोधन प्रकल्प संख्या**

| अ.क्र. | संशोधन प्रकल्प संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०४ | २३.५३% |
| २. | १ ते १०० | ०४ | २३.५३% |
| ३. | १०१ ते २०० | ०४ | २३.५३% |
| ४. | २०१ ते ३०० | ०० | ००.००% |
| ५. | ३०१ ते ४०० | ०३ | १७.६५% |
| ६. | ४०० पेक्षा अधिक | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – संशोधन प्रकल्प संख्या १ पेक्षा कमी अर्थातच ० असणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयांची संख्या ४ असून त्याचे शेकडा प्रमाण २३.५३% इतके आहे. १ ते १०० आणि १०१ ते २०० संशोधन प्रकल्प असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्याही प्रत्येकी चार इतकीच असून त्याची शेकडेवारीही प्रत्येकी २३.५३% इतकी आहे. ४०० पेक्षा अधिक संशोधन प्रकल्प असणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयांची संख्या २ इतकी आहे त तिचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : १ ते २०० इतके संशोधन प्रकल्प असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ८ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४७.०६ इतके आहे. संशोधन प्रकल्पांची संख्या साधारण आहे.

**तक्ता क्र. ४१ः प्रकल्प अहवाल संख्या**

| अ.क्र. | प्रकल्प अहवाल संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | १२ | ७०.५९% |
| २. | १ ते २०० | ०४ | २३.५३% |
| ३. | २०० पेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – बारा महाविद्यालयाचे ग्रंथालयाकडे एकही प्रकल्प अहवाल नाही. त्यांची शेकडेवारी ७०% इतकी आहे. चार ग्रंथालयांकडे १ ते २०० व २०० पेक्षा अधिक प्रकल्प असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ५ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ३०% इतकी आहे.

**निष्कर्ष :** प्रकल्प अहवालाची संख्या अल्प प्रमाणात आहे.

**तक्ता क्र. ४२ः वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रह संख्या**

| अ.क्र. | वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रह संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०६ | ३५.२९% |
| २. | १ ते २०० | ०३ | १७.६५% |
| ३. | २०१ ते ४०० | ०० | ००.००% |
| ४. | ४०१ ते ६०० | ०३ | १७.६५% |
| ५. | ६०१ ते ८०० | ०१ | ०५.८८% |
| ६. | ८०० पेक्षा अधिक | ०४ | २३.५३% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**– एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी ३५% (०६) महाविद्यालयांचे ग्रंथालयाकडे वस्तुनिष्ठ संदर्भग्रंथ संग्रह नाही. ८०० पेक्षा अधिक वस्तुनिष्ठ संदर्भग्रंथ संग्रह असणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयाची संख्या ०५ असून त्यांचे शेकडा प्रमाण २९% इतके आहे. तर १ ते ८०० पर्यंत संदर्भ संग्रह असणाऱ्या ग्रंथालयांची संख्या १२ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ३५% इतके आहे.

**निष्कर्ष :** वस्तुनिष्ठ संदर्भ संग्रहाची संख्या अल्प आहे.

**तक्ता क्र. ४३ :आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह संख्या**

| अ.क्र. | आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०३ | १७.६५% |
| २. | १ ते २०० | ०८ | ४७.०५% |
| ३. | २०१ ते ४०० | ०३ | १७.६५% |
| ४. | ४०० पेक्षा अधिक | ०३ | १७.६५% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–१ ते २०० आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह असलेल्या आयुर्वेद महाविद्यालय ग्रंथालयाची संख्या सर्वाधिक ८ आहे व त्याचे शेकडा प्रमाण ४७.०५% इतके आहे. तर १७% महाविद्यालयाचे ग्रंथालयात १ ते ४०० पर्यंत दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह संख्या आहे. दुर्मिळ वाचन साहित्य संग्रह नसलेल्या आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालय संख्या ०३ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण १७.६५% इतके आहे.

**निष्कर्ष :** दुर्मिळ वाचन संग्रह १ ते २०० असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे. दुर्मिळ वाचन साहित्य संग्रहाची स्थिती साधारण आहे.

**तक्ता क्र. ४४:ग्रंथ (टायटल्स) संख्या**

| अ.क्र. | ग्रंथ (टायटल्स) संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २००० | ०२ | १२.५०% |
| २. | २००१ ते ४००० | ०८ | ५०.००% |
| ३. | ४००१ ते ६००० | ०४ | २५.००% |
| ४. | ६००० पेक्षा अधिक | ०२ | १२.५०% |
| | एकूण | १६ | १००% |

**विश्लेषण**–एकूण १७ आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयांपैकी ६२% (१०) महाविद्यालयाचे ग्रंथालयातील ग्रंथ टायटल्सची संख्या १ ते ४००० इतकी आहे. तर ३७%(६) या महाविद्यालयीन ग्रंथालयातील टायटल संख्या ४००० पेक्षा अधिक आहे. यामध्ये एका प्रतिसादकाने आपले मत नोंदविलेले नाही. (१ ते २०००) आणि ६००० पेक्षा अधिक टायटल असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या प्रत्येकी २ इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण १२.५०% इतके आहे.

**निष्कर्ष** :सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयाचे टायटलची संख्या २००१ ते ४००० इतकी असून अशा महाविद्यालयाचे ग्रंथालयाची संख्या ८ इतकी आहे.

**तक्ता क्र. ४५:नियतकालिकांचे बांधीव अंक (टायटल्स) संख्या**

| अ.क्र. | नियतकालिकांचे बांधीव अंक (टायटल्स) संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०३ | १७.६४% |
| २. | १ ते १०० | ०९ | ५२.९४% |
| ३. | १०१ ते २०० | ०१ | ५.८८% |
| ४. | २०१ ते ३०० | ०२ | ११.७७% |
| ५. | ३०० पेक्षा अधिक | ०२ | ११.७७% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – नियतकालिकांचे बांधीव अंक असलेल्या टायटल्सची संख्या १ ते १०० असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या सर्वाधिक ९ इतकी असून त्याचे शेकडा प्रमाण ५२.९४% इतके आहे. शून्य नियतकालिकांचे बांधीव अंकांचे टायटल्स असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या ३ इतकी असून त्याचे शेकडा प्रमाण १७.६४% आहे.

**निष्कर्ष** : १ ते १०० नियतकालिकांचे बांधिव अंक (टायटल) संख्या असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक असून ती ९ इतकी आहे. व तिचे शेकडा प्रमाण ५२.९४% इतके आहे.

**तक्ता क्र. ४६ः संशोधन प्रकल्प (टायटल्स) संख्या**

| अ.क्र. | संशोधन प्रकल्प (टायटल्स) संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०४ | २३.५३% |
| २. | १ ते १०० | ०४ | २३.५३% |
| ३. | १०१ ते २०० | ०५ | २९.४२% |
| ४. | २०१ ते ३०० | ०० | ००.००% |
| ५. | ३०१ ते ४०० | ०२ | ११.७६% |
| ६. | ४०० पेक्षा अधिक | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–पाच महाविद्यालयांतील ग्रंथालयांमध्ये संशोधन प्रकल्प टायटल्स संख्या १०१ ते २०० इतकी आहे. एक पेक्षा कमी संशोधन प्रकल्प टायटल्स असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या ४ असून त्याची टक्केवारी २३.५३% इतकी आहे. ४०० पेक्षा अधिक संशोधन प्रकल्पांचे टायटल्स असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या २ इतकी आहे व त्याचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : १ ते २०० संशोधन प्रकल्प असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ९ इतकी असून ती सर्वाधिक आहे. त्याचे शेकडा प्रमाण ५२.९५% इतके आहे.

**तक्ता क्र. ४७ःप्रकल्प अहवाल संख्या (टायटल्स)**

| अ.क्र. | प्रकल्प अहवाल संख्या (टायटल्स) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | १२ | ७०.५९% |
| २. | १ ते २०० | ०४ | २३.५३% |
| ३. | २०० पेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी १२ महाविद्यालयांचे ग्रंथालयांचे प्रकल्प अहवालाचे टायटल्स १ पेक्षा कमी आहेत अर्थातच ० आहेत. ४ महाविद्यालयांचे ग्रंथालयातील प्रकल्प अहवालाचे टायटल्स १ ते २०० आहेत. अशा महाविद्यालयाची टक्केवारी २३.५३% इतकी आहे.

**निष्कर्ष :** शून्य प्रकल्प अहवाल (टायटल्स) असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक असून ती १२ इतकी आहे व त्याचे शेकडा प्रमाण ७०.५९% इतके आहे.

**तक्ता क्र. ४८:वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रह संख्या (टायटल्स)**

| अ.क्र. | वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रह संख्या (टायटल्स) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०६ | ३५.३०% |
| २. | १ ते २०० | ०४ | २३.५३% |
| ३. | २०१ ते ४०० | ०० | ००.००% |
| ४. | ४०१ ते ६०० | ०२ | ११.७६% |
| ५. | ६०१ ते ८०० | ०१ | ५.८८% |
| ६. | ८०० पेक्षा अधिक | ०४ | २३.५३% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – आयुर्वेदातील वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रह टायटल्स १ पेक्षा कमी अर्थातच ० असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या ६ आहे व त्यांची शेकडेवारी ३५.३०% इतकी आहे. ८०० पेक्षा अधिक आणि १ ते २०० वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रहाचे टायटल्स असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या प्रत्येकी ०४ असून त्यांची टक्केवारी प्रत्येकी २३.५३% इतकी आहे.

**निष्कर्ष :** शून्य वस्तुनिष्ठ संदर्भसंग्रह संख्या (टायटल्स) असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ६ इतकी आहे. व त्याचे शेकडा प्रमाण ३५.३०% इतके आहे. तर ४०० हून अधिक वस्तुनिष्ठ संदर्भ संख्या (टायटल्स) असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या ७ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ४१.१७% इतके आहे.

**तक्ता क्र. ४९आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह संख्या (टायटल्स)**

| अ.क्र. | आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह संख्या (टायटल्स) | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०३ | १७.६५% |
| २. | १ ते २०० | ०९ | ५२.९५% |
| ३. | २०१ ते ४०० | ०२ | ११.७६% |
| ४. | ४०० पेक्षा अधिक | ०३ | १७.६४% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रहाचे १ ते २०० टायटल्सची संख्या असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या ९ असून त्यांचे शेकडा प्रमाण ५२.९५% इतके आहे. १ पेक्षा कमी (अर्थातच शून्य) आयुर्वेदातील दुर्मिळ वाचनसाहित्य संग्रह टायटल्सची संख्या असणाऱ्या महाविद्यालयाची संख्या ३ असून तिची टक्केवारी १७.६५% इतकी आहे.

**निष्कर्ष** : १ ते ४०० पेक्षा अधिक दुर्मिळ वाचन साहित्य संग्रह संख्या टायटल्स असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या १४ असून त्यांचे शेकडेवारी ८२.३५% इतकी आहे.

**तक्ता क्र. ५० ताम्रपट संख्या**

| अ.क्र. | ताम्रपट संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | १३ | ७६.४८% |
| २. | १ ते ५ | ०२ | ११.७६% |
| ३. | ६ ते १० | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी शून्य ताम्रपट असलेल्या आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या असून ती १३ इतकी आहे. व त्यांचे शेकडा प्रमाण ७६% इतके आहे. तर २४% महाविद्यालयाचे ग्रंथालयात १० पर्यंत ताम्रपट आहेत.

**निष्कर्ष** : ताम्रपट उपलब्ध नसणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. ५१ः इलेक्ट्रॉनिक ग्रंथ संख्या**

| अ.क्र. | इलेक्ट्रॉनिक ग्रंथ संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०९ | ५२.९५% |
| २. | १ ते १०० | ०४ | २३.५३% |
| ३. | १०१ ते २०० | ०० | ००.००% |
| ४. | २०१ ते ३०० | ०० | ००.००% |
| ५. | ३०१ ते ४०० | ०० | ००.००% |
| ६. | ४०१ ते ५०० | ०२ | ११.७६% |
| ७. | ५०० पेक्षा अधिक | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – ५२% (९) ग्रंथालयात इलेट्रॉनिक ग्रंथ अद्याप उपलब्ध नाही. परंतू काही आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये ई–ग्रंथ खरेदीस प्रारंभ होत आहे. १ ते १०० इलेक्ट्रॉनिक ग्रंथ असलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ४ असून त्यांचे शेकडा प्रमाण फक्त २३.५३% इतके आहे.

**निष्कर्ष :** इलेक्ट्रॉनिक ग्रंथ असलेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या खूपच कमी आहे.

**तक्ता क्र. ५२: इलेक्ट्रॉनिक नियतकालिकांची संख्या**

| अ.क्र. | इलेक्ट्रॉनिक नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०९ | ५२.९५% |
| २. | १ ते १० | ०३ | १७.६५% |
| ३. | ११ ते २० | ०१ | ५.८८% |
| ४. | २१ ते ३० | ०२ | ११.७६% |
| ५. | ३० पेक्षा अधिक | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–इलेक्ट्रॉनिक नियतकालिकांची संख्या अर्थातच इलेक्ट्रॉनिक नियतकालिकांची संख्या ० असणाऱ्या महाविद्यालयांच्या ग्रंथालयांची संख्या ९ असून त्यांचे शेकडा प्रमाण ५२.९५% इतके आहे. १ ते १० इलेक्ट्रॉनिक नियतकालिके असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या ०३ असून तिचे शेकडा प्रमाण १७.६५% इतके आहे.

**निष्कर्ष :** ५२% (९) आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयात अद्याप ई–नियतकालिके नाहीत. तर इतर ४८% ग्रंथालयात साधारण १ ते ३० इतकी नियतकालिकांची संख्या आहे.

**तक्ता क्र. ५३ःसिडी/फ्लॉपी/डिव्हीडी यांची संख्या**

| अ.क्र. | सिडी/फ्लॉपी/डिव्हीडी यांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०३ | १७.६५% |
| २. | १ ते १०० | ०३ | १७.६५% |
| ३. | १०१ ते २०० | ०६ | ३५.३०% |
| ४. | २०१ ते ३०० | ०१ | ५.८८% |
| ५. | ३०१ ते ४०० | ०१ | ५.८८% |
| ६. | ४०१ ते ५०० | ०२ | ११.७६% |
| ७. | ५०० पेक्षा अधिक | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – सी.डी., फ्लॉपी, डिव्हीडी असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ० असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ०३ असून तिचे शेकडा प्रमाण १७.६५% इतके आहे. ५०० पेक्षा अधिक सी.डी., फ्लॉपी, डिव्हीडी असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ०१ असून त्यांची टक्केवारी ५.८८% इतकी आहे. तर १ ते ५०० पर्यंत सी.डी., फ्लॉपी, डिव्हीडी यांची संख्या असणारी महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या १३ असून त्यांचे शेकडा प्रमाण ७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : १ ते ५०० सी.डी., फ्लॉपी, डिव्हीडी इतकी संख्या असणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या सर्वाधिक आहे. सी.डी., फ्लॉपी, डिव्हीडीची संख्या सर्वच महाविद्यालयात खूपच कमी आहे.

**तक्ता क्र. ५४ः राष्ट्रीय नियतकालिकांची संख्या**

| अ.क्र. | राष्ट्रीय नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २० | ०७ | ४१.१८% |
| २. | २१ ते ४० | ०९ | ५२.९४% |
| ३. | ४१ ते ६० | ०० | ००.००% |
| ४. | ६० ते ८० | ०१ | ५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – १ ते ४० राष्ट्रीय नियतकालिके असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या १६ असून यांचे शेकडा प्रमाण ९४% इतके आहे. तर ६० ते ८० राष्ट्रीय नियतकालिके घेणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या १ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६ इतके आहे.

**निष्कर्ष :** १ ते ४० राष्ट्रीय नियतकालिके असणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक ९ इतकी आहे.

**तक्ता क्र. ५५: आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची संख्या**

| अ.क्र. | आंतरराष्ट्रीय नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २० | १६ | ९४.१२% |
| २. | २१ ते ४० | ०१ | ५.८८% |
| ३. | ४१ ते ६० | ०० | ००.००% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**– एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी १६ महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये १ ते २० आंतरराष्ट्रीय नियतकालिके येतात. त्यांचे शेकडा प्रमाण ९४% इतके आहे. तर २१ ते ४० पर्यंत आंतरराष्ट्रीय नियतकालिके येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या १ असून त्यांचे शेकडा प्रमाण ५.८८% इतके आहे.

**निष्कर्ष :** १६ महाविद्यालयांची ग्रंथालये १ ते २० आंतरराष्ट्रीय नियतकालिके घेतात.

**तक्ता क्र. ५६: इलेक्ट्रॉनिक नियतकालिकांची संख्या**

| अ.क्र. | इलेक्ट्रॉनिक नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ०६ | ३५.३०% |
| २. | १ ते २० | ०८ | ४७.०७% |
| ३. | २१ ते ४० | ०२ | ११.७६% |
| ४. | ४१ पेक्षा अधिक | ०१ | ०५.८८% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण**–एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी ०६ महाविद्यालयांचे ग्रंथालयात १ पेक्षा कमी इलेक्ट्रॉनिक नियतकालिके येतात म्हणजेच या ०६ महाविद्यालयांचे ग्रंथालयांत शून्य इलेक्ट्रॉनिक नियतकालिके येतात. १ ते २० इलेक्ट्रॉनिक नियतकालिके येणाऱ्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या ८ असून त्या महाविद्यालयांचे ग्रंथालयांचे शेकडा प्रमाण ४७.०६% इतके आहे. ४१ पेक्षा अधिक इलेक्ट्रॉनिक नियतकालिके असणाऱ्या ग्रंथालयाची संख्या १ असून त्या ग्रंथालयांचे शेकडा ५.८८% प्रमाण आहे.

**निष्कर्ष** : ४७% ग्रंथालयात साधारणतः २० पर्यंत ई–जर्नल्स येतात तर १२% ग्रंथालयांत ४० पर्यंत ई–जर्नल्स येतात.

**तक्ता क्र. ५७ः इतर नियतकालिकांची संख्या**

| अ.क्र. | इतर नियतकालिकांची संख्या | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ० | ११ | ६४.७१% |
| २. | १ ते २० | ०४ | २३.५३% |
| ३. | २१ ते ४० | ०२ | ११.७६% |
| | एकूण | १७ | १००% |

**विश्लेषण** – पश्चिम महाराष्ट्राच्या आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयात शून्य इतर नियतकालिके येणाऱ्या आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संख्या ११ असून त्यांचे शेकडा प्रमाण ६४.७१% इतके आहे. सर्वाधिक ४ महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये (१ ते २०) इतर नियतकालिके येतात अशा महाविद्यालयांची टक्केवारी २३.५३% इतकी आहे. २१ ते ४० इतर नियतकालिके येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या २ असून त्यांचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक ११ महाविद्यालयाचे ग्रंथालयात इतर एकही नियतकालिके येत नाही.

**तक्ता क्र. ५८:नियतकालिकावरील होणारा सरासरी खर्च**

| अ.क्र. | नियतकालिकावरील होणारा सरासरी खर्च | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | १ ते २५,००० | ०२ | १८.१८% |
| २. | २५,००१ ते ५०,००० | ०२ | १८.१८% |
| ३. | ५०,००१ ते ७५,००० | ०१ | ०९.०९% |
| ४. | ७५,००१ ते १,००,००० | ०२ | १८.१८% |
| ५. | १,००,००१ ते १,२५,००० | ०२ | १८.१८% |
| ६. | १,२५,००१ ते १,५०,००० | ०१ | ०९.०९% |
| ७. | १,५०,००१ पेक्षा अधिक | ०१ | ०९.०९% |
| | एकूण | ११ | १००% |

**विश्लेषण** – १ ते २५,००० , २५,००१ ते ५०,०००, ७५,००१ ते १,००,०००, १,००,००१ ते १,२५,००० एवढा नियतकालिकावरील सरासरी खर्च करणारी प्रत्येकी दोन महाविद्यालये आहेत. व त्यांचे शेकडा प्रमाण १८.१८% इतके आहे. ५०,००० ते ७५,०००, १,२५,००० ते १,५०,००० आणि १,५०,००१ पेक्षा अधिक नियतकालिकावरील होणारा सरासरी खर्च असलेली प्रत्येकी १ महाविद्यालयीन ग्रंथालये असून त्यांचे शेकडा प्रमाण ०९.०९% इतके आहे. या मुद्दयावर एकूण ११ ग्रंथपालांनी आपले मत नोंदवले आहे तर ६ ग्रंथपालांनी आपले मत नोंदवलेच नाही.

**निष्कर्ष** : १ ते १,२५,००० नियतकालिकावरील सरासरी खर्च करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक असून ती ९ इतकी आहे व त्याचे शेकडा प्रमाण ८१.८१% इतकी आहे.

**तक्ता क्र. ५९: ग्रंथालयात वापरली जाणारी वर्गीकरण पद्धती**

| अ.क्र. | वर्गीकरण पद्धती | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | डि.डि.सी | १० | ७६.९२% |
| २. | कोलन | ०१ | ०७.६९% |
| ३. | विषयानूसार | ०२ | १५.३९% |
| | एकूण | १३ | १००% |

**वृत्तालेख क्र. ७**




**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथपालांपैकी ०४ महाविद्यालयांचे ग्रंथपालांनी याबाबत माहिती दिलेली नसून १३ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी डि.डि.सी. ही सर्वात जास्त वापरली जाणारी वर्गीकरण पद्धती असून एकूण ग्रंथालयांच्या ७६.९२% ग्रंथालये ही वर्गीकरण पद्धती वापरतात. कोलन वर्गीकरण पद्धतीचा वापर करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या १ असून त्याचे शेकडा प्रमाण ८ इतके आहे. विषयानुसार वर्गीकरण करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या २ असून त्यांचे शेकडा प्रमाण १५.३९% इतके आहे.

**निष्कर्ष** –सर्वाधिक महाविद्यालयाचे ग्रंथालयात डि.डि.सी. ही वर्गीकरण पद्धती वापरली जाते.

**तक्ता क्र. ६०:ग्रंथालयात वापरली तालिकीकरण पद्धती**

| अ.क्र. | तालिकीकरण पद्धती | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ए.ए.सी.आर –२ | ०२ | ११.७६% |
| २. | संगणकीकृत तालिका | १२ | ७०.५९% |
| ३. | तालिकीकरण केलेले नाही | ०३ | १७.६५% |
| | एकूण | १७ | १००% |

**साधा स्तंभालेख क्र. ३**




**विश्लेषण**– पश्चिम महाराष्ट्रातील आयुर्वेद महाविद्यालयाचे ग्रंथालयातील तीन महाविद्यालयीन ग्रंथालयांनी तालिकीकरण केलेले नाही. त्यांची संख्या (३) असून त्यांची शेकडेवारी १७.६५% इतकी आहे. ए.ए.सी.आर–२ या तालिकीकरण करावयाच्या पद्धतीने दोन महाविद्यालयांचे ग्रंथालयाने तालिकीकरण केलेले आहे त्याचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे. संगणकीकृत तालिका वापरणाऱ्या

महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या १२ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ७०.५९% इतके आहे.

**निष्कर्ष** – सर्वाधिक महाविद्यालयांच्या ग्रंथालयांत संगणकीकृत तालिका वापरली जाते.

**तक्ता क्र. ६१ : परिगणन कालावधी**

| परिगणन कालावधी | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| प्रत्येक वर्षी | ०१ | ०५.८८% |
| दोन वर्षातून एकदा | १४ | ८२.३५% |
| इतर | ०२ | ११.७६% |
| एकूण | १७ | १००% |

**वृत्तालेख क्र. ८**




**विश्लेषण** – एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी सर्वाधिक १४ ग्रंथालयांचे ग्रंथपरिगणन दोन वर्षातून एकदा केले जाते. त्यांची शेकडेवारी ८२.३५% इतकी आहे. प्रत्येक वर्षी ग्रंथपरिगणन करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वात कमी असून ती एक आहे व त्याचे शेकडा प्रमाण ५.८८% इतके आहे.

**निष्कर्ष** – सर्वाधिक महाविद्यालयाचे ग्रंथालयांत ग्रंथपरिगणन दोन वर्षातून एकदा केले जाते.

**तक्ता क्र. ६२ः वाचनसाहित्य सुस्थितीत ठेवण्यासाठीची उपाय योजना**

| वाचनसाहित्य सुस्थितीत ठेवण्यासाठीची उपाय योजना | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| डांबर गोळी | ०६ | ३५.२९% |
| पेस्ट कंट्रोल | ०७ | ४१.१८% |
| इतर | ११ | ६४.७१% |

**साधा स्तंभालेख क्र. ४**




**विश्लेषण**– ग्रंथालय सुस्थितीत ठेवण्यासाठी सर्वाधिक इतर उपाययोजना करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ११ इतकी आहे व त्यांचे शेकडा प्रमाण ६४.७१% इतके आहे. पेस्ट कंट्रोल करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ७ असून त्याची टक्केवारी ४१.१८% इतकी आहे. डांबरगोळीचा वापर करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ६ असून त्यांचे शेकडा प्रमाण ३५.२९% इतके आहे.

**निष्कर्ष**–ग्रंथालय सुस्थितीत ठेवण्यासाठी इतर उपाययोजना करणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या सर्वाधिक आहे.

**तक्ता क्र. ६३:वाचनसाहित्य रद्दबातल धोरण संबंधी माहिती**

| प्रतिसाद | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १२ | ०४ | १६ |
| टक्केवारी | ७५.००% | २५.००% | १००% |

**साधा स्तंभालेख क्र. ५**




**विश्लेषण** – ग्रंथालय वाचनसाहित्य रद्दबातल धोरण लिखित स्वरूपात आहे असे मत नोंदवणाऱ्या ग्रंथपालांची संख्या (१२) असून त्यांची शेकडेवारी ७५.००% इतकी आहे. लिखित स्वरूपात वाचनसाहित्य रद्दबातल धोरण नाही असे मत नोंदवणाऱ्या ग्रंथपालांची संख्या (०४) असून तिचे शेकडा प्रमाण २५.००% इतके आहे. एका ग्रंथपालाने याबाबत आपले मत नोंदवलेले नाही

**निष्कर्ष**–सर्वाधिक महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये वाचन साहित्य रद्बातल धोरण लिखित स्वरूपात आहे.

**तक्ता क्र. ६४:वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण स्वरूपाविषयी माहिती**

| प्रतिसाद | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १२ | ०४ | १६ |
| टक्केवारी | ७५.००% | २५.००% | १००% |

**विश्लेषण**– ग्रंथालय वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण लिखित स्वरूपात आहे असे मत नोंदवणाऱ्या ग्रंथपालांची संख्या १२ असून त्यांची शेकडेवारी ७५.००% इतकी आहे. वाचनसाहित्य संग्रह विकासाचे धोरण लिखित स्वरूपात नाही असे मत नोंदवणाऱ्या ग्रंथपालांची संख्या ४ इतकी आहे व त्याचे शेकडा प्रमाण २५.००% आहे. एका ग्रंथपालाने याबाबत आपले मत नोंदवलेले नाही.

**निष्कर्ष**– सर्वाधिक महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये वाचन साहित्य संग्रह विकासाचे धोरण लिखित स्वरूपात आहे.

**तक्ता क्र. ६५: संगणकीकरण झालेले संख्या**

| बाब | संगणकीकरण झालेले आहे | संगणकीकरण झालेले नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १३ | ०४ | १७ |
| टक्केवारी | ७६.४७% | २३.५३% | १००% |

**विश्लेषण** – पश्चिम महाराष्ट्रातील एकूण १७ महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी १३ महाविद्यालयीन ग्रंथालयांचे संगणकीकरण झालेले आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ७६.४७% इतके आहे. तर संगणकीकरण न झालेल्या ग्रंथालयांची संख्या ०४ असून त्यांचे शेकडा प्रमाण २३.५३% इतके आहे.

**निष्कर्ष**– सर्वाधिक महाविद्यालयीन ग्रंथालयांमधील संगणकीकरणाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

**तक्ता क्र. ६६: संगणकीकरण प्रक्रिया सद्यस्थिती**

| बाब | संगणकीकरण प्रक्रिया पुर्ण झालेली आहे | संगणकीकरण प्रक्रिया अशंतः पुर्ण झालेली आहे | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०९ | ०४ | १३ |
| टक्केवारी | ६९.२३% | ३०.७६% | १००% |

**साधा स्तंभालेख क्र. ६**



**विश्लेषण**–पश्चिम महाराष्ट्रातील १३ आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी ९ आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संगणकीकरणाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यांचे शेकडा प्रमाण ६९.२३% इतके असून संगणकीकरणाची प्रक्रिया अंशतः पूर्ण झालेल्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ०४ असून त्यांचे शेकडा प्रमाण ३०.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संगणकीकरण प्रक्रिया पूर्ण झालेली आहे.

**तक्ता क्र. ६७:संगणकीकरणासाठी वापरले जाणारे सॉफ्टवेअर्स संर्दभींत माहिती**

| बाब | संगणकीकरणासाठी व्यावसायिक साफ्टवेअर वापरणारे | संगणकीकरणासाठी ओपनसोर्स साफ्टवेअर वापरणारे | स्वत:चे साफ्टवेअर वापरणारे | एकूण |
|---|---|---|---|---|
| संख्या | १० | ०१ | ०२ | १३ |
| टक्केवारी | ७६.९२% | ७.६९% | १५.३८% | १००% |

**वृत्तालेख क्र. ९**




**विश्लेषण**–पश्चिम महाराष्ट्रातील १३ आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांचे संगणकीकरणाची प्रक्रिया पूर्ण आणि अंशतः पूर्ण झालेली आहे. या १३ महाविद्यालयाचे

ग्रंथालयांपैकी १० ग्रंथालये व्यावसायिक सॉफ्टवेअर वापरतात. त्यांची शेकडेवारी ७६.९२% इतकी आहे. तर सर्वात कमी एका महाविद्यालयाचे ग्रंथालये ओपन सोर्स सॉफ्टवेअर वापरते व त्यांची शेकडेवारी ७.६९% इतकी आहे. स्वतःच्या पालक संस्थेने बनवलेली ०२ महाविद्यालयीन ग्रंथालये सॉफ्टवेअर्स वापरतात त्यांचे शेकडा प्रमाण १५.३८% इतके आहे.

**निष्कर्ष :** सर्वाधिक आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांमध्ये संगणकीकरणासाठी व्यावसायिक सॉफ्टवेअर वापरले जाते.

**तक्ता क्र. ६८ संगणकीकरणासाठी वापरले जाणारे सॉफ्टवेअर**

| अ.क्र. | सॉफ्टवेअरचे नाव | वापरणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| १. | ॲटोलिब | ०४ | ३३.३३% |
| २. | ई–विद्या | ०१ | ०८.३३% |
| ३. | विदयासागर | ०१ | ०८.३३% |
| ४. | डी.एक्स.सी.एल.एम.एस. | ०१ | ०८.३३% |
| ५. | ई.ग्रंथालय | ०१ | ०८.३३% |
| ६. | बियाणी टेक्नॉलॉजी | ०२ | १६.६७% |
| ७. | स्वतःचे सॉफ्टवेअर | ०२ | १६.६७% |
| | एकूण | १२ | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ प्रतिसादकांपैकी १३ महाविद्यालयांचे ग्रंथालयांची संगणकीकरण प्रक्रिया पूर्ण व चालू असल्याचे मत प्रतिसादकांना नोंदविलेले आहे. त्यापैकी एका प्रतिसादकाने संगणकीकरणासाठी वापरलेल्या सॉफ्टवेअरचे नाव नमूद केलेले नाही. उर्वरित १२ महाविदयालयीन ग्रंथालयांपैकी सर्वात जास्त ॲटोलिब नावाचे सॉफ्टवेअर वापरले जात असून अशा महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ४ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ३३.३३ इतके आहे. ई–विदया, विदयासागर, डी.एक्स.सी.एन.एम.एस., ई.–ग्रंथालय ही सॉफ्टवेअर्स वापरणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या प्रत्येकी १ असून त्यांचे शेकडा प्रमाण प्रत्येकी ८.३३ इतके आहे. बियाणी सॉफ्टवेअर वापरणाऱ्या व स्वतःचे तयार केलेले सॉफ्टवेअर वापरणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या प्रत्येकी २ असून त्यांचे शेकडा प्रमाण १६.६७ इतके आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयांचे ग्रंथालयांचे संगणकीकरणासाठी ॲटोलिब हे सॉफ्टवेअर वापरले जाते.

**तक्ता क्र. ६९:ग्रंथालयाचे डिजीटायझेशन सद्यस्थिती**

| बाब | डिजीटायझेशन झालेले आहे | डिजीटायझेशन झालेले नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०४ | १३ | १७ |
| टक्केवारी | २३.५३% | ७६.४७% | १००% |

**साधा स्तंभालेख क्र. ७**




**विश्लेषण** – सदरील संशोधनासाठी निवडण्यात आलेल्या लक्ष समूहापैकी प्रतिसाद दिलेल्या १७ महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी ०४ महाविद्यालयीन ग्रंथालयाचे डिजिटायझेशन केलेले आहे. त्यांची शेकडेवारी २३.५३% इतकी आहे. तर १३ महाविद्यालयीन ग्रंथालयाचे डिजिटायझेशन केलेले नाही त्यांची शेकडेवारी ७६.४७% इतकी आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयीन ग्रंथालयाचे डिजिटायझेशन झालेले नाही.

**तक्ता क्र. ७०:ग्रंथालयाचे डिजीटायझेशन वापरलेले साफ्टवेअर**

| **बाब** | **डिजीटायझेशन व्यावसायिक सॉफ्टवेअर** | **डिजीटायझेशन ओपनसोर्स सॉफ्टवेअर** | **डिजीटायझेशन स्वतःचे सॉफ्टवेअर** | **एकूण** |
|---|---|---|---|---|
| संख्या | ०३ | ०० | ०१ | ०४ |
| टक्केवारी | ७५.००% | ००.००% | २५.००% | १००% |

**विश्लेषण** – सदरील संशोधनासाठी निवडलेल्या व प्रतिसाद दिलेल्या आणि ज्या महाविद्यालयीन ग्रंथालयांचे डिजिटायझेशन झालेले आहे अशा ०४ महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी ०३ ग्रंथालये व्यावसायिक सॉफ्टवेअर वापरतात त्यांची शेकडेवारी इतकी आहे, तर स्वतःचे पालक संस्थेने तयार केलेले सॉफ्टवेअर डिजिटायझेशन करीता वापरणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाची संख्या १ आहे व त्याचे शेकडा प्रमाण २५% इतके आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयांचे ग्रंथालयांचे डिजिटायझेशन करण्यासाठी व्यावसायिक सॉफ्टवेअर वापरले जाते.

**तक्ता क्र. ७१ः ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणी सदंर्भातील ज्ञान**

| **प्रतिसाद** | **होय** | **नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| संख्या | १५ | ०२ | १७ |
| टक्केवारी | ८८.२४% | ११.७६% | १००% |

**विश्लेषण** – प्रतिसाद दिलेल्या एकूण १७ ग्रंथालयांपैकी ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणीचे ज्ञान आहे अशा महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या १५ असून त्यांची शेकडेवारी ८८.२४% इतकी आहे. कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणीचे ज्ञान नाही असे मत नोंदविणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांची संख्या ०२ इतकी असून त्यांचे शेकडा प्रमाण ११.७६% इतके आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयीन ग्रंथालयांतील कर्मचाऱ्यांना संगणक हाताळणी संदर्भातील ज्ञान आहे.

**तक्ता क्र. ७२:ग्रंथपाल पुरवत असलेल्या सेवांबाबत वाचकांचे समाधान**

| **प्रतिसाद** | **होय** | **नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| संख्या | १६ | ०१ | १७ |
| टक्केवारी | ९४.१२% | ५.८८% | १००% |

**विश्लेषण** – प्रतिसाद दिलेल्या १७ ग्रंथपालांपैकी १६ ग्रंथपालांनी ते वाचकांना पुरवत असलेल्या सेवांबाबत समाधानी असल्याचे मत नोंदविलेले आहे. व त्यांची शेकडेवारी ९४.१२% इतकी आहे. तर १ ग्रंथपाल आपण देत असलेल्या सेवांबाबत समाधानी नाहीत त्याची शेकडेवारी ५.८८% इतकी आहे.

**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयीन ग्रंथपाल हे ते पुरवित असलेल्या सेवांबाबत समाधानी आहेत.

**तक्ता क्र. ७३: संगणक टर्मिनल्स संबंधी माहिती**

| **प्रतिसाद** | **होय** | **नाही** | **एकूण** |
|---|---|---|---|
| संख्या | १४ | ०३ | १७ |
| टक्केवारी | ८२.३५% | १७.६५% | १००% |

**साधा स्तंभालेख क्र. ८**



**विश्लेषण** – एकूण १७ आयुर्वेद महाविद्यालयीन ग्रंथालयांपैकी १४ ग्रंथालये त्यांच्या वाचकांना संगणक टर्मिनल्स पुरवतात, त्यांची शेकडेवारी ८२.३५% आहे. ०३ ग्रंथालये त्यांच्या वाचकांना टर्मिनल्स पुरवत नाही, त्यांची शेकडेवारी ५.८८% इतकी आहे.
**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयांची ग्रंथालये त्यांच्या वाचकांना संगणक टर्मिनल्स पुरवितात.

**तक्ता क्र. ७४: ओपॅक सुविधा उपलब्धी संबंधी माहिती**

| प्रतिसाद | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १२ | ०५ | १७ |
| टक्केवारी | ७०.५९% | २९.४१% | १००% |

**साधा स्तंभालेख क्र.९**




**विश्लेषण** – प्रतिसाद दिलेल्या १७ आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी १२ महाविद्यालयांची ग्रंथालये त्यांच्या वाचकांना ओपॅक सुविधा पुरवितात त्यांचे शेकडा प्रमाण ७०.५९% इतके आहे. ०३ महाविद्यालयांची ग्रंथालये त्यांच्या वाचकांना ओपॅक सुविधा पुरवत नाहीत. त्यांचे शेकडा प्रमाण२९.४१% इतके आहे.
**निष्कर्ष** : सर्वाधिक महाविद्यालयांची ग्रंथालये त्यांच्या वाचकांना ओपॅक सुविधा पुरवितात.

**तक्ता क्र. ७५ ग्रंथालयातील संगणक इंटरनेट जोडणी संदर्भात माहिती**

| प्रतिसाद | होय | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | १७ | ०० | १७ |
| टक्केवारी | १००% | ००.००% | १००% |

**विश्लेषण** – एकूण १७ आयुर्वेद महाविद्यालयांचे ग्रंथालयांपैकी इंटरनेट जोडणी केलेली महाविद्यालयीन ग्रंथालये १७ असून त्यांची टक्केवारी १००% इतकी आहे. सर्वच ग्रंथालये इंटरनेटव्दारा जोडलेली आहेत. संगणक इंटरनेटव्दारा जोडलेले नाही असे एकही महाविद्यालयाचे ग्रंथालय नाही.

**निष्कर्ष :** सर्वच महाविद्यालयाचे ग्रंथालयात इंटरनेट जोडणी केलेली आहे.

**तक्ता क्र. ७६ःइंटरनेट सेवा पुरविणाऱ्या एजन्सी संदर्भात माहिती**

| एजन्सीचे नाव | ग्रंथालयांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| बी.एस.एन.एल | १२ | ८०.००% |
| एक्सप्रेस | ०१ | ६.६७% |
| रिलायन्स | ०१ | ६.६७% |
| एअरसेल | ०१ | ६.६७% |
| एकूण | १५ | १००% |

**वृत्तालेख क्र.१०**




